# श्री साईलीला



द्वारकामाईतील विश्रान्ति स्थान

फेब्रुवारी ६० पैसे १९७४

# अनुक्रमणिका-फेब्रुवारी १९७४


| | |
|---|---|
| १. संपादकीय– नित्य आणि नूतन | |
| २. ॐ चे व्यावहारिक महत्त्व | श्री. का. वा. सहस्रबुद्धे |
| ३. श्रीसाईनाथ महाराज ललित चरित्र | श्री. र. श्री. पुजारी |
| ४. नमस्कार माझा तुम्हां साइनाथा | श्री. बाबुराव गांडोळे |
| ५. श्रीसाईगीतमाला गीत ५ वे | श्री. मधुकर जोशी |
| ६. श्रीस्वामी स्वरूपानंद | डॉ. रा. य. परांजपे |
| ७. मन राख मानवा शांत शांत | श्रीमती लक्ष्मीतनया |
| ८. भ्रांति पडे मूढासी | ,, |
| ९. संत सूरदास | श्री. विनायक पाठक |
| १०. रामगीतांजलि | श्री. दिवाकर वैसास |
| ११. नित्य मी जिवंत | श्री. चिपळूणकर गुरुजी |
| १२. श्रीगोंदवलेकर महाराज व्यक्तिदर्शन | श्री. पु. मु. अत्रे |
| १३. 'वस्तुमात्रामध्ये नारायण' | डॉ. के. भ. गव्हाणकर |
| १४. श्रीगुरुनानक गीतांजलि | श्री. 'चेतन' |
| १५. शिरडीवृत्त. | |
| विशेष फोटो :—शिरडीदर्शन | पृ. २ |


मुखपृष्ठ : द्वारकामाईत दीड वीत रुंदीची एक फळी टांगलेली असे चिंध्यांनी. त्या फळीवर बाबा झोपत. पण तिथे ते कसे चढत व तिथून ते कसे उतरत हे मात्र कुणालाही दिसले नाही.



# श्री साई वा क्सु धा

**जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥**

चित्तचि काम चिंतन । क्षण न उगले चिंतनावीण ।
विषय दिल्या त्या विषयचिंतन । गुरुचिंतन त्या गुरुदिधल्या ।। १२१ ॥
तरी सर्वेंद्रियांचे करूनि कान । ऐकिलेंत जें गुरुमहिमान ।
तें सहज स्मरण सहज भजन । सहज कीर्तन साईंचे ॥ १२२ ॥
पंचाग्निसाधन यज्ञयाग । मंत्र–तंत्र–अष्टांगयोग ।
द्विजांसीच हे शक्य प्रयोग । काय उपयोग इतरांना ॥ १२३ ॥
तैशा नव्हेत संतकथा । सकलां लाविती त्या सत्पथा ।
भवभयाची हरिती व्यथा । निज परमार्था प्रकटती ॥ १२४ ॥
संतकथा श्रवण मनन । परिशीलन वा निदिध्यासन ।
द्विज शूद्र वा स्त्रीजन । येणें पावन होतात ॥ १२५ ॥

साईसच्चरित—अध्याय १० वा

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] फेब्रुवारी १९७४ [ अंक १०

: संपादक :

**श्री. का. सी. पाठक**


वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक रु. ०-६० फक्त.

: कार्यालय :

साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१



खंडोबा मंदिर पवित्र धाम
जिथें बाबांस पडलें 'साई' हें नाम
**खंडोबा मंदिर पवित्र धाम**
**जहाँ बाबांको मिला 'साई' यह नाम**
Here, at Khandoba's shrine,
Baba was first named 'Sai' the Divine.

संपादकीय

# नित्य आणि नूतन

आपल्या मनाला नव्या नव्या गोष्टींचे आकर्षण असते तितकेच जुन्या गोष्टींचेही प्रेम असते. ही एक विलक्षण प्रवृत्ति आहे. 'जुने ते सोने' असे म्हणत म्हणत आपण उगवत्या दिवसाची वाट पहातच असतो. एकामागून एक क्षण आपल्या अनुभूतीतून जात असतात आणि आपण त्यातून काहीतरी शिक्षण घेत घेत, बरे वाईट निवडीत निवडीत, आणि सुखाची आशा धरीत पुढे पुढे काय नवीन अनुभूती असेल याची वाट पहात असतो. भूतकाळातील सुखदुःखांच्या स्मृतींचे 'संचित' गाठोडे आपल्याजवळ नेहमीच असते. त्या वजनाखाली मन जरी दबलेले दिसले तरी उपभोगावयास मिळालेल्या आनंदाच्या व सुखाच्या प्रसंगांचे स्मरण तितक्याच प्रकर्षाने मनाला गुदगुल्या करीत असते. अशा प्रकारे भूतकाळातून मनाचा प्रवास भविष्यकाळाकडे होत असतो आणि वर्तमानकाळ हा जो क्षणमय आणि नित्य निकटच असतो त्याची पूर्णपणे तेथल्या तेथेच अनूभूती आपण पूर्णपणे घेऊ शकत नाही. आपल्या मनातील सुखदुःखांविषयींचे जे मूल्य नित्य बाळगलेले असते त्या मूल्यमापनाचा प्रभाव नव्या अनुभवांवर पडतोच पडतो. आपल्या सर्व स्वार्थाच्या किंवा परहिताच्या प्रेरणा मनातील कोणत्या पूर्वभूमिकेतून उद्भवत असतात ते पाहिले तर नूतन म्हणून जे काही असेल त्याला आपण खरोखरीच्या मोकळ्या मनाने सामोरे जातच नाही असे दिसून येईल. कुटुंब, शेजारीपाजारी, जात, धर्म, देश, हवामान, ऋतू आणि आपल्या मनाची त्या वेळची "ओढ', इत्यादि अनेक गोष्टींचा कमीअधिक प्रभाव आपल्या वर्तमान काळातील अनूभूतीवर पडतो. मनाचा समतोल त्यामुळे बिघडतो. आणि समतोलपणा म्हणजे ईर्ष्या व तिटकारा यांपासून, क्रोध, लोभ, मत्सर, काम, इत्यादींपासून मुक्तीच होय. ज्याप्रमाणे संथ पाण्यातच यथातथ्यपणे प्रतिबिंब पडते तसे समतोल मनातच सत्य, नित्य व नूतन अशा वर्तमानकाळाचे प्रतिबिंब पडू शकते. अशा समतोलपणातून होणारे सर्व कार्य मुक्तिप्रदच असते. असे मन त्रिकालातीत असते.

# ॐ चे व्यावहारिक महत्त्व

—लेखक—योगाचार्य का. बा. सहस्त्रबुद्धे

हरदासवाडी, ठाणे (पूर्व) नं. ३.

ॐ काराचे वैभव, उपनिषदे, गीता आणि इतर बऱ्याच ग्रंथांनी मुक्त कंठाने गाइले तरी त्यातल्या त्यात दशोपनिषदातील मांडूक्य नांवाचे उपनिषद हे केवळ ॐ कारालाच वाहिलेले आहे.

वास्तविक अशा विषयावर लिहिण्याइतपत माझ्यासारख्या एका योग-विद्यार्थ्याला अधिकार नाही, हे मी प्रथमच नमूद करतो. अधिकाराने लिहिण्याचा आव आणण्याचा व विषयावर विस्ताराने लिहिण्याचा उद्देशही अभिप्रेत नाही. पण आमच्या रोजच्या योग कार्यक्रमात ॐ चा उच्चार आम्ही करतो म्हणून ही लिहिण्याची स्फूर्ति झाली.

सर्वसामान्य व्यक्तीला शक्य तितक्या थोडक्या व सुबोध रीतीने ॐ काराची माहिती उपलब्ध करून द्यावी एवढाच उद्देश आहे. ॐ या मंत्राचे महत्त्व व अर्थ श्रीकृष्ण भगवद्‌गीतेत सांगतात :–

**ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।**

**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ।।८।।१३।।**

जो सर्व द्वारांचा निरोध करून मनाला हृदयात स्थिर करून व दोन भुवयांच्या मध्यभागी आपल्या प्राणवायूला निश्चल करून योगाभ्यासामध्ये स्थिर होतो आणि निर्विकार ब्रह्माचा वाचक जो ॐ हे अक्षर एक आहे ते उच्चारून माझे स्मरण करीत देहाचा त्याग करतो तो उत्तम गतीला जाऊन पोहोचतो.

ॐ हे एकाक्षर ब्रह्म आहे–**तस्य वाचकः प्रणवः** असे पातंजल ऋषींनी सांगितले आहे. ॐ कार म्हणजेच प्रणव. हा एक प्राचीन वैदिक काळांतील मंत्र आहे. प्रत्येक स्तोत्र व मंत्राची सुरुवात ॐ पासूनच होते.

ॐ हा मंत्र आमच्या गुरुदेवांनी (पू. सत्यानंद स्वामी मुंगेर, बिहार) अजपाजप-ध्यान व रोजच्या कार्यक्रमांत ३, ११, १३ किंवा १०८ वेळेस म्हणण्यास शिकविला आहे.

ॐ कार ३।। मात्रांचा आहे अ उ म आणि अनुस्वार ही अर्धमात्रा होय.

ॐ काराचे महत्त्व पूज्यपाद श्रीमत् आद्य शंकराचार्य यांचे परमगुरू पूज्यपाद गौडपादाचार्य आपल्या एका कारिकेत सांगतात :—

**अकारे नयते विश्वमुकारश्चापि तैजसम् ।**
**मकारश्च पुनः प्राज्ञाऽर्धमात्रे विद्यते गतिः ॥१–२३ ॥**

अकार विश्वाचे ज्ञान करून देतो, उकार तजसाची, मकार विद्यादानाची आणि ज्या ठिकाणी मात्रा नाहीशा होतात त्या ठिकाणी म्हणजे तुर्या अवस्थेत जन्ममृत्यु प्रवास संपतो.

ॐ काराचे वर्णन करताना ज्ञानदेव म्हणतात :—

**जया ॐ काराचि कुशी । अक्षरे होती अ,उ, मकारेसी ॥ ज्ञानेश्वरी अ. ९, ओ. २७६.** संत शिरोमणी ज्ञानदेवानी ॐ हा सर्व मंत्रांचा राजा आहे असे सांगितले आहे. ॐकाराच्या उपासनेचे ऐहिक व पारमार्थिक वैभव साधकाला साध्य करता येते पण त्याला साधना अत्यंत नियमित असावी लागते.

प्रभु रामचंद्राने आपल्या परमभक्त हनुमानाला ॐ काराचे स्वरूप सांगितले होते. या ॐ काराचे ज्ञान व महत्त्व साधारण जनामध्ये जेव्हा कमी होत चालले त्यावेळी श्रीमत् शंकराचार्य, ज्ञानेश्वर, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, स्वामी शिवानंद, पू. जनार्दन स्वामी, पू. सत्यानंद स्वामी, साईबाबा यांच्या सारख्या थोर पुरुषांनी त्यांचे गुणगान करून पुनरुत्थान केले आणि याची प्रतिष्ठा कायम राखली.

माझ्या माहितीत ॐ च्या साधनेत म्हणण्याच्या दोन पद्धती आहेत.

१) ॐ म्हणायच्या अगोदर छातीत पूर्ण श्वास भरून घ्यायचा (पूरक) नंतर श्वास सोडत (रेचक) असताना अ, उ हे स्वर ॐ पैकी ३/४, नंतर श्वास संपत आला की १/४ म म्हणून मंत्र संपवायचा—कमीत कमी एक ॐ ३५ सेकंद म्हणण्याची संवय झाली पाहिजे. असे ॐ ३,११,१३ किंवा १०८ वेळा जपावे. मनाला भ्रूमध्यात केंद्रित करावे.

२) ॐ काराचा जप त्याचे स्वरूप, खास भाव व अर्थ ध्यानी घेऊन मग करावा. जप करणाराला मनाची अतीव एकाग्रता लागते. अंत:करणावरील आवरणे हळूहळू नष्ट होतात.

ॐ चा जप करावा.

जपाचे तीन प्रकार वैखरी (तोंडाने मोठा शब्दोच्चार) मध्यमा (तोंडातल्या तोंडात हळूहळू आवाज) व पश्यंती (मानसिक मनातल्या मनात) या तिन्हींत मानसिक चे महत्त्व जास्त १०८, १० हजार किंवा १ कोटी जप केल्याने आत्मसाक्षात्कार झाल्याची उदाहरणे आहेत.

साधक प्रणवाशी तादात्म्य पावतो.एकचित्त होतो. त्यांच्या अर्थाशी एकरूप होतो– ज्याप्रमाणे साबणाच्या सान्निध्याने त्याच्या पाण्याच्या आस्तित्वाने वस्त्रातील व इतर जिनसामधील मलीनता धुतली जाते त्याचप्रमाणे ॐ कारामुळे मनाचे मालिन्य, विचारांची घाण धुतली जाते व धूत वस्त्राप्रमाणे मन स्वच्छ व शुद्ध होते. साधकांनी अभ्यास करून अनुभव घ्यावा.

तुम्ही ओंकाराचा जप करा किंवा कोणताही मंत्र जप करा पण त्यात सातत्य पाहिजे. त्यामुळे मानसिक व अध्यात्मिक संस्कारात वाढ होते. हा जप सातत्याने केल्यास विषय वासना क्षीण होतात, व मनुष्याचा ओढा दैवी संपत्तीकडे वळतो, सात्त्विक विचार जागृत होऊन वाढ होते.

ॐ चा जप किंवा उच्चार अत्यंत भाविकतेनेसकाळी ब्राह्ममुहूर्तावर उठून शुचिर्भूत होऊन काया-वाचा-मने करावा. बाहेरचे विचार मनात येऊ देऊ नयेत. हा जप देवघरात किंवा एखाद्या स्वच्छ जागी बसून (सुखासन, पद्मासन किंवा सिद्धासन) करावा. साधनेच्या अगोदर देहाची व मनाची स्वच्छता व शुचिता ठेवावी. अभ्यासाने या गोष्टी साध्य होतात. स्त्रियांनी सुद्धा ती साधना अवश्य करावी. क्रोध, राग, द्वेष व इतर विकार नाहीसे होतात. मन निर्विकार करून जप करावा म्हणजे मानसिक बल स्मरणशक्ति-सहनशीलता वाढते. असा बराच लाभ होतो. या उपासनेचे फळ बऱ्याच गोष्टीवर अवलंबून असते. पूर्वसुकृत–गुरुकृपा आणि साधकाच्या साधनेची भिन्नता यावर ते अवलंबून असते.

श्री साईबाबांच्या चित्रामागे मोठे ॐ चे रंगीत चित्र काढून त्यावर किंवा आपल्या इष्ट देवता व ॐ वर टक लावून ५–१० मिनिटे सतत पाहावे व जप करावा––ध्यान मनन चिंतन-करता करता डोळे मिटावे व नंतर तेच चित्र आपल्या अंतःचक्षूसमोर दिसले पाहिजे. जप चालू ठेवावा. काही परदेशी वैज्ञानिक व योगाभ्यासकांनी ॐ चे अलौकिक सामर्थ्य अनुभवूनत्याला Thy mystic word of power असे संबोधिले आहे.

जपापेक्षा शतपट श्रेष्ठ ध्यान आहे व ध्याना पेक्षा शतपट श्रेष्ठ लय आहे असे शास्त्रकार म्हणतात पण तो लय मननाधीन असल्यामुळे गुरुगम्य शास्त्रशुद्ध ॐ

द्वारा सहजसाध्य आहे. विश्वातील सर्व मंत्रात ॐ मंत्रा इतका लघुत्तम व सर्वच दृष्टीनी वैशिष्ट्यपूर्ण मंत्र अन्य कोणताच नसल्यामुळे ॐचाच स्वीकार केलेला आहे.

बायबल मध्ये लिहिले आहे की In the Begining was The Word. The word was with God. The word was God or Amen. हा 'आमेन' शब्द ॐचा अपभ्रंश असावा. शुद्ध स्वरयुक्त ॐ काराच्या उच्चारातील दिव्य सांगितले: कुंडीलिनी नामक सर्पाकार चित्शक्ति असलेले तत्त्व जागृत होऊन डुलू लागेल. संपूर्ण शरीरात Vibrations स्पंदन सुरू होईल. शरीर थरथर कापू लागेल व रोमांचिता होईल. घाम सुटेल. थोडक्यात, बरेच चमत्कार अनुभवास येऊन मनुष्य पुढे साक्षात तेजोब्रह्म बनतो. हा जप सतत ७५-८० वर्षा पर्यंत चालू ठेवल्यास शरीर निरोगी ठेवून मानवाला परमार्थमार्गी करण्यासाठी ॐकार समर्थ आहे.

दीर्घ प्रणवाचा म्हणजे ॐ चा उच्चार करताना जो नाद होतो त्यावेळी चित्ताची एकाग्रता होऊ लागते. आपली फुफ्फुसे व हृदय बलवान होतात. शरीरातील काही ग्रंथीवर परिणाम होऊन त्या सशक्त होतात व अज्ञानपणे का होईना रक्तदाब मधुमेहावर चित्ताच्या एकाग्रतेमुळे बराच चांगला परिणाम होतो. या क्रियेला Psycho physiological व psychosomatic असे म्हणतात. मनुष्याने कधीही रिकामपण मिळाल्यास ॐ चा उच्चार सुरू करावा. मंत्राचा ध्वनि शक्य तो मधुर काढण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे मनावर व शरीरावर उत्तम परिणाम होऊन मानसिक दुर्बलता (Nervousness.) दूर होते.

ॐ चा जप म्हणजेच प्रणवाचा जप. प्रणवोच्चाराने शरीरातील विकृति काहीं दिवसानंतर बरी होते. मन व शरीर उद्योगरत ठेवून ॐ काराचा जप नियमित चालू ठेवणारांस रोगांचा प्रादुर्भाव होत नाही.

प्रतिकारशक्ति बलवत्तर होते. अशा सामर्थ्यवान वैभवपूर्ण उच्चारसुलभ आणि त्वरित फलदान करणाऱ्या ॐ काराची उपासना केल्याने फ्लू, न्युमोनीया, टायफाइड, एनफ्युएंझा व मानसिक अशक्तता व इतर शारीरिक व मानसिक विकार आपल्या जवळ येणार नाहीत इतकी आपल्यात प्रतिकार शक्ति तयार होते, हा लेखकाचा अनुभव आहे.

हजार ब्रह्महत्या, अगणित अगम्यगमन एका ॐ काराच्या ध्यानाने भस्मसात होतात. (सध्याच्या वैज्ञानिक किंवा पाश्चात्य शिक्षणतज्ञाला हे पटायचे नाही). प्रण-

वाच्या उच्चाराने ज्याची वाणी शुद्ध झालेली आहे तो कोणत्याही जातीचा असो त्याला ब्रह्मज्ञान प्राप्त होते आणि त्यांची सर्व पापें जळून भस्म होतात.

अकारे तु भवेद् ब्रह्मा। उकारे विष्णुरुच्यते।
मकारे तु भवेद् रुद्र।ॐ कार: परमं पदम्।।

अकारे ब्रह्मदेव, उकारे विष्णु, मकार रुद्र अशा तिहींच्या तेजाने बनलेला ॐ कार सर्व श्रेष्ठ होय.

ओमित्येतदक्षरमुद्‌गीथमुपासीत। य उद्‌गीथ: स प्रणव:। असौ वा आदित्य उद्‌गीथ एष प्रणव:। ओमिति।।

छांदोग्योपनिषत् १: १-१; ५-१.

ॐकार-बिंदु-संयुक्तं नित्यं ध्यायन्ति योगिन:

कामदं मोक्षदं चैव ॐ काराय नमो नम: ।।

याचा अर्थ असा-

उद्‌गीथाची म्हणजे ॐ या अक्षराची उपासना करावी. जो उद्‌गीथ तोच प्रणव.हा आदित्य उद्‌गीथ, तोच प्रणव होय व ॐकार होय.

म्हणून माझ्या सर्व योगप्रेमी व सांईभक्त बंधुभगीनींनी' साधकांनी व भगवद्‌भक्तांनी ॐ कारमय व्हावे व स्वास्थ सौख्य व समाधान अनुभवावे हीच प्रार्थना.

# साईनाथ

## श्रीसद्गुरुसाईमहाराज ललित चरित्र

लेखक: र. श्री. पुजारी (पुणे)

### ८. जो खरा शिष्य झाला तोच परम पदाचा अधिकारी झाला.

रात्रीचे बारा वाजून गेले. सर्वत्र काळकुट्ट अंधार झाला. माशिदी भोवती तर काजळासारखा काळा अंधार पडला. अशा अंधारात मशीद एखाद्या भुताप्रमाणे उभी होती. तेथे यावेळी कोण जाणार ? वस्तीस तरी कोण राहाणार ?

पण जगात आश्चर्ये काय थोडी आहेत !

अशा काळोख्या रात्रीही मशिदीत तीन व्यक्ती होत्या. अगदी शांतपणे त्या तेथे झोपी गेल्या होत्या.

अपराधी अंधारात बसण्याचा प्रसंग आलाच तर माणसे आधी शेकोटी पेटवून उजेड करतात. त्या उजेडाच्या आश्रयाने एकमेकांना खेटून बसून भीतीने गार पडलेल्या अंगात ऊब आणू लागतात. बसलेली वाचा थोडी सुटावी म्हणून इकडच्या तिकडच्या गप्पा उकरून काढतात. मग मनाला एकमेकांच्या, थोडा आधार वाटताच हास्यविनोदही करू लागतात. जणू ही मंडळी येथे अंधारात बसून शेकोटीची मजाच लुटत आहेत !

परंतु येथे तर असा काहीच प्रकार दिसेना. उलट त्या तीन व्यक्ती जाग्याही नव्हत्या. गाढ झोपल्या होत्या. जणू ही उघडीवाघडी मशीद म्हणजे गाद्यागिरद्यांनी वैभवशाली केलेला एक दिवाणखानाच !

तेथे झोपलेल्या त्या तीन व्यक्तींपैकी एक व्यक्ती तर अगदीच पोरसवदा होती. तिच्या गालांवर किंवा ओठांवर अजून लवसुद्धा दिसत नव्हती. थंडीच्या वेळी उबदार गोधडीत गुरफटून आईशेजारी झोपण्याऐवजी हे वेडे कोकरू हट्टाने या मशिदीत आले होते. कांबळ्यावर पाठ टाकून आपल्या मामाशेजारी झोपले होते.

झोपलेली दुसरी व्यक्ती मध्यम वयाची. लांब शेंडीची. करंगळीएवढे जाड जानवे खांद्यावर असलेली. संध्याकाळच्या वेळी केलेल्या संध्येच्या वेळेचे भस्म अजून कपाळास, दंडास असलेली. दैवज्ञ ब्राह्मण जातीचा अभिमान बाळगणारी.

ब्राह्मणधर्माच्या सर्व खुणा देहावर असलेली ही कुटुंब वत्सल व्यक्ती आपले घर आणि बायकामुले सोडून या मशिदीत येऊन का बरे झोपली असतील ? मुलाबाळांचे चांगले भरलेले घर सोडून जीव रमविण्यासाठी एखाद्याने कबरस्थानात जाऊन बसावे अशातीलच हा प्रकार ! परंतु येथे तर नावालासुद्धा कोणाची कबर नाही.

खरोखरच या तीन व्यक्ती मोठ्या विचित्रच होत्या खऱ्या !

कारण जागेपणी त्यांचे बोलण्याचे विषय, वागण्याच्या तऱ्हा, रात्री झोपण्यासाठी निवडलेली जागा, आणि या सर्वात कळस म्हणजे झोपण्याची त्यांची विचित्र पद्धत—सारे काही और होते ! अगम्य होते !

तेथे झोपणाऱ्या एकूण व्यक्ती किती, तर तीन ! पण तिघांची डोकी भिन्न भिन्न दिशांना ! सर्वांचे पाय मात्र न चुकता एकच जुळविलेले ! जणू तीन शिरे, सहा हात, पाय मात्र एकत्रित !

काळ्या रेघोट्यांनी कोणी एखाद्याने सहज रेखाटावे त्याप्रमाणे दिसणारे त्रिमूर्तीचे हे विचित्र चित्र जमिनीवर काही वेळ स्थिर झाले असेल नसेल, त्रिमूर्तीपैकी एक मूर्ती डोळे साफ उघडून पाठीखालच्या गोणपाटावर उठून बसली. अंधारातच समोरच्या कोपऱ्याकडे गेली. ढलप्यांच्या ढिगाऱ्यात हात घालून दोन तीन ढलप्या खाली ओढल्या. समोरच्या मंदावलेल्या धुनीत घातल्या.

मग धुनी जशी हळूहळू प्रज्वलीत होऊ लागली तशी ती व्यक्ती तेथून उठली. मोठ्या खुषीने आपल्या छोट्या दाढीवरून हात फिरवीत बाहेर कोठे निघाली. अंधारातच पायऱ्या उतरून चालत गेली. दहा पाच पावले चालल्यानंतर आकाशातील तारकांच्या प्रकाशात आपला नेहमीचा बसण्याचा दगड पाहून त्याच्यावर बसली. डोळे भरून, मोठ्या प्रेमाने मशिदीकडे पाहात राहिली.

मशिदीच्या एका कोपऱ्यात विटेवर मातीची एक पणती इतका वेळ तेवत होती. तिचा मंदसा प्रकाश त्या दोनखणी मशिदीत रेंगाळत होता. परंतु बाहेर रात्र वाढू लागली तशी पणतीतील ती ज्योत पेंगुळली. त्या तीन व्यक्तींचे मोठ्या प्रेमाचे बोलणे, हास्यविनोद ऐकता ऐकता एखाद्या बालकाप्रमाणे तिचाही केव्हा डोळा लागला, कळले नाही.

आता तर किडामुंगीसकट सर्व प्राणी झोपले. सबंध शिरडी गावात जागी अशी व्यक्ती एकच उरली. ती म्हणजे दगडावर बसून समोरच्या आपल्या मशीदमाईकडे मोठ्या प्रेमाने पाहाणारी त्रिमूर्तीमधील ती एक मूर्ती! कफनीधारी मूर्ती!

मशिदीमधील धुनी यावेळपर्यंत चांगली प्रज्वलित झाली होती. तिच्या लाल पिवळ्या सुंदर ज्वाळा तर बाहेरील त्या दगडावरूनही दिसत होत्या. जणू मशीद आतून कोणी सोनेरी मुलाम्याने मढविली होती!

किती तरी वेळ ती व्यक्ती बाहेरच्या त्या दगडावरच होती.
स्वतःशीच निमग्न होती.

धुनी जशी पुन्हा मंदावलेली दिसू लागली तशी ती व्यक्ती आत आली. धुनीजवळ जाऊन धुनी पुन्हा प्रज्वलित केली. जणू अग्निहोत्र घेतलेल्या कोणा तेजस्वी ब्राह्मणाच्या पवित्र होमकुंडातील हा अग्नी. त्याची उपासना हा विश्वशांतीचा मार्ग. एक क्षणही या पवित्र अग्निदेवतेस विसंबून भागण्यासारखे नव्हते.

कशी कोण जाणे, सहस्त्र घंटाचा नाद कानावर यावा तशी ती मध्यमवयीन ब्राह्मण व्यक्ती झोपेतून एकदमच जागी झाली. आपल्या कांबळ्यावर उठून बसली. शरमेने अर्धमेली होऊन स्वतःचा धिःकार करू लागली.

मनाशी म्हणू लागली: अष्टौप्रहर गुरुसहवास लाभावा, येणाऱ्या प्रत्येक क्षणी हातून गुरुसेवा घडावी म्हणून तर कुटुंबातील मंडळींचा रोष पत्करून झोपण्यासाठी येथे आलो. पडल्याबरोबर लगेच झोप लागू नये म्हणून खळगेपडलेल्या, उखणलेल्या या जागी घोंगडी अंथरली. पण दैवाने पुन्हा घात केला. येथे येऊनही गाद्या गिरद्यांवर झोपावे तसा कुंभकर्णाप्रमाणे डाराडूर झोपी गेलो! जणू पडत्या फळाची आज्ञा!

मनुष्यस्वभाव तरी खरोखर किती विचित्र!

बाबा येथे एकटेच झोपत, तेव्हा त्यांच्या आठवणीने मी घरी रात्ररात्रभर तळमळत असे. रडत असे. पहाटेपर्यंत डोळ्यास डोळा नसे.

अंतर्ज्ञानाने हे जाणूनच की काय, बाबांनी मला येथे झोपण्यास परवानगी दिली. ती तेवढी मिळाली मात्र—हरिदासाची कथा मूळ पदावर! तमोगुण पुन्हा जागा झाला. बाबांच्या या पवित्र स्थानी येऊनही निद्रेने घेरले!

कीर्तनास मोठ्या भक्तीने जावे आणि तेथेही निद्रेने घेरावे! विषयवासनेतच मन बुडून राहावे!

खरोखरच या जन्मी कितीही जागरुक राहून हरिचिंतन करण्याचा प्रयत्न केला तरी गुरुकृपेविना तो तडीस जाणे कठीण. पूर्वजन्मीचे एखादे पाप केव्हा प्रकट होईल आणि ऐन वेळी कसा घात करील नेम नाही.

सदगुरुवाचून जप-तप-अनुष्ठान सर्व व्यर्थ, हे ज्या क्षणी मनास पटले त्या क्षणी जणू पुनर्जन्म झाला. शेकडो वर्षांच्या झोपेतून जणू जाग आली. पण असे सग्दुरु कोठे भेटणार ? त्यांना ओळखणार तरी कसा ? चारचौघाप्रमाणेच असलेली ती एक देहधारी मूर्ती. कोळशांच्या खाणीत जन्म घेतल्यामुळे वरून कोळशाप्रमाणेच मूल्यहीन भासणारा हा एक स्वयंप्रकाशित हिरा.

रात्रंदिवस तळमळू लागलो. दिवसच्या दिवस खंडेरायाच्या देवळापलिकडील अरण्यात जाऊन बसू लागलो. गुरु भेटविण्यासाठी आक्रोश करून खंडेरायाची विनवणी करू लागलो.

देवीदासबाबा महान सत्पुरुष. सुंदर बांधा सतेज डोळे. प्रथम येथे आले तेव्हा फार तर दहा अकरा वर्षांचे असतील. परंतु वैराग्य शुकाचार्यासारखे धगधगीत. वाणी गंगेसारखी निर्मळ.

आले ते प्रथम मारुतीच्या देवळात उतरले. कमरेस एक लंगोटी. मुखी अखंड नाम. एवढ्या लहान वयातहि ते तीर्थाटने करीत होते. समर्थ रामदासांप्रमाणे उपासना चालू होती.

मी, काशीराम, अप्पा जागले, अप्पा भिल्ल—अशी किती तरी तरुण मंडळी तेथे जात असू. त्याना शिधा वगैरे नेऊन देत असू. त्यांचा उपदेश ऐकत असू.

होता होता गावातील पुष्कळच मंडळी तेथे येऊ लागली. त्यांना देवीदासबाबा व्यंकटेशस्तोत्र शिकवू लागले. सर्वांकडून व्यंकटेशस्तोत्राचा नित्यपाठ करून घेऊ लागले. अप्पा भिल्लाला तर त्यांनी धूळपाटीवर अक्षरे कशी काढावी हेही शिकविले. या समोर झोपलेल्या बायजाबाईच्या पोराला—तो त्यावेळी अगदी लहान होता तरी उपदेश दिला.

अशा महाज्ञानी, परम वैराग्यशील देवीदासबाबांकडे त्यावेळी मी गेलो. मनाची व्यथा त्यांना सांगितली. तेव्हा ते म्हणाले,- "म्हाळसापती ! शेतजमिनीच्या अंगाची लाही लाही होते, तेव्हाच कोठे आकाशातील पर्जन्यराजास तिची दया येते खरे ना ? सग्दुरु मातेहूनही दयाळू. आपल्या पाठीमागेच तर ते उभे असतात. कौतुकाने आपल्या लेकराची कृती पाहात असतात."

"लेकरू आपल्या पायांनी चालता चालता कोठे पडले, त्याला खरचटले, ते रडू लागले की सग्दुरु धाव घेतात. अचलून वात्सल्यभावाने आपल्या हृदयाशी धरतात. तसे तुमचे सग्दुरू एक दिवस तुम्हास भेटतील. मनाचे पूर्ण समाधान करतील."

संताची वाणी सत्यस्वरुप. गंगेप्रमाणे पवित्र. वर्तमान-भूत-भविष्य जाणणारी.

देवीदासबाबांच्या शद्बांनी मनास एकीकडे दिलासा मिळाला. दुसरीकडे मनाची तळमळ तीव्र झाली. रात्ररात्रभर रडू लागलो मनाशीं म्हणालो: सग्दुरो ! मायबापा ! माझे आता या बागेसरीत आणखी किती दिवस जळत राहू ? सर्व हीण अजून जळाले नाही का ? अजूनही शुद्ध झालो नाही का ?

एक दिवस गावात बातमी आली: रानात निंबाखाली कोणी एक साधू प्रकट झाला आहे. तो वयाने अजून पोर आहे. जातीने मुसलमान आहे. तो साधू निंबाखाली बसून रात्रंदिवस जप करीत असतो.

हातातील काम टाकून मी धावतच गेलो. त्या मुलाला पाहिले. अगदीच कोवळ्या वयाचा तो एक मुलगा. हसरा. गमत्या. मनात म्हटले: कुरुक्षेत्रावर अर्जुनाला गीता सांगणारा तो चक्रपाणी द्वारकेत प्रथम प्रकट झाला तेव्हा असाच तर दिसत नसेल ! डोक्यावरील मोरपिसे, हातातील बासरी त्याने या रानात कोठें दडवून तर ठेवली नाही !

माझ्या मनातील वात्सल्य एकाएकी जागृत झाले. त्या मूर्तीला कन्हैया, कृष्णा, मुकुंदा, देवकीबाळा या नावानी संबोधावे असे वाटले. पण मी उगी राहिलो. मनाशी विचार केला: दारी आलेल्या प्रत्येक साधूकडे 'गुरु' म्हणून मी पाहिले. पण ते कोणीही माझे गुरू नव्हते. हा मुलगाही माझा गुरू असणार नाहीत. पोक्त, प्रगल्भ, शांत, समतोल, ज्ञानी, वत्सल अशी ती गुरूमूर्ती असली पाहिजे. ती मला एक ना एक दिवस भेटल्याविना राहाणार नाही.

मनात असा संशय, परंतु रोज सांजसकाळ त्या मुलाच्या दर्शनाला जाऊ लागलो. हात जोडून मनोमन प्रार्थना करू लागलो: देवा ! तुम्ही कोणीही असा. पण एवढी भीक घाला. माझ्या सग्दुरुंना मला भेटवा.

तो मुलगा मजकडे पाहून केवळ हसे.

एकच शद्ब बोले, " अल्ला-मालिक !"

एक दिवस तो मुलगाही निंबाखालून कोठे निघून गेला. लोकांनी रानात शोध शोध शोधले. पण कोठेही आढळला नाही.

ते भुयार पुन्हा कोणी उकरू लागले. त्या समया, ती जपमाळ तरी आहे की नाही पाहू लागले. तेव्हा गावातील पोक्त माणसे म्हणाली, "ते भुयार उकरू नका. तशी आज्ञा नाही. उकराल तर खोडयात याल,. गावावर मोठे अरिष्ट येईल."

खरोखर ते गूढ स्थान म्हणजे त्या बालसाधूच्या गुरूंची समाधी असेल का ? समाधीसमोर बसून त्या मुलाने बारा वर्षे या रानात तप केले हे खरे असेल का ? परंतु

खोटे तरी कसे म्हणता येईल ? तो बालसाधू कधीही खोटे बोलणार नाही. जत्रेच्या वेळी प्रत्यक्ष खंडेरायांनीही असेच सांगितले, ते तर कालत्रयीही खोटे ठरणार नाही. थट्टा असणार नाही.

अशा रीतीने तो निंब, ते भुयार तेथेच राहिले. लोक पुन्हा आपल्या व्यवहारात गढले. मीही धंद्यात लक्ष घालू लागलो.

पण मन लागेना. गुरुभेटीची तळमळ शमेना.

पुन्हा रानात जाऊ लागलो. खंडेरायापुढे धरणे धरले.

एक दिवस देवीदासबाबा मला म्हणाले, "म्हाळसापती ! तुम्ही असे उदास का ? गुरुभेट होऊनही तुमच्या मनास शांती कशी नाही ?"

आश्चर्याने मी थक्क झालो.

त्यांच्या मुखाकडे पाहातच राहिलो.

तेव्हा हसत हसत ते म्हणाले, "रानात निंबाखाली प्रकट झालेले बालसाधू म्हणजे दुसरे कोण ? तुमचे गुरूच !"

मी अत्यंत दुःखी झालो. निधान अनायासे हाती यावे आणि त्याची ओळखच पटू नये ! तसे झाले.

गुरूदर्शन झाले; पण गुरूसहवास लाभला नाही. गुरूसेवा घडली नाही. केवळ बघ्या झालो. खरे-खोटे करीत बसलो. अशा तर्कटवाद्यावर गुरुकृपा काय होणार ! गुरू कंटाळले. आले तसे एक दिवस निघून गेले.

पुन्हा तळमळू लागलो. साईदेवा ! साईराया ! साईनाथा ! म्हणून हाका घालू लागलो. रात्रंदिवस साई-साई-साई हा एकच मंत्र जपू लागलो. आणि काय आश्चर्य, एक दिवस खंडेरायाच्या देवळाशीच ते भेटले. छत्रपती पितापुत्रांची भेट खंडेरायाच्या साक्षीने बारा वर्षानंतर झाली तसा भेटीचा योग आकस्मिकपणे आला.

त्यावेळी गुरूदेवांना मी काय म्हणालो बरे ? त्यांचे स्वागत कसे केले ? अजूनही आठवते. त्यावेळी मी त्यांना म्हणालो: आवोजी, आवोजी मेरे प्यारे साई !

साई-साई या मंत्रामुळे असेल किंवा वात्सल्य भावामुळेही असेल; मी त्यांना त्यावेळी 'साई' म्हटले. पण आज वाटते: पिता-पुत्रांची ती भेट नसून माय-लेकरांची ती भेट होती. ते साई नसून 'आई' होते.

मग त्यांना घेऊन गावात गेलो. काशीराम, अप्पा यांच्याशी भेट करविली देवीदासबाबांशी भेट करविली. पुढे जानकीदासबाबांशी, गंगागीरमहाराजांशी आनंदनाथ महाराजांशी त्यांची भेट झाली. पण हे माझे गुरू ही वाच्यता मी केली नाही. मनाशी विचार केला: दैवयोगे रत्न हाती आले. ते नीट सांभाळले पाहिजे लोकात फारशी वाच्यता होणेही बरे नव्हे.

माझा हा दृढनिश्चय तडीस नेण्याचे ब्रीद तर गुरुरायांनी मनाशी बाळगले नसेल ?

कारण साधुत्वाची अंगावरील कवचकुंडले त्यांनी कोठे पुन्हा दडवून ठेवली. गावातील कोणत्याही गल्लीत आढळणाऱ्या एखाद्या कलंदर, गुलहौशी, रंगेल, तालिमबाज तरुणाचा आवेश अंगात आणला. केसांची झुलपे हालवीत, मिशीला पीळ भरीत, छाती पुढे काढून सकाळदुपार गावातून फिरू लागले. लोकांच्या कळी काढून कुस्तीची आव्हाने स्वीकारू लागले. अखेर एका तेढाचे रूपांतर कुस्तीत होऊन त्या मोहिद्दिन तांबोळ्याने याना पाडले. चारी मुंड्या चीत करून, यांना माती चारून, चांगले घुसळून तो यांच्या उरावर बसला.

तेव्हापासून याना जणू उपरती झाली.

डोक्यावरील ऐटबाज केशसंभार गेला. ऐटबाज कपडे गेले. जणू या अपमानाने पूर्ण विरक्त झाले. जगाच्या मैदानात अहंकारामुळे चारीमुंड्या चीत झालेल्या एखाद्या प्रापंचिक योद्ध्याप्रमाणे !

जे मूर्तिमंत वैराग्य, त्यानी वैराग्याचे हे नाटक तरी का केले असेल बरे ? अहंकाराचा शोकान्त लोकांपुढे ठेवण्यासाठी ? लोकाना शिकवून शहाणे करण्यासाठी ? पण हे करून त्याना काय मिळाले ? धोंडे न मारणारा एक वेडा-बावळा फकीर या लोकमताविना दुसरे काय ?

मशिदीत येण्यापूर्वी तकियात, एखाद्या देवळाच्या ओसरीस झोपत असत; पायांत चाळ बांधून खंजिरीच्या तालावर तासन तास नाचत-गात असत; मुरळ्यांचा नाच किंवा कव्वाल्या पाहाताना किंवा ऐकताना रंगून डोलत असत; वाहवा ! वाहवा ! बहोत अच्छा ! म्हणून ओरडत असत, हे तरी काय लोकाना माहीत नाही ?

या सगळ्याचा अर्थ इतकाच की लोकानी आपल्या नादी लागू नये. आपणास गुरू समजू नये. आपले देव्हारे माजवू नयेत.

पण कस्तुरीने कसलाही बुरखा घेतला तरी तिचा सुवास लोकांपर्यंत पोचायचा थांबणार थोडांच !

हा वेडा फकीर कितीही वेळा दारी येवो, कपाळभर कुंकू लावलेल्या बायजाबाईसारख्या स्त्रिया हातात भिक्षा घेऊन दारात हजर !

लोकांच्या मनातील एवढीही भक्तिभावना पुसून टाकण्यासाठी की काय, कुस्तीप्रमाणेच पुन्हा एक प्रकार गुरुदेवांनी केला. रहात्याहून आलेल्या त्या जव्हारअलीचे शिष्य आपण झाले. त्याच्या अगदी आज्ञेत राहिले. रात्रंदिवस मशिदित त्याची सेवा करू लागले. एक दिवस तर ही मशीद सोडून रहात्यास त्याच्याबरोबर निघूनही गेले.

त्या दिवशी माझ्यावर पुन्हा आकाश कोसळले. वाटले: शिरडी सोडून बाबा पुन्हा गेले. आता ते कसचे परत येणार !

पण दोन दिवस काही गेले नसतील ते पुन्हा परत आले. म्हणाले, "म्हाळसापती ! ही पाहा फुलझाडांची काही रोपे. आणि या फांद्या. रहात्याच्या चंद्रभानशेट मारवाड्याने हे दिले आहे. आता उत्तम माती आणून चांगले झकास वाफे करून आपण बाग करू."

मला वाटले: बाबांचे मन रहात्यास रमत नाही म्हणून ते पुन्हा आले. पण कसचे ! दोन दिवस काही गेले नसतील. पुन्हा ते जे गेले ते तिकडचेच झाले.

पुन्हा माझ्या मनाची घालमेल सुरू. धंद्यात लक्ष लागेना. अन्न गोड वाटेना.

एक दिवस काही मंडळींना बरोबर घेतले. रहात्यास गेलो. तेथे समजले की जव्हारअल्ली ही फार बडी असामी आहे.

एकदा त्याचे शिष्यत्व पत्करलेल्या पोरासोरांवरील त्याच्या हुकमतीची मगरमिठी सहसा सुटत नाही.

तेथील एका प्रतिष्ठित गृहस्थानी जव्हारअल्लीबद्दल जे सांगितले ते ऐकून तर आम्ही थक्कच झालो. ते गृहस्थ म्हणाले, "जव्हारअल्ली हा एक अत्यंत मृदुभाषी, बहुश्रुत, कुराण वगैरे धर्मग्रंथ पढलेला अति चाणाक्ष मनुष्य आहे. काही महिन्यापूर्वी तो येथे आला. आपल्या नम्र वाणीने त्याने सर्वांना भारले. गावातील अनेक भोळे लोकही त्याच्या नादी लागले "या गोष्टीचा फायदा घेऊन येथे एक इदगा बांधण्याचे ठरविले. त्यासाठी पैसेही गोळा करू लागले. एक दिवस काही लोकांच्या कानावर बातमी आली की त्याने आपल्या मुक्कामाच्या वखळीजवळचा वीरभद्र देव बाटविला.

"झाले. एवढ्या बातमीमुळे येथील लोक खवळले. त्याला त्याच्या शिष्यांसकट पिटाळून लावला.

"त्याला मग आश्रय मिळाला तो तुमच्या शिरडीत तोही एका फकिराने त्याला आश्रय दिला. तो फकीर म्हणजे जर तुमचा तो साई असेल तर मी आता येथूनच सांगतो की तो त्या जव्हारअल्लीच्या तावडीतून आता सुटणे कठीण. जन्मभर खांद्यावरून पाणी वाहता वाहता तो मेला, असेच तुम्ही आता समजा. निमुटपणे आल्या पावली तुमच्या शिरडीस जा. उगाच ब्याद नको."

त्या गृहस्थांचे हे बोलणे ऐकून आमचा धीर पार खचला. तरी पण मनाचा धडा करून, देवाचे नाव घेऊन त्या इदग्याजवळ गेलो. मनाशी विचार केला: बाबा जर एकटेच सापडले तर त्याना पळवूनही शिरडीस नेऊ. मग पुढचा प्रसंग पुढे !

परंतु झाले उलटेच. बाबा आम्हासच म्हणू लागले "तुम्ही कशाला येथे आला ? जा ! जा ! आधी पळा येथून ! ते जर एवढ्यात आले तर तुमची किंवा माझी जिवंत राहाण्याची धडगत नाही. कोंबडीप्रमाणे ते आपल्या माना कापून टाकतील ! फार वाईट आहे त्यांचा राग ! फार वाईट !"

बाबा एवढे बोलतात न बोलतात तोच तो जव्हारअल्ली एखाद्या वाघाप्रमाणे कोठूनसा तेथे आला. डोळे लालेलाल करून, क्रोधाविष्ट होऊन म्हणाला, "कोण रे हे

लोक ? का आले होते हे येथे ? काय चालल्या होत्या कानगोष्टी ? या पोराला पुन्हा शिरडीला न्यायला आला ? पण मी तुम्हांला साफ सांगतो की हा पोरगा तुम्हाला आता परत मिळणार नाही. तो माझा बंदा आहे."

त्या राक्षसाच्या या शब्दांनी आम्हा तरूण मंडळींच्या मनात क्रोधाचा अग्नि पेटला. न कळतच आमच्या अस्तन्या वर झाल्या. आता युद्धप्रसंग होणार हे त्याने ओळखले. वरमून तो बोलला, "तसे नव्हे. मी म्हणतो याचा अर्थ ध्यानी घ्या. त्याला नेणार तर मला का नाही ? मलाही शिरडीस न्या. हा पोरगा मला दिलसे भी प्यार है. मेरी जान है. और क्या कहूँ ?"

जव्हारअल्ली शिरडीस आला आणि त्याच्या धर्मज्ञानाच्या भ्रमाचा भोपला फुटला. देवीदासबाबांसमोर त-त प-प करू लागला. हे पाहून देवीदास बाबा म्हणाले. "गुरू होण्याची तर तुझी पात्रता नाहीच; पण शिष्य होण्याच्या योग्यतेचाही तू नाहीस, चल ! येथून आधी काळे कर !"

देवीदासबाबांचे हे तीव्र शब्द ऐकून जव्हारअल्ली तेथून जो पळाला, तो वैजापुरी गेला. त्यानंतर तो परवा येथे आला. बाबांसमोर गुडघे टेकून म्हणाला, "मी त्यावेळी आपला छळ केला. आज त्या गोष्टीचा पश्चाताप होत आहे. आपण क्षमा करून मला आपला मानावा."

बाबांनी त्याला क्षमा केली.

सर्वस्वाचा नाश करणाऱ्या अहंकाराचे बी किती भाजावे याची ही शिकवण. जो खरा शिष्य झाला तोच परम पदाचा अधिकारी झाला याचे हे उदाहरण. गुरुसेवेच्या आणि गुर्वाज्ञापालनाचा हा साधा सोपा आदर्श. हा आदर्श बाबांनी आम्हापुढे ठेवला.

म्हाळसापती बसल्या जागेवरून झटकन उठले.

बाबांची चिलीम तयार केली. बाबांच्या हाती दिली.

म्हणाले, "बाबा ! अजून नाही झोपला तुम्ही ? बाहेर पुष्कळ रात्र झाली."

बाबांनी एका हातात चिलीम धरली. दुसऱ्या हाताने तेथे झोपलेल्या मुलास उठवू लागले. म्हणाले, "तात्याबाळ ! उठा ! बाहेर आकाशात देवाने कसा दीपोत्सव केला आहे तो बघा !"

म्हाळसापती उठून धुनीजवळ गेले.

धुनी पुन्हा प्रज्वलित केली.

तिच्या तांबुस-लाल प्रकाशात बाबांचा चेहरा अतीव मोहक दिसत होता. जणू भगवान श्रीकृष्ण या क्षणी बाबांच्या रूपाने अवतरले होते. विश्वकल्याणाच्या विचारात निमग्न होऊन स्वतःशीच हसत-बोलत होते.

# नमस्कार माझा तुम्हां साइनाथा !

(वृत्त : भुजंगप्रयात)

—श्री. बाबुराव गांडोळे, मुंबई.

महन्मंगला आमुची भाग्यभू ही
इथें वाहते कर्मगंगा प्रवाही ।
जिच्या ज्ञानसिंधू पदीं ठेवि माथा
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥१॥

इथें जन्मले सन्त ज्ञानेशज्ञानी
तुकोबापरी देहुचे वैश्यवाणी ।
असे वर्णिता सन्त होईल गाथा
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥२॥

तुम्हां सन्तकार्यांत तें पूज्य स्थान
तुम्हां दिव्य दृष्टी, तुम्हां दिव्य ज्ञान ।
तुम्ही लाविलें भाविकां भक्तिपंथा
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥३॥

तुम्हां मानिती सर्वची भक्त देव
उदी आपुली दिव्यतेचा प्रभाव ।
जिचा स्पर्शही नाशवी घोर चिंता
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥४॥

करीं आपुल्या 'दंड' जो दुःखहारी
पिशाचादिकें—काळही ज्या थरारी ।
कृपाहस्त तो आपुला भाग्यदाता
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥५॥

नसो तेलही, नित्यनेमेचि रातीं
तुम्ही जाळिली निर्मला नीर-ज्योती ।
पदीं कौतुकें ठेविली लोक माथा
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥६॥

पदीं मुक्त तो दीन शार्दूल केला
अजा घेतल्या दाम देऊन सोळा ।
तुम्ही धांवला सर्प मंडूक खातां
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥७॥
अही, पाल, बेडूक, व्याघ्रा-अजादी
असे भोग प्रारब्धिचे वर्मभेदी।
कथारूप ती गायिली कर्मगाथा
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥८॥
कुदैवें कुणी आपुले भोग भोगी
कुणी दुःखि-कष्टी, कुणी जीर्ण रोगी ।
दिलें सौख्य त्यां लाख, कोटी अनाथा
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥९॥
महामारि गांवावरी क्रूर येतां
दळोनी स्वयें 'पीठ' केलें अनंता
महासंकटीं जाहला लोकत्राता
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥१०॥
असो हिन्दु, मुस्लीम वा तो इसाई
कुणी उच्च नाही, कुणी नीच नाहीं ।
दिला मंत्र हा एकतेचा समर्था
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥११॥
जनोद्धारणीं ग्राम उद्धार केला
दिलें भाग्य त्या शिर्डिच्या वैभवाला ।
नमो द्वारकाई–समाधिस्थ सन्ता
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥१२॥
भवाब्धी तराया प्रभूनामनौका
असे एकची साह्यदायी अनेकां ।
मिटे दुःख-व्याधी कृपालाभ होतां
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥१३॥
कृपें आपुल्या पन्त 'हेमाड' ज्ञानी
'चरित्रीं' जयें ओतिली 'व्यासवाणी' ।
शिणे लेखणीही गुणां गौरवीता
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥१४॥

* * *

# श्री साईगीतमाला

—मधुकर जोशी

गीत ५ वे

शिरडीला रामनवमीची यात्रा प्रथम साईबाबांनी सुरू केली. शके अठराशे तेहेतीस साली...रामनवमीचा पहिला उत्सव थाटाने साजरा झाला. उत्साहाला सीमा नव्हती. त्यावेळेचे हे आनंद गीत...निवेदक गात आहे——

चैतन्य रोम रोमीं चैत्रात न्हात आहे
शिरडीत राम जन्म श्रीसाईनाथ पाहे ।।धृ।।

शिरडी नव्हे अयोध्या नटली फुलाफुलांनी
गाती सुवासिनी त्या मोदें भरून गाणी।
सरिताच भक्तिची ही— सूरात गोड वाहे ।।१।।

वाजे सुरेल सनई— घुमते मधूर वीणा
वाही सुगंध वारा— घुमवीत गोड ताना !
त्या चौघड्यांत आज आनंद वाहताहे ।।२।।

आभाळ आईरूपें बघते दहा दिशांनी
धरणीवरी झुले हा.. किति पाळणा फुलांनी।
प्रभुराम जोजवितां मांगल्य नांदताहे ।।३।।

गेली मशीद फुलुनी त्या सर्व माणसांनी
अल्ला रहीम राम... नव्हतेच अन्य कोणी
प्रारब्ध हा प्रसाद कर्मांत राहता हे ।।४।।

त्या पेटत्या धुनिचा— देई प्रसाद साई
प्रभुराम कीर्तनाला हनुमान दिव्य येई
रामायणात सारे सगळेच सार आहे ।।५।।

# स्वामी स्वरूपानंद

–ले. डॉ. रा. य. परांजपे, रत्नागिरी.

(स्वामी स्वरूपानंद यांचा सत्तरावा वाढदिवस त्यांच्या भक्तांनी नुकताच मोठ्या प्रमाणावर साजरा केला यानिमित्य स्वामीजींचांहाप रिचय––संपादक.)

साईलीला मासिकाच्या वाचकांकरिता हा अल्प परिचय देण्यात येत आहे. सुमारे आठवर्षांपूर्वी त्यांचे विस्तृत चरित्र प्रकाशित झाले. त्यानंतर मराठी व इंग्रजी लहान मोठी चरित्रे प्रकाशित झाली आहेत. 'दीपलक्ष्मी या मासिकाने तीन वर्षांपूर्वी त्यांचा एक विशेषांक प्रसिद्ध केला. यामुळे महाराष्ट्रात तरी त्यांचे विषयी पुष्कळांना परिचय झालेला आहे. स्वामींचा खरा अंतरंग परिचय त्यांच्या विपुल ग्रंथ संपत्तीने गेल्या १५-२० वर्षांत चढत्या वाढत्या प्रमाणात होत गेला आहे. असे असले तरी अद्या-पहि त्यांचा परिचय नसलेली अशी पुष्कळच मंडळी आहेत.

कोकणात रत्नागिरी या जिल्ह्याच्या शहरापासून फक्त आठ मैल अंतरावर पांवस या नावाचे एक ४५ हजार वस्तीचे खेडेगाव आहे. स्वामी स्वरुपानंदांचे मूळ पुरुष गोविंद भटजी गोडबोले हे रत्नागिरी जवळील कासारवेली या गावाहून पांवस येथे येऊन स्थायिक झाले. स्वामी स्वरुपानंद यांची १०वी पिढी चालू आहे. हे एक प्रतिष्ठित घराणे म्हणून सुप्रतिष्ठित झाले होते.

स्वामींचे वडील विष्णुपंत हे एक देव माणूस होते. संसारात पूर्ण अनासक्त असून भगवंताचे नामस्मरण आणि विष्णुसहस्त्र नामाचे पाठ करणे हाच त्यांचा छंद असे. त्यामुळे स्वामींची आई सौ. रखमाबाई यानाच प्रपंचातील हरएक गोष्टींत लक्ष द्यावे लागे. घरातील वातावरण सात्विक आणि परमार्थ प्रवृत्तीला पोषक असे होते.

स्वामीचा जन्म १५-१२-१९०३ मध्ये झाला. नाव 'रामचंद्र' ठेवण्यात आलें. त्यांना दोन बंधु आणि चार बहिणी होत्या. स्वामींना रामभाऊ किंवा आप्पा या नावानें ओळखले जात असे सहाव्या वर्षी शालेय शिक्षणाला सुरुवात झाली. वयाच्या आठव्या-वर्षी त्यांचे मौंजीबंधन झाले. त्यांचे व्यक्तिमत्व अगदी लहानपणापासूनच आकर्षक होते. गौरवर्ण मंदस्मित मुखमंडल. नेत्रात दिसून येणारी बौद्धिक चमक आणि आचरणांतून प्रतीत होणारा अंतरातील गोडवा. तो हरएक व्यक्तीचे मन आकृष्ट करुन घेत असे. हा मुलगा सामान्य नसून पुढे नाव काढणार असे आईवडिलांना व इतरानाही वाटत असे. सवंगडी जमवून बालवयातील हरएक खेळ खेळण्यात हा बाल-चमूत अग्रगण्य असे.

मौंजी बंधनानंतर पूर्व संस्कारित मनाला अधिकच उजाळा मिळून त्यांचे मन आता धार्मिक आचार विचारांकडे अधिकाधिक आकृष्ट होऊ लागले. मौंजी बंधना पूर्वीचा खेळांचा हव्यास कमी होऊ लागला. संध्याविधि हा मौजीबंधना पूर्वीच वडील बंधूंच्या अनुकरणाने याने आत्मसात केला होता. स्तोत्रें, अभंग, भूपाळ्या भक्तिपर पदें वगैरे पाठांतर करण्याचा छंद वाढू लागला. क्रीडासक्त जीवनाला कालाटणी मिळून ते आता क्रीडायुक्त परंतु गीतेच्या अध्ययनात आसक्त झाले. गीतेचा हा बालछंद त्यांना ऐन तारुण्यात गीतार्थाच्या अमृतरसात खोलवर बुडी देण्याला उपकारक झाला.

वडीलधाऱ्या मंडळीकडून रामायण, भारत व भागवत यातील भावरम्य कथा ऐकण्यात याला अतीव गोडी वाटावयाची व त्यामुळे आपणहि ध्रुव, प्रल्हादाप्रमाणे थोर भक्त व्हावे ही वासना वरचेवर उफाळून येत असे. जवळच्या विश्वेश्वराच्या मंदिरात जाऊन शिवदर्शन घेताना याचा भक्तिभाव फुलत असे.

घरच्या धार्मिक संस्कारित वातावरणात आईवडिलांच्या कृपाछत्राखाली इयत्ता ४ पर्यंतचे शिक्षण पांवस येथे झाले. पुढील इंग्रजी शिक्षणाकरिता रत्नागिरी येथे यावे लागले. रत्नागिरी येथे मुद्दाम बिऱ्हाड करून त्यांची प्रेमळ चुलती त्याच्या व्यवस्थेकरिता येऊन राहिली. रत्नागिरी येथे इंग्रजी ५ इयत्तांचे शिक्षण झाले. या पांच वर्षांच्या कालात अभ्यासाबरोबरच त्यांचा सर्वांगिण विकास होत गेला. शाळेंत एक हुशार, विनम्र आणि शिस्तबद्ध विद्यार्थी म्हणून सर्वांना प्रिय झालाच परंतु या गुण-समुच्चयामुळे त्याच्या नातलग व परिचित मंडळीतहि कौतुक होत असे.

रत्नागिरी येथे आल्यानंतर त्यांना प्रियतम वाटणारे बौद्धिक खाद्य विपुल मिळू लागले व ते त्याने एकाद्या अंधारा प्रमाणे सेवनहि केले. परंतु ते नीट पचले असे मननाचे चर्वन तो करीत असे. त्यामुळे त्याचा ठसा त्याच्या आचरणात उमटत असे. तत्कालीन राजकारणाचा अभ्यास तो चिंतन पूर्वक करीत असे त्यामुळे देश प्रेमाचे वारे अंगांत संचरत होते. अशा प्रकारे या शिक्षणाच्या कालखंडात एक नवीन व्यक्तिमत्त्व तयार होत होते.

रत्नागिरी येथें इंग्रजी ५ वी पर्यंतचे शिक्षण झाल्यावर पुढील शिक्षणासाठी हा विद्यार्थी मुंबईस आपल्या मामांकडे गेला. त्याला आता विद्यार्जनाला अधिक व्यापक क्षेत्र उपलब्ध झाले. या विद्यार्थीदशेत फक्त हा शालेय शिक्षणाचा विद्यार्थी नव्हता. विश्व हेच विद्यालय आहे आणि आपल्याला ज्ञानदान करणारे अनेक शिक्षक आहेत, या भावनेने हा विद्यार्थी आपल्या अभिरुचिप्रमाणे संग्रह करण्यात सदैव दक्ष असे.

मुंबई येथे आंग्रेवाडीतील आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयात पुढील शिक्षण सुरु झाले. घारपुरे या नावाचे एक उत्तम शिक्षक याला लाभले होते. त्यांचा या विद्यार्थ्यावर विशेष लोभ होता. त्यांच्याकडून संस्कृत या विषयाची विशेष तयारी होण्यास सहाय्य झाले. त्याच प्रमाणे गीतारहस्य आणि ज्ञानेश्वरी यांच्या अभ्यासाला या शिक्षकांचे सहाय्य झाले.

आप्पा ज्यांच्याकडे रहात होते ते केशवराव गोखले हे या भाच्यावर फार प्रेम करीत ते स्वत: पुणे येथील 'बाबामहाराज वैद्य, यांचे अनुग्रहित होत. त्यामुळे ज्ञानेश्वरी वाचन आणि आत्मचर्चा चालत असे त्यावेळी हा भाचा हा अत्यंत त्यांचे आस्थेने श्रवण करीत असे. त्यामुळे याला 'सग्दुरुक्रपांकित' करावा असा मामानी विचार केला होता.

मुंबईतील या शैक्षणिक काळात प्रचलित राजकारणाराकडे तो आस्थेने पहात असे. महात्माजींचा अनत्याचारी मार्ग त्याच्या प्रकृतीला मानवला आणि स्वदेशी आणि बहिष्कार या चळवळी यशस्वी करण्यासाठी शाळेवर बहिष्कार घालून तो १९२१ मध्ये बाहेर पडला आणि पुनश्च पांवस येथे येऊन 'स्वावलंबनाश्रम' या नावाचा आश्रम काढाला.तत्पूर्वी टिळक महाविद्यालयाची प्रवेश परीक्षा देऊन तो त्यांत उत्तीर्ण झाला होता. सन १९२२ मध्ये या कार्याला सुरवात झाली.

स्वावलंबनाश्रमात अभिनव शिक्षण मिळावे अशी उखळी याने केली होती. त्यांना आता गावांत विशेष दर्जा प्राप्त झाला होता तो आता नेता आणि उत्तम शिक्षक झाल्याने आता कोणी एकेरी नावाने संबोधित नसत. म्हणून आता आदरार्थी नामाने त्यांना संबोधले. जाऊ लागले. या आश्रमात मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण द्यावे असा संकल्प ठरला. त्याच प्रमाणे स्वदेशीचे व्रत विद्यार्थ्यांनी घ्यावे यासाठी सूतकताई, खादी तयार करणे यांची जोड त्यांनी दिली. बहुतेक सर्व प्रकारचे शिक्षण हे स्वत:च देत असत.
हे स्वत: खादी तयार करुन तेच कपडे वापरीत असत. कित्येक विद्यार्थी याच प्रमाणे वागत असत. विद्यार्थ्यांची संख्या ६ पासून २/३ वर्षांत ४०, पर्यंत झाली. परंतु पुढे या शाळेत शिक्षण घेतल्यास सरकारी नोकरी मिळणार नाही या भीतीने विद्यालय बंद पाडण्याची वेळ आली. त्यामुळे विद्यालय बंद करण्यात आले.

मॅट्रिक पर्यंत शिकवून तयार केलेल्या आपल्या ३-४ विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन आप्पा आता पुण्यास आले. सन १९२३ मध्ये वयाच्या विसाव्या वर्षीच पुणे येथील 'सद्‌गुरू बाबा वैद्य' यांचा त्याना अनुग्रह लाभला असल्याने १९४७ च्या मार्च मध्यें ते पुण्याला येईपर्यंत त्यांची आध्यात्मिक क्षेत्रातहि भरीव प्रगति झाली होती. आता तर सद्‌गुरू सान्निध्याचा लाभ वारंवार मिळू लागल्याने ते आत्मचिंतनात सदैव रममाण होऊ लागले. सद्‌गुरूंचा हा सर्वांत लाडका शिष्य झाला व त्यांला ते 'स्वरुपानंद' म्हणू लागले. हेच नांव पुढे रुढ झाले.

पुणे येथे एक लहानशी खोली घेऊन आपल्या ३-४ छात्रगणांसह स्वरुपानंद तेथे राहू लागले. स्वत: त्यांना वाङमयविशारद व्हावयाचे होते. परंतु स्वत:पेक्षा त्यांना छात्रांची काळजी जास्त वाटत होती. स्वावलंबनानेच शिक्षण घ्यावयाचे हा निर्धार होता व घरची मदत मिळण्याची शक्यताहि नव्हती त्यामुळे द्रव्यार्जनाकरिता त्याना अनेक उद्योग करावे लागत. अत्यंत कष्ट करूनच हे शिक्षण त्यांना संपादावयाचे होते.

या शिक्षणाच्या कालात मुख्यतः ज्ञानेश्वरीच्या वाचनात आणि चिंतनात ते रमून जात असत आणि इतर व्यवहार काळी सोऽहं साधनेच्या अनुसंधानात रहाण्याचा त्यांचा प्रयत्न असे. सर्व कर्मांत आत्म्याचे साक्षित्व अनुभविणे हा अभ्यास सतत करीत राहिल्याने त्यांची अंतर्निष्ठा वाढत होती. त्यांची होत असलेली आध्यात्मिक प्रगती ही वैयक्तिक स्वार्थासाठी नव्हती. परार्थातच ते स्वार्थ अनुभवित होते त्यामुळे आवश्यकता वाटताच ते कायदेभंगाच्या चळवळीत खेचले गेले.

**कायदेभंग तुरुंगवास**

सन १९३० मध्ये मिठाच्या सत्याग्रहाकरिता रत्नागिरी जिल्ह्यात स्वामींनी प्रचारकार्य केले व त्यांना रत्नागिरी जेल मध्ये स्थानबद्धहि करण्यात आले. त्यानंतर १९३२ मध्ये येरवडा जेलमध्येहि त्यांनी कारावास भोगला. येरवडा जेलमध्ये आसनस्थ होऊन तासन् तास ते आत्मानुसंधानात रमून जात. त्यांचेकडे पाहून त्यांचेबरोबर असलेली मंडळी त्यांना स्वामी किंवा मुनी या नांवाने संबोधू लागली. या मंडळीत आचार्य भागवत, आचार्य जावडेकर, एस्. एम्. जोशी, शंकरराव देव, रावसाहेब पटवर्धन वगैरे बडी मंडळी होती. अशा प्रकारे कारावासात रूढ झालेले स्वामी हे नाव आणि स्वरुपानंद हे गुरूंनी ठेवलेले लाडके नांव मिळून 'स्वामी स्वरूपानंद' हे जोड नांव तयार झाले व तेच त्यांनी स्वीकारले आहे.

या कारावासाच्या काळात स्वामींची आध्यात्मिक प्रगति भरपूर झाली व त्यांना स्वतःला धन्यता वाटली. सद्गुरुकृपेमुळेच हे परम भाग्य लाभले म्हणून आपले अनुभव नऊ ओव्यात ग्रंथित करून तो नवरत्नहार सद्गुरू बाबा वैद्य यांना त्यांनी समर्पण केला. शिष्याच्या या धन्यतेच्या वाक्पुष्पांनी बाबांना अतीव आनंद झाला व संतोषाने त्यांनी स्वामींचे मस्तकी आपला अभयहस्त ठेवला.

१९३४ साली वाङ्मय विशारद परीक्षेला बसावयाचे ठरवून विषयांचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी ते घरी पांवस येथे आले. परंतु थोडेच दिवसात मलेरियाचा ताप येऊ लागला. प्रकृति अशक्त झाली आणि त्यांचे प्रवृत्तीचे पाय पांगळे करणारी एक घटना घडून आली.

**'पुनरजन्म'**

मोठ्या आजारातून मनुष्य उठला म्हणजे त्याला पुनर्जन्म झाला असे म्हटले जाते. परंतु स्वामी ज्याला पुनर्जन्म म्हणतात तो निराळ्या प्रकारचा आहे. देहबुद्धि नष्ट होऊन परब्रह्माचा पूर्ण साक्षात्कार होणे हाच खरा पुनर्जन्म आहे. तुकाराम महाराजांनी 'आपुले मरण पाहिले म्यां डोळा' या शब्दात या स्थितीचे वर्णन केले आहे. स्वामींनीहि—

'अठराशे छप्पन्न शकाब्दी मृत्यु पावलों आम्ही'

या शब्दात या स्थितीचे वर्णन केले आहे. या परमेश्वरी कृपेची नाट्यमय घटना घडली ती अशी—प्रकृति अशक्त, अंगात थोडा ताप अशा स्थितीत ४।५ फर्लांग अंतरावर

डॉ. बाबा देसाई या आपल्या छात्राकडे ते इंजेक्शन घेण्याकरिता गेले. आणि परत येतेवेळी थोडे अंतर चालल्यावर त्यांना तीव्र थकवा जाणवू लागला. हातापायांतील ताकद गेली व आपण आता मरणाचे दारात आहो असे वाटू लागले. कसेबसे लटपटत घर गाठून ते अंथरुणावर आडवे झाले. आणि आईला खुणेनेच डॉ. देसाई यांना बोलावण्यास सांगितले. थोड्या वेळात बाबा आले. बाबा ती स्थिति पाहून स्वतः घाबरून गेले परंतु इतरांना ते धीर देत होते. सर्वांनाच ती काळरात्र वाटू लागली. गावात स्वामी अत्यवस्थ असल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. स्वामींना मृत्युचे विराट दर्शनच झाले- देहाभिमानासहित सर्व आशापाश तुटून ते भक्तीच्या प्रांतात प्रविष्ट झाले. या स्थिती-बद्दल स्वामींनी स्वतःच म्हटले आहे की 'भीतीतून भक्तीचा उदय झाला' ज्ञानाचा उदय झाला असे म्हटले नाही. ज्ञान होतेच परंतु भक्तीबाचून ते पोचट होते. भक्ती-वाचून ज्ञानाची पूर्णताच नाही हे सत्य यावेळी अनुभवगम्य आहे. याच स्थितीत वैरा-ग्याची परिपक्वता होत असते. भक्तिज्ञान वैराग्य या तिहींच्या प्राप्तीत संसार दुःखाचा अंत होऊन परमानंदाची प्राप्ती होते. या स्थितीत देहाला वैफल्य होते. कित्येक दिवस डोळे उघडून बघणेही शक्य झाले नाही. एक मनुष्य सतत जवळ असणे आवश्यक झाले. अशा स्थितीत औषधोपचाराचे व मुख्यतः त्यांच्या मनःस्वास्थ्याने प्रकृति क्रमशः सुधारत होती तथापि त्यांना ६ महिने अंथरुणावर निजून काढावे लागले.

आजारीपणाच्या या सहा महिन्यांच्या प्रदीर्घ काळात स्वामी भाव-राज्यात विहरत होते. आत्मचिंतनात रममाण झालेले होते. आजाराच्या आणि अन्य बाह्य उपाधीत निरुपाधिक अवस्था भोगीत होते. डॉ. बाबा देसाई हे औषधोपचारांची शिकस्त करीत होते. परंतु औषधांचा उपयोग शून्यवत् होत होता. परंतु खरे अंतर्बाह्य आरोग्य प्राप्त करून देणारे भक्ति रसायन स्वामींना जगन्माउलीने कृपेने दिले होते व त्या रसायनाचे ते अखंड आणि आकंठ सेवन करीत होते. सहाजिकच अशावेळी तृप्तीचे ढेकर यावयाचेच ! हे तृप्तीचे ढेकर म्हणजेच स्वामींचे अमृतधारा हे काव्य होय. १६२ साक्यांचे हे भक्तिरसमय मधुर काव्य आहे. आजारीपणात लटपटत्या हातांनी हे काव्य लिहिले असले तरी ते अनुभवाच्या भक्कम पायावर आधारित आहे. वाचकांना त्यातील रसास्वाद चाखता यावा म्हणून अल्पसा नमुना उधृत करीत आहे.

देह पराधीन पण मन मात्र जगन्माऊलीच्या चिंतनात मनपणा विसरून तल्लीन झाले आहे. महासुखाच्या अतिरसात जीव भावाची आटणी होत आहे.

**निज शय्येवरि देह दिसे परि असे कितीदा दूर ।**

**मातृ चरण तल्लीन मन तदा नयनीं लोटे नीर ॥**

जगन्माऊली आपले बाळ आपल्यांवर निर्भर राहून पूर्ण निर्भय झाले आहे की नाही याची जणु मरणाची भीति दाखवून परीक्षाच घेत आहेत व बाळ त्या परीक्षेला उत्तीर्ण झाले आहे. हा भाव पुढील साकीत आहे.

**'भीति वाटली का बाळ तुला ? छे ! गे ! मुळीच नाही ॥**

**माऊली, तुझी मला मुलाला गमेल भीति काई ? ॥**

सर्वभूती भगवद्‌भाव कसा बाणला ते दाखविणाऱ्या दोन साक्या :–

**" भुः भुः भुः भुंकतें श्वान तें छे ! छे ! प्यारे राम।**

**' डरांव डरांव बेडूक ओरडे ? छे रे ! आत्माराम "**

**' चिव चिव ' गाते चिमणी ? छे ! छे ! माझा प्यारे राम।**

**' टिटिव टिटिव टिव टिटवी ? छे रे ! माझा आत्माराम ॥ "**

मर्यादित लेखात अमर्याद अवतरणे देण्याचा मोह आवरावा लागत आहे. समारोप म्हणून आता एकच साकी देत आहे.

**' माताजी हे जगन्मातर्–भाग्यवान् तव नंदन।**

**करी ' अमृत धारा ' या तुझ्या तुज समर्पण ॥**

जगन्माऊली कृपामेघाची ही जणू वृष्टीच आहे या भावनेने या काव्याचे स्वामित्व स्वामींनी आपल्याकडे न घेता ते तिचे तिलाच अर्पण करून जगन्मातेच्या पदकमलावर अमृतधाराभिषेकच केला आहे !

या पुढील काळात प्रकृति सुधारू लागली. ४।६ फर्लांग चालता येऊ लागले. परंतु प्रकृति यापेक्षा अधिक सुधारलीच नाही. त्यांचे जीवन हे आता पूर्णतयः परमार्थ प्रवण झाले. सदोदित आत्मानुसंधानात रमावे; सहज झेपेल तेवढे शारीरिक व बौद्धिक कार्य करावे आणि निश्चित असावे !

आजारातून उठल्यावर स्वामी गावातील एका अगत्यशील व्यक्तीकडे राहू लागले. स्वामींचे विद्यार्थी डॉ. बाबा देसाई यांचे वडील ' अण्णा देसाई ' यांचेच आग्रहावरून ते त्यांचे घरी वास्तव्य करून राहिले व ते अद्यापहि त्यांचेकडेच रहात आहेत. देसाई यांचे सर्वच कुटुंबियांना स्वामीविषयी अमाप आदर सतत वाटत आला आहे.

अप्पा देसाई यांचे घर निरंतर गजबजलेले असावयाचे. स्वामी हे आता एकांतप्रिय झाले होते. त्यांनी एकांत साधने करिता घराजवळील एक खोपट पसंत केले. त्यात अनेक प्रकारची लाकूड सामानाची अडगळ साठवलेली होती. त्यातील जागा पसंत करून दिवसा काठी बराच वेळ ते सोऽहंसाधनेत निमग्न असत. आजूबाजूला काही सद्ग्रंथ असावयाचे. मुख्यत: रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांच्या वाङ्मयात ते विशेष रमत असत. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ तर त्यांचा जिवलग सोबती होय. देवांची पूजा करून तुळशीची पूजा व सूर्याला मनानेच द्वादश नामोच्चार पूर्वक नमस्कार करून तीर्थ घेणे आणि लहान मुलांना उपयुक्त असे शिक्षण देणे हे नित्यकर्म होते.

अण्णा देसाई यांची मोठी कन्या ही अकाली वैधव्य येऊन अप्पांकडेच राहू लागली होती. स्वामींच्या सहवासाने तिच्या ठिकाणी परमार्थाची ओढ निर्माण झाली. स्वामी तिचेकरिता ज्ञानेश्वरीतील काही महत्त्वाचे भाग सांगत व संपूर्ण गीता अर्थासहित पाठ करून घेतली. ताई या आजहि रोज संपूर्ण गीता पाठ करीत असतात.

सन १९४२ मध्ये स्वामींना सगुण साक्षात्कार झाला. सगुण श्रीहरीची साक्षात् भेट व्हावी अशी अमर्याद ओढ वाढत गेली. रात्री १० वाजण्याचे सुमारास घरातील

मंडळी झोपली आहेत अशा निवांत वेळी स्वामी आत्मचिंतनात मग्न होते. एकाएकी आपण देवघरात देवापुढे बसलो आहोत असे वाटले व एकदम 'कड्‌ड्‌काड्' असा आवाज कानी आला व विद्युल्लतेप्रमाणे प्रकाश फाकला. लगेच पुढील शब्द घनगंभीर स्वरात कानावर आले.

'वो गोडबोले किधर है ? जिसने ज्ञानेश्वरी लिखा' तात्काळ भगवान श्रीविष्णूचे दिव्य दर्शन झाले ! ना दर्शनानंदात ते निमग्न झाले. भगवंताच्या कृपेची साक्ष पटली सद्‌गुरूसेवेला भगवान केवढे महत्त्व देतात हे भगवंतांच्या उद्‌गारावरून दिसून आले. स्वामींनी संपूर्ण ज्ञानेश्वरी उत्तम स्वहस्ताक्षरात लिहून ती सद्‌गुरूंना समर्पण केली होती या भक्तीने सद्‌गुरू 'गणेशनाथ' हेहि प्रसन्न झाले होते. ते ऋण भगवंताला दर्शन देऊन व्यक्त करावे लागले. यावरून स्वामींचे ठायी सद्‌गुरूभक्ति आणि भगवन्निष्ठा उच्च प्रतीची होती हे दिसून येते.

या नंतरच्या काळात सुंदर ग्रंथ रचना करून आध्यात्मिक वाङमयात मोलाची भर घातली. आणि त्यामुळे त्यांची कीर्ति सर्वत्र पसरू लागली. या वाङ्मय कृतीची थोडक्यात ओळख करून देणेच या अल्प लेखात शक्य आहे.

१९३३–३४ च्या आजारातील 'अमृतधारा' हे साकी वृत्तातील छोटेसे काव्य परंतु भावभक्तीने आणि स्वानुभवाने बहरलेले रसाळ काव्य आहे. त्यानंतर भगवद्-गीतेवर मुख्यत: ज्ञानेश्वरीच्या आधारे 'भावार्थ गीता' हे साकी वृत्तातील काव्य लिहिले गेले. केवळ सम श्लोकी प्रमाणे रचना न करतां विषयाच्या महत्त्वाप्रमाणे एकेका श्लोका-वर अनेक साक्याहि केलेल्या आहेत. रचना प्रासादिक आणि रसाळ आहे. त्यानंतर स्वामींच्या अभंगांचा संग्रह 'संजीवनी गाथा' या स्वरूपात प्रकट झाला. 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ सर्व सामान्य वाचकाला सहज समजावा म्हणून आधुनिक सोप्या भाषेत स्वामींनी 'अभंगवृत्तात' त्याचे रूपांतर केले. 'अभंग ज्ञानेश्वरी' या नावाने हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. ज्ञानेश्वरांचे दोन ग्रंथ म्हणजे 'अमृतानुभव आणि चांगदेव पासष्टी' या ग्रंथांवरहि अभंगवृत्तात स्वामींनी सुलभ रूपांतर केले आहे. अशा प्रकारे निर्माण केलेल्या वाङ्मयामुळे ज्ञानेश्वरांच्या प्रतिभासंपन्न वाङ्मयाचा सामान्य वाचकांना चालू भाषेतून परिचय होत आहे.

१९३४ नंतर स्वामी आजारातून बरे झाले. परंतु प्रकृति कायमची अशक्तच राहिली. १९५६ पर्यंतच्या बावीस वर्षांचा काळ हा सद्‌ग्रंथ वाचन, लेखन व आत्मचिंतन यांतच प्रामुख्यांने व्यतीत झाला. पांवस सारख्या खेडेगावात त्यांनां अध्यात्मिक क्षेत्रातील असाधारण व्यक्ति म्हणून ओळखणारी मंडळी अत्यल्पच होती. परंतु त्यांच्या ग्रंथ प्रकाशनामुळे, त्यांची प्रसिद्धि वाढू लागली व मुमुक्षु, साधक, जिज्ञासू अशा विविध योग्यतेची मंडळी त्यांचेकडे येऊ लागली. त्यांचा अनुग्रह लाभू लागल्यानें त्यांचा शिष्य परिवार वाढू लागला आणि सध्यातर त्यांचेकडे दर्शनाला येणारांची संख्या झपाट्याने वाढत आहे.

स्वामी कोणत्याहि सांसारिक अडीअडचणींवर उतारे सांगत नाहीत. संसारातील अडीअडचणींवर मात करावयाची तर 'भगवंतावरील निःसीम भक्तीनेंच ती करता येईल. त्यानेच दुःखहि सुखाने सोसण्याची शक्ति येईल. हाच त्यांच्या उपदेशाचा सारांश आहे. खऱ्या सुखाचा मार्ग फक्त अध्यात्मशास्त्रच दाखवू शकते. हे प्रत्येकाने नीट समजून घेणे आवश्यक आहे.

गेली ३-४ वर्षे स्वामी प्रकृतीनें फारच अशक्त झालेले असून तो थकवा दिवसें दिवस वाढतच आहे. सध्या बहुतेक काळ ते निजूनच असतात. खोलीच्या बाहेरहि येऊ शकत नाहींत. पराधीनपणा आहे. दोन तीन वेळी दुरूनच दर्शन घ्यावे लागते. दर्शनाला मंडळी थोडी असली आणि प्रकृति ठीक असलीतर स्वामींचे जवळ जाऊन बसण्याचा बोलण्याचा लाभ काही भाग्यवंतांना लाभतो. परंतु बहुतेकांना दुरून दर्शन व त्यांचा आशीर्वाद लाभतो. सन्निध्य दर्शन व त्यांचेशी संभाषणाचा लाभ मिळावा म्हणून म्हणून लांबून येणारी मंडळी बरेच वेळा निराश होऊन जातात. स्वामींना प्रकाश सहन होत नसल्याने खोलीत अल्पमात्र प्रकाश असावा लागतो. त्यामुळे दारातून स्पष्टदर्शन बरेचवेळा होत नाही व स्वामींच्या सांप्रतच्या अशक्त प्रकृति मानामुळे यावर काहींच उपाय नाहीं. १९३४ मधील आजाराने प्रकृति कायमचीच अशक्त होऊन राहिली होती व आतातर ७० व्या वर्षात त्यांनी पदार्पण केले आहे. त्यांचे जीवन कृतार्थ असल्याने ते आत्मतृप्त आहेत. त्यांना काहीही मागावयाचे व मिळवावयाचे नाही. परंतु आपले एक मागणें आहे व ते म्हणजे त्यांना निरामय उदंड आयुष्य लाभो आणि सर्वांना दर्शन आणि आशीर्वचन यांचा लाभ घडो !

# मन राख मानवा शांत शांत

मन राख मानवा शांत शांत,
निज आत्मा दावि स्वभाव शांत ।।धृ।।

जिकडे तिकडे, दृष्टि फेकतां,
ना गवसे तुज, कुठें शांतता,
धनोपार्जनी सदा व्यग्रता,
यास्तव मानव त्रस्त ग्रस्त ! ।।१।।

मन हे नाही पापी अथवा,
सैतानहि ना, नाहि मूर्ख वा,
पापाचरणीं पात्र त्याजला,
ठरवुनि बससी, स्तब्ध मुग्ध ! ।।२।।

राजस वृत्ती, सत्व, तमो, गुण,
संस्कारांनीं, वेष्टित हे मन,
स्वभाव प्रकटवि ते गुणावगुण,
भिन्न भिन्न जे दर्शनात ! ।।३।।

वश करुनी त्या, मना जिंकणे,
सन्मार्गावर त्या चालविणें,
संकल्पाते हृदीं सोडणें,
सोडु नको रे ! अनियंत्रित ! ।।४।।

मन अश्वानें पळत राहणें,
मार्ग तुझा तूं तया दाविणें,
विकार खड्डे, सदा टाळणें,
ना तर जखमा ! क्लेश निश्चित ! ।।५।।

—लक्ष्मीतनया— (महाड)

# भ्रांति पडे मूढासी

धडपड ही मानवाची,
चालली निशिदिनीं सुख प्राप्तीची ।।धृ।।

लो त्याग स्वीकारि, स्वीकार करी,
नाना मार्गांचा, अवलंब करी,
जोड करि साधनांची ! चालली... ।।१।।

आश्चर्य वाटते, पळेच पुढती,
धावता धाप ही, कुंठीत मती,
सावट ये दुःखाची ! चालली... ।।२।।

ते दुरापास्त कां ? कारण नुमजे,
कुठें नि कशांत, वसते ? नलगे,
अज्ञान धारणेशी ! चालली... ।।३।।

वृत्ति व्यापारी नये कामाची,
सौख्याशीं, तद्रुप, नित्य कराची,
'चित्तलय' मार्ग यासी।... चालली ।।५।।

ज्ञानिया ऊमज, सर्वत्र विहरे,
अविकारी अभंग, अक्षय पसरे,
भ्रांति पडे मूढासी ! चालली... ।।४।।

—लक्ष्मीतनया- (महाड)

## हिंदी साहित्याकाशातील सूर्य :

# संत सूरदास

लेखक : **विनायक पाठक**

**भक्तिकालातील त्रिमूर्ति :**

भक्तीकाळातील संत साहित्यिकांच्या साहित्य विषयक गुणवत्तेच्या संदर्भात "सूर सूर तुलसी शशी ठडुगण केशवदास" हा दोहा प्रसिद्ध आहे. यात सूरदासाना हिंदी साहित्याकाशातील सूर्य संबोधून त्यांच्या काव्यगुणांचा गौरवच केलेला आढळतो. हिंदी साहित्याच्या भक्तिकालांत कबीर, सूरदास व तुलसीदास हे तीन संत कवि खूपच लोकप्रिय होते.

**चरित्र**/सूरदासांचा जन्म संवत १५३५ च्या वैशाख शुक्ल पंचमीला म्हणजे मंगळवारी झाला. सूर, सूरदास, सूरज, सुरजदास आणि सूरश्याम अशी पाच सहा नावे त्यांच्या पद्यात गोवलेली आढळतात. सूरदासांचे वडील रामचंद्र (रामदास) हे गोपाचल किंवा गोपाद्रि (आजच्या ग्वाल्हेरची जुनी नावे) येथे राहत व तेथेच सूरदासांचा जन्म झाला असावा. तथापि यांच्या जन्मस्थानासंबंधी बरेच प्रवाद आहेत. कुणी म्हणतात यांचा जन्म आग्रा मथुरा मार्गावर असणाऱ्या रूनकता नामक गावी झाला तर कुणी म्हणतात महाकवि सूरदासांचा जन्म परिक्षित राजाच्या मुलाने जनमेजयाने-ज्या ठिकाणी सर्पयज्ञ केला होता त्या दिल्लीपासून चार कोसावर असणाऱ्या सीही गावी झाला.

सूरदास जातीने सारस्वत ब्राह्मण होते. ते जन्मांध होते. "भक्तमाल" या ग्रंथात त्यांच्या कवित्वाबद्दल व जन्मांधतेबद्दलचे काही उल्लेख आढळतात.

"सूरदास सों बहुत निष्ठुरता, नैननि हूँ की हानी" आणि

"सूर की बिरीयाँ निष्ठुर होइ बैठे जन्म अंध करयौ" या ओळीतून त्यांनी आपल्या अंधत्वाच्या दुःखाला वाचा फोडलेली दिसून येते.

वयाच्या सहाव्या वर्षी त्यांनी घरगुती कलहावरुन गृहत्याग केला व ते चार कोसावर असणाऱ्या राका गावाच्या तलावाकाठी राहू लागले. जन्मजात प्रतिभा आणि भक्ति रसाला पोषक असलेली त्यांची मनःप्रवृत्ति यामुळे ते लोकाना निरनिराळी गाणी म्हणून दाखवू लागले. वयाच्या अठरा वर्षेपर्यंत "स्वतः रचावे, गाणे गावे,

स्वतः रमावे व इतरा रिझवावे" असा त्यांच्या नित्यक्रम चालू होता. या काळात इतकी भक्तिरसपूर्ण गाणीलिहिली की त्यांची अचूक मोजदाद आजवर करता आली नाही.

याच वास्तव्यात त्यांनी एका ब्राह्मण जमीनदाराला त्याच्या हरवलेल्या गायींचा अचूक पत्ता सांगून सर्वांना आश्चर्यचकित केले व त्या आनंदप्रित्यर्थ त्या जमीनदाराने सूरदासांना एका पिंपळाच्या झाडाखाली एक छोटीशी झोपडी बांधून दिली. त्यात राहून ते लोकाना **सगूण** (हरविलेल्या किंवा मांडलेल्या वस्तु विषयक प्रश्न) मांगू लागले. त्यामुळे वयाने लहान असूनही अनेक सेवकमंडळींचा गोतावळा तेथे नित्य जमू लागला, व पुढे त्या झोपडीचे रुपांतर एका टुमदार घरात झाले. त्या परिसरात नित्य नियमाने हरिनामाचा गजर धुमू लागला. घराला सजावट प्राप्त झाली. आणि वस्त्रप्रावणादि वैभवात ते राहू लागले.

वयाच्या १८ वर्षेपर्यंत हे वैभव त्यांनी उपभोगले पण एके दिवशी त्यांना वैराग्याचा असा झटका आला की त्यांनी आपले घर वैभव सर्व काही आपल्या आई-वडीलांच्या हाती सोपवून स्वतः एका वस्त्रानिशी व एका छडीनिशी मथुरेच्या विश्रामघाटावर आले पण तेही स्थान त्याच्या प्रवृत्तीला उपयुक्त न वाटून ते मथुरा व आग्रा यांच्या मध्यभागी असणाऱ्या, यमुना नदीच्या मध्यभागी असणाऱ्या यमुना नदीच्या गायघाटावर नदी किनारी राहू लागले.

**महाप्रभू वल्लभाचार्यांची भेट :**

या गायघाटावरच सूरदासांची व महाप्रभू वल्लभाचार्यांची गांठ पडली-येथेच त्यांनी सूरदासांना भगवद् यश-वर्णन करण्याचा उपदेश दिला. सूरदासांनी त्यांना गाऊन दाखविलेल्या "हौं हरि सब पतितन को नायक" व "प्रभु हौं सब पतितक को टीका" या दैन्यवृत्तीला अनुलक्षूनच महाप्रभुंनी त्यांना सांगीतले असावे–"सूर ह्वै कै ऐसे काहे की घिघियाते ?–कछु भागवत लीला बरनन करि।" (स्वतःकडे कमीपणा घेऊन उगीच ईश्वराकडे तोंड वेंगाडण्यापेक्षा भगवंताच्या लीलांची गौरव गीते व ईश्वरी वैभवाचे गोडवे गाऊन आपला जन्म कृतार्थ का करीत नाहीस ?)

**लोह बीघडले परीसचि झाले :**

या उपदेशामृतानी सूरदासाच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. त्यांनी महाप्रभू वल्लभाचार्यांकडून मंत्र घेतला. त्यांनी पुष्टिसंप्रदायाची दीक्षा घेऊन नवविधा भक्ति आत्मसात केली या घटनेपासून सूरदास नित्य भक्तिच्या मानस सरोवरात धुंद होऊन नियमाने डुंबू लागले. त्यांना दिव्य दृष्टि प्राप्त झाली. व श्री कृष्ण लीलांचे प्रत्यक्ष दर्शन त्यांच्या मनः चक्षुसमोर नित्य होऊ लागले. याच संदर्भात भागवतातील १० व्या स्कंधातील 'सुबोधिनी' च्या मंगलाचरणाच्या पद्यात त्यांची उत्कट भक्तिधारा

उचंबळून वाहूं लागली व "चकई री चली चरणसरोवर, जहाँ न प्रेम वियोग" हे त्यांचे जीवन-ध्येय झाले.

अशा तऱ्हेने त्यांनी भागवतात वर्णिलेली दहाही स्कंधातील हरिकथा पद्य सूरदासांची कीर्तन पद्धती, काव्यप्रतिभा, संगीतातील स्वरज्ञान व आवाजातील गोडवा पाहूनच महाप्रभूंनी श्री नाथांच्या कीर्तनाचे काम सूरदासांकडे सोपविले. श्रीनाथ यांच्या भेटीने सूरदासांना जणू ईश्वरी साक्षात्कारच झाला.

**उद्धवाचा अवतार**

हिंदी संत आणि भक्त संप्रदाय सूरदासांना उद्धवाचा अवतारच मानतात उद्धव म्हणजे भगवान श्रीकृष्णाचे पट्टशिष्य, महामात्य, महाभृत्य व अतिशय आवडते शिष्य होते. तिन्ही त्रिकाळ भगवंतांच्या सहवासात राहण्याचे भाग्य उद्धवाला लाभले होते. उद्धवाची भगवत्‌चिंतनानी भारावलेली भक्ति व सूक्ष्म सहजोद्‌भव ज्ञान सूरदासाच्या काव्यातून अभिव्यक्त झालेले आढळतात.

**तत्वज्ञान :**

या भवसागराच्या मायाजाळातून सही सलामत सुटण्याचा एकमात्र उपाय म्हणजे हरिभक्ति ! अन्यथा हे जीवन भाररूपच आहे अशी सूरदासाची एकंदर धारणा होती. माणसाच्या हृदयात एका उपास्य दैवता खेरीज दुसऱ्या कुणालाही स्थान असता कामा नये व याच संदर्भात त्यांनी "प्रेम गली अति साँकरी वा में दो न समाये।" अशी मनाला समज दिली आहे.

सूरदासांनी या भवसागराला होळीच्या खेळाची उपमा दिली आहे. आपल्या सूर सारावलीमध्ये "खेलत यह विधि हरि होरी हो। होरी हो वेद विदित यह बात।" असे सांगून १६ व्या पदात या रुपकाचा विस्तार केलेला आढळतो.

**अकबर केला वेडा :**

असे म्हणतात, की एके दिवशी अकबराच्या दरबारात तानसेन सूरदासांचे एक भजन गात होता-त्याला ते भजन इतके आवडले की त्याने सूरदासांची स्वत: प्रत्यक्ष भेट घेतली. या भेटीत सूरदासांना अकबराविषयीची काही गीते रचावयास सुचविण्यात आले पण सूरदासांनी ते मान्य केले नाही उलट त्यालाच जणू उपदेश केला, "मना रे तूं करि माधव से प्रीति !" आणि अशा तऱ्हेने अकबराला आपल्या ईश्वरासक्त मनःस्थितीची सूचक शद्वात कल्पना दिली. व पुढे सांगीतले की आपल्या मनाच्या म्यानात फक्त एकच तळपती (ईश्वरी) तलवार राहू शकते. कारण "प्रेम गली अति साँकरी वा में दो न समाये।"

**तीन ग्रंथ–त्रैलोक्य संपदा :**

सूरदासांचे सूर-सारावली, साहित्य लहरी, व सूर-सागर हे तीन सर्वमान्य ग्रंथ असून त्यांची फुटकळ गेय रचनाही अमूप आहे.

हिंदीमध्ये संत साहित्य विषयक जे 'वार्ता-साहित्य' प्रसिद्ध आहे त्यातही सूरदासांनी श्रीकृष्ण लीलांविषयक व लक्षावधी पदे लिहिल्याचा उल्लेख आढळतो.

**सूरसारावली :**

प्रथमदर्शनी हा ग्रंथ म्हणजे 'सूर-सागर' या ग्रंथाची प्रस्तावनाच असावी असे वाटते पण वाचल्या नंतर लक्षात येते की हा 'सूरसागर' ची प्रस्तावना अथवा सारांश नसून, ११०७ पदांचा हा स्वतंत्र ग्रंथ आहे. 'पुरुषोत्तम सहस्र नाम' हा 'सारावलीचा' आधार आहे. यांत वल्लभ सांप्रदायाच्या नित्यपाठाची व वर्षोत्सवा निमित्य गायिलेल्या गीताचा समावेश आहे. यातच भगवंताच्या २४ अवतारांचे वर्णनही आलेले आहे. सूर सारावली सूरदासांची स्वतंत्र व सैद्धांतिक रचना आहे.

**साहित्य–लहरी :**

सूरदासांचा हा ग्रंथ ११८ गीतांचा आहे. यात नायिका भेद, अलंकार व सूरदासांच्या भक्तिभावनांचा परमोत्कर्ष दाखविणारी बरीच गीते आढळून येतात.

**सूर–सागर :**

सूरदासांचा हा काव्यग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. यातील बऱ्याच गीतांचे संकलन व संपादन त्यांच्या हयातीतच झाले असावे असे मानण्यात येते. हजारो गीतांचा विविध विषयावरील गोड पदांचा संग्रह म्हणून या ग्रंथाला "सूर-सागर" म्हटले असावे- यांत ज्ञान, वैराग्यातील सूक्ष्मातिसूक्ष्म भेद, भगवंतांचे विविध अवतार व त्यांची वैशिष्ठ्ये, उद्देश व कार्ये, अनेक भावमधुर बाल-लीला, रासक्रीडा व श्रीकृष्णाची मुरली आदि विषयक गीतांचा हा जणु अथांग सागरच आहे.

**सूरदासांनी रंगविलेले राधा–कृष्ण :**

सूरदासांनी चित्रित केलेली राधा म्हणजे विद्यापति, जयदेव, चंडिदास व ब्रह्मवैवर्त यांनी चित्रित केलेल्या राधेचा सुंदर समन्वय आहे.

सूरदासांच्या भक्तीत शास्त्रसंमत भक्तीचे नवविधा प्रकार अभिव्यक्त झाले आहेत. प्रतिभासंपन्न गेय गीतातून जणु त्यांच्या भक्तिभावनेने भारलेल्या हृदयाचीच अभिव्यक्ति झाली आहे.

बाललीलांचे वर्णन करताना सूरदास लिहितात–एके दिवशी बाहेर खेळायला जाताना एका गल्लीत श्रीकृष्णाने नीलवस्त्रधारी राधेला पाहिले मात्र आणि "सूर

श्याम देखत ही रीझै नैन नैन मिली परी ठगोरी" ह्या ओळी सूरदासांच्या प्रतिभेनी शद्बांकित केल्या. त्याच प्रमाणे राधेचीहि श्रीकृष्णाला पाहून तीच अवस्था झाली, व ती रिकाम्याच रांजणात रवी घुसळू लागली. तशीच त्या श्रीकृष्णावरही राधेची अशी मोहिनी पडली की गाय समजून तो बैलाचेच दुध दौहायला बसला. प्रीतीच्या तल्लीनतेची परिसीमा दाखविताना सूरदासांच्या प्रतिभेने सूक्ष्मातिसूक्ष्म वर्णनातून अनेक गोड प्रसंग चित्रित केले. जणू ते सर्व प्रसंग त्यांनी प्रत्यक्ष डोळ्यानीच पाहिले !

**सूरदासांची सर्वस्पर्शी प्रतिभा :**

सूरदासांच्या प्रतिभेपुढे अलंकार शास्त्र जणू काही हात जोडून उभे राहिल्यागत दिसते. उपमा, रुपक, अन्योक्ति, लक्षण, व्यंजना यांचे एकापेक्षा एक सरस चमत्कार सूरदासांच्या गीतात आढळतात.

**भावमधुर जीवनाची भैरवी :**

अशा या भक्त गायक कवीला एके दिवशी नित्याप्रमाणे कीर्तन करीत असताना आपल्या मृत्यूची चाहूल लागली. त्यांनी तडक पारसौलीची वाट धरली व तेथील आपल्या निवास स्थानी श्रीनाथांच्या ध्वजेकडें (पताका) तोंड करुन पहुडले. तेव्हा स्वामी गोसाई, कुंभनदास, चतुर्भुजदास आदि संत मंडळी त्यांचेजवळ गेली. स्वामींचा आवाज कानी पडताच सूरदास शुद्धीवर आले व सद्‌गदित झाले व त्याही परिस्थितीत "देखो-देखो जूं हरि कौ एक सुभाई। अति गंभीर उदार उदधि हरि जान शिरोमणि साई ।।" अंतीम भेटीस आलेल्या भक्त मंडळीस त्या उद्‌गारातील मर्म लक्षात आले की सूरदास गुरु आणि श्रीकृष्ण यात भेदाभेद मानीत नाहीत. गुरु आणि भगवत म्हणजे एकाच नाण्याच्या जणू दोन बाजू आहेत हेच त्यांना सांगायचे होते. सूरदासांनी सर्वांकडे कृतज्ञतेने पाहिले. त्यांच्या चित्तवृत्तींबद्दल केलेल्या पृच्छेस गीतातच सूरदासांनी उत्तर दिले, "खंजन नैन सुरँग रस माते" व वयाच्या ७२ व्या वर्षी आपली जीवन यात्रा समाप्त केली. व्रजभाषेच्या या काव्यसम्राटाने आळविलेली भैरवी जरी संपली असली तरी स्वर अद्यापही समस्त व्रजभूमीत व हिंदी साहित्यात अक्षय गुंजन करीत आहेत.

# रामगीतांजली

अशोकवनात सीता हनुमंताजवळ बोलताना तो तिला स्वतःच रामाकडे नेण्यास तयार होतो तेव्हा ती त्याला म्हणते—

लागली जरी मज उत्कंठा भेटाया
रघुनाथ येऊं दे स्वयें मला रे न्याया ! ।।ध्रु.।।

मी परपुरुषाचा स्पर्श कसा रे साहूं ?
कां विरह पतीचा निमित्त करुनी येऊं ?
लागेल धरावा धीर जरी थांबाया ।।१।।

मी परवश झालें रावण पापी शिवला
हा डाग मज अटळ असे रे ! जडला;
परि पराक्रमानें उचित तया क्षाळाया ।।२।।

एकटा सागरावरुनीं तूं वेगानें
मज घेउन जातां पडेन मी भीतीनें;
येतील अचानक राक्षस तुज अडवाया ।।३।।

मज पृष्ठीं वाहुन गुंतुनिया पडलेला
जाशील कसा तूं पुढती युद्धीं गढला ?
अबला मी फिरुनी होइन बंदी वाया ।।४।।

ही अशी एकटी लपुनी कां मी येऊं ?
कां लंकापतिला भिऊनी पळुनी जाऊं ?
शोभणार नाहीं असलें राघव-राया ।।५।।

रावणास वधुनी जरी जिंकुनी लंका,
वाजवीत जातिल जगतीं अपुला डंका !
निःशंक होउनी उचित कीर्ति मिळवाया ।।६।।

मीं तुझा जाणतें भाव शुद्ध सेवेचा
परि सूड घ्यावया हवाच अन्यायाचा
अद्वितीय यश तें अमर थांबले गाया ।।७।।

—दिवाकर घैसास-डोंबिवली (पूर्व)

# नित्य मी जिवंत

ले. –चिपळूणकर गुरुजी.

९, सिद्धारूढ बिल्डिंग ७५, भवानीशंकर रोड, दादर मुं. नं. २८

श्री साईबाबांनी आपल्या सर्व भक्तांस निःसंदिग्ध ग्वाही दिली आहे की 'नित्य मी जिवंत– जाण हेचि सत्य । नित्य त्या प्रचीत अनुभवें'. बाबा आजपर्यंत या ब्रीदानेच आपल्या सर्व भक्तांच्या प्रत्येक कामी स्वतः उभे राहून धीर देऊन कार्यसिद्धी केल्याची असंख्य उदाहरणे आहेत. साईभक्तांच्या अनुभवात भर म्हणून माझे काही अनुभव खाली देत आहे–

गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात माझ्या मुलीचे लग्न व्हावयाचे होते. विवाहापूर्वी दोनच दिवस अगोदर युद्धामुळे प्रकाशबंदी सर्वत्र जारी झाली. अर्थातच पाठोपाठ सर्व बंधने आली. एकंदर सोहळा कसा काय पार पडतो याविषयी मी सचिंत झालो. माझ्या नित्य परिपाठाप्रमाणे बाबांना सुपारी ठेवून गाऱ्हाणे घातले आणि कार्यासाठी पुढे पाऊल टाकले. आश्चर्याची गोष्ट अशी की त्याच रात्री मला कोणा एका अज्ञात आवाजाकडून श्री भगवत् गीतेचा नववा अध्याय म्हणण्याचा आदेश आला. त्या वेळापासून मी तो अध्याय सारखा माझ्या जिभेवर ठेवला, बाबांचे व माझ्या गुरूचे स्मरण केले व सर्व भार त्यांचेवर टाकला. परमेश्वर पाठीशी असल्यावर काय होणार नाही ? माझे घरातील मंगल कार्य यथासांग निर्विघ्नपणे पार पडले.

यावर्षी माझ्या मुलाची एस्. एस्. सी. ची परीक्षा होती. मी माझ्या मुलाची परीक्षा सुरु झाल्यापासून बाबांच्या देव्हाऱ्यात दिवा सतत तेवत ठेवला होता तो परीक्षा पूर्ण होईपर्यंत ठेवला होता. माझ्या मुलाला नेमका अभ्यास केल्याप्रमाणे उत्तरपत्रिका लिहीता आल्या व मुलगा परीक्षेत उत्तम तऱ्हेने यशस्वी झाला.

कोण्या एका वेळी मी काही आर्थिक अडचणींत अकस्मातपणे येणार होतो. मी सर्व परिस्थिती बाबांना प्रार्थनेचे वेळी निवेदन केली, आणि त्यांच्या कृपाप्रसादाने पुढील आठ ते दहा दिवस पर्यंत माझ्याकडे पत्रिका दाखविण्यास वगैरे कामासाठी मंडळी सतत येऊन माझी अडचण निवारण झाली.

गेल्या वैशाख महिन्यात मला अलीबाग येथे प्रवचनास जावयाचे होते. ते माझ्या गुरुंचे जन्मगांव. सध्या तेथे संपूर्ण वस्ती संमिश्र आहे. अशा संमिश्र वस्तीत जाऊन जाहीरपणे बोलण्याचा तो जवळ जवळ पहिलाच प्रसंग होता म्हटले तरी चालेल. मला गाव फारच आवडले. परिसर अत्यंत सुंदर आहे. एकंदर समाज पाहता मनात किंचित्

वाच्या उच्चाराने ज्याची वाणी शुद्ध झालेली आहे तो कोणत्याही जातीचा असो त्याला ब्रह्मज्ञान प्राप्त होते आणि त्यांची सर्व पापें जळून भस्म होतात.

अकारे तु भवेद् ब्रह्मा। उकारे विष्णुरुच्यते।
मकारे तु भवेद् रुद्र।ॐ कार: परमं पदम्॥

अकारे ब्रह्मदेव, उकारे विष्णु, मकार रुद्र अशा तिहींच्या तेजाने बनलेला ॐ कार सर्व श्रेष्ठ होय.

ओमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीत। य उद्गीथ: स प्रणव:। असौ वा आदित्य उद्गीथ एष प्रणव:। ओमिति॥

छांदोग्योपनिषत् १: १-१; ५-१.

ॐकार-बिंदु-संयुक्तं नित्यं ध्यायन्ति योगिन:

कामदं मोक्षदं चैव ॐ काराय नमो नम: ॥

याचा अर्थ असा-

उद्गीथाची म्हणजे ॐ या अक्षराची उपासना करावी. जो उद्गीथ तोच प्रणव.हा आदित्य उद्गीथ, तोच प्रणव होय व ॐकार होय.

म्हणून माझ्या सर्व योगप्रेमी व सांईभक्त बंधुभगीनींनी' साधकांनी व भगवद्भक्तांनी ॐ कारमय व्हावे व स्वास्थ सौख्य व समाधान अनुभवावे हीच प्रार्थना.

# साईनाथ

## श्रीसद्‌गुरुसाईमहाराज ललित चरित्र

लेखकः **र. श्री. पुजारी** (पुणे)

### ८. जो खरा शिष्य झाला तोच परम पदाचा अधिकारी झाला.

रात्रीचे बारा वाजून गेले. सर्वत्र काळकुट्ट अंधार झाला. माशिदी भोवती तर काजळासारखा काळा अंधार पडला. अशा अंधारात मशीद एखाद्या भुताप्रमाणे उभी होती. तेथे यावेळी कोण जाणार ? वस्तीस तरी कोण राहाणार ?

पण जगात आश्चर्ये काय थोडी आहेत !

अशा काळोख्या रात्रीही मशिदीत तीन व्यक्ती होत्या. अगदी शांतपणे त्या तेथे झोपी गेल्या होत्या.

अपराधी अंधारात बसण्याचा प्रसंग आलाच तर माणसे आधी शेकोटी पेटवून उजेड करतात. त्या उजेडाच्या आश्रयाने एकमेकांना खेटून बसून भीतीने गार पडलेल्या अंगात ऊब आणू लागतात. बसलेली वाचा थोडी सुटावी म्हणून इकडच्या तिकडच्या गप्पा उकरून काढतात. मग मनाला एकमेकांच्या, थोडा आधार वाटताच हास्यविनोदही करू लागतात. जणू ही मंडळी येथे अंधारात बसून शेकोटीची मजाच लुटत आहेत !

परंतु येथे तर असा काहीच प्रकार दिसेना. उलट त्या तीन व्यक्ती जाग्याही नव्हत्या. गाढ झोपल्या होत्या. जणू ही उघडीवाघडी मशीद म्हणजे गाद्यागिरद्यांनी वैभवशाली केलेला एक दिवाणखानाच !

तेथे झोपलेल्या त्या तीन व्यक्तींपैकी एक व्यक्ती तर अगदीच पोरसवदा होती. तिच्या गालांवर किंवा ओठांवर अजून लवसुद्धा दिसत नव्हती. थंडीच्या वेळी उबदार गोधडीत गुरफटून आईशेजारी झोपण्याऐवजी हे वेडे कोकरू हट्टाने या मशिदीत आले होते. कांबळ्यावर पाठ टाकून आपल्या मामाशेजारी झोपले होते.

झोपलेली दुसरी व्यक्ती मध्यम वयाची. लांब शेंडीची. करंगळीएवढे जाड जानवे खांद्यावर असलेली. संध्याकाळच्या वेळी केलेल्या संध्येच्या वेळेचे भस्म अजून कपाळास, दंडास असलेली. दैवज्ञ ब्राह्मण जातीचा अभिमान बाळगणारी.

ब्राह्मणधर्माच्या सर्व खुणा देहावर असलेली ही कुटुंब वत्सल व्यक्ती आपले घर आणि बायकामुले सोडून या मशिदीत येऊन का बरे झोपली असतील ? मुलाबाळांचे चांगले भरलेले घर सोडून जीव रमविण्यासाठी एखाद्याने कबरस्थानात जाऊन बसावे अशातीलच हा प्रकार ! परंतु येथे तर नावालासुद्धा कोणाची कबर नाही.

खरोखरच या तीन व्यक्ती मोठ्या विचित्रच होत्या खऱ्या !

कारण जागेपणी त्यांचे बोलण्याचे विषय, वागण्याच्या तऱ्हा, रात्री झोपण्यासाठी निवडलेली जागा, आणि या सर्वांत कळस म्हणजे झोपण्याची त्यांची विचित्र पद्धत– सारे काही और होते ! अगम्य होते !

तेथे झोपणाऱ्या एकूण व्यक्ती किती, तर तीन ! पण तिघांची डोकी भिन्न भिन्न दिशांना ! सर्वांचे पाय मात्र न चुकता एकच जुळविलेले ! जणू तीन शिरे, सहा हात, पाय मात्र एकत्रित !

काळ्या रेघोट्यांनी कोणी एखाद्याने सहज रेखाटावे त्याप्रमाणे दिसणारे त्रिमूर्तीचे हे विचित्र चित्र जमिनीवर काही वेळ स्थिर झाले असेल नसेल, त्रिमूर्तींपैकी एक मूर्ती डोळे साफ उघडून पाठीखालच्या गोणपाटावर उठून बसली. अंधारातच समोरच्या कोपऱ्याकडे गेली. ढलप्यांच्या ढिगाऱ्यात हात घालून दोन तीन ढलप्या खाली ओढल्या. समोरच्या मंदावलेल्या धुनीत घातल्या.

मग धुनी जशी हळूहळू प्रज्वलीत होऊ लागली तशी ती व्यक्ती तेथून उठली. मोठ्या खुषीने आपल्या छोट्या दाढीवरून हात फिरवीत बाहेर कोठे निघाली. अंधारातच पायऱ्या उतरून चालत गेली. दहा पाच पावले चालल्यानंतर आकाशातील तारकांच्या प्रकाशात आपला नेहमीचा बसण्याचा दगड पाहून त्याच्यावर बसली. डोळे भरून, मोठ्या प्रेमाने मशिदीकडे पाहात राहिली.

मशिदीच्या एका कोपऱ्यात विटेवर मातीची एक पणती इतका वेळ तेवत होती. तिचा मंदसा प्रकाश त्या दोनखणी मशिदीत रेंगाळत होता. परंतु बाहेर रात्र वाढू लागली तशी पणतीतील ती ज्योत पेंगुळली. त्या तीन व्यक्तींचे मोठ्या प्रेमाचे बोलणे, हास्यविनोद ऐकता ऐकता एखाद्या बालकाप्रमाणे तिचाही केव्हा डोळा लागला, कळले नाही.

आता तर किडामुंगीसकट सर्व प्राणी झोपले. सबंध शिरडी गावात जागी अशी व्यक्ती एकच उरली. ती म्हणजे दगडावर बसून समोरच्या आपल्या मशीदमाईकडे मोठ्या प्रेमाने पाहाणारी त्रिमूर्तीमधील ती एक मूर्ती ! कफनीधारी मूर्ती !

मशिदीमधील धुनी यावेळपर्यंत चांगली प्रज्वलित झाली होती. तिच्या लाल पिवळ्या सुंदर ज्वाळा तर बाहेरील त्या दगडावरूनही दिसत होत्या. जणू मशीद आतून कोणी सोनेरी मुलाम्याने मढविली होती !

किती तरी वेळ ती व्यक्ती बाहेरच्या त्या दगडावरच होती.
स्वत:शीच निमग्न होती.

धुनी जशी पुन्हा मंदावलेली दिसू लागली तशी ती व्यक्ती आत आली. धुनीजवळ जाऊन धुनी पुन्हा प्रज्वलित केली. जणू अग्निहोत्र घेतलेल्या कोणा तेजस्वी ब्राह्मणाच्या पवित्र होमकुंडातील हा अग्नी. त्याची उपासना हा विश्वशांतीचा मार्ग. एक क्षणही या पवित्र अग्निदेवतेस विसंबून भागण्यासारखे नव्हते.

कशी कोण जाणे, सहस्त्र घंटाचा नाद कानावर यावा तशी ती मध्यमवयीन ब्राह्मण व्यक्ती झोपेतून एकदमच जागी झाली. आपल्या कांबळ्यावर उठून बसली. शरमेने अर्धमेली होऊन स्वत:चा धि:कार करू लागली.

मनाशी म्हणू लागली: अष्टौप्रहर गुरुसहवास लाभावा, येणाऱ्या प्रत्येक क्षणी हातून गुरुसेवा घडावी म्हणून तर कुटुंबातील मंडळींचा रोष पत्करून झोपण्यासाठी येथे आलो. पडल्याबरोबर लगेच झोप लागू नये म्हणून खळगेपडलेल्या, उखणलेल्या या जागी घोंगडी अंथरली. पण दैवाने पुन्हा घात केला. येथे येऊनही गाद्या गिरद्यांवर झोपावे तसा कुंभकर्णाप्रमाणे डाराडूर झोपी गेलो ! जणू पडत्या फळाची आज्ञा !

मनुष्यस्वभाव तरी खरोखर किती विचित्र !

बाबा येथे एकटेच झोपत, तेव्हा त्यांच्या आठवणीने मी घरी रात्ररात्रभर तळमळत असे. रडत असे. पहाटेपर्यंत डोळ्यास डोळा नसे.

अंतर्ज्ञानाने हे जाणूनच की काय, बाबांनी मला येथे झोपण्यास परवानगी दिली. ती तेवढी मिळाली मात्र–हरिदासाची कथा मूळ पदावर ! तमोगुण पुन्हा जागा झाला. बाबांच्या या पवित्र स्थानी येऊनही निद्रेने घेरले !

कीर्तनास मोठ्या भक्तीने जावे आणि तेथेही निद्रेने घेरावे ! विषयवासनेतच मन बुडून राहावे !

खरोखरच या जन्मी कितीही जागरुक राहून हरिचिंतन करण्याचा प्रयत्न केला तरी गुरुकृपेविना तो तडीस जाणे कठीण. पूर्वजन्मीचे एखादे पाप केव्हा प्रकट होईल आणि ऐन वेळी कसा घात करील नेम नाही.

सदगुरुवाचून जप-तप-अनुष्ठान सर्व व्यर्थ, हे ज्या क्षणी मनास पटले त्या क्षणी जणू पुनर्जन्म झाला. शेकडो वर्षांच्या झोपेतून जणू जाग आली. पण असे सग्दुरु कोठे भेटणार ? त्यांना ओळखणार तरी कसा ? चारचौघाप्रमाणेच असलेली ती एक देहधारी मूर्ती. कोळशांच्या खाणीत जन्म घेतल्यामुळे वरून कोळशाप्रमाणेच मूल्यहीन भासणारा हा एक स्वयंप्रकाशित हिरा.

रात्रंदिवस तळमळू लागलो. दिवसच्या दिवस खंडेरायाच्या देवळापलिकडील अरण्यात जाऊन बसू लागलो. गुरु भेटविण्यासाठी आक्रोश करून खंडेरायाची विनवणी करू लागलो.

देवीदासबाबा महान सत्पुरुष. सुंदर बांधा सतेज डोळे. प्रथम येथे आले तेव्हा फार तर दहा अकरा वर्षांचे असतील. परंतु वैराग्य शुक्राचार्यासारखे धगधगीत. वाणी गंगेसारखी निर्मळ.

आले ते प्रथम मारुतीच्या देवळात उतरले. कमरेस एक लंगोटी. मुखी अखंड नाम. एवढया लहान वयातहि ते तीर्थाटने करीत होते. समर्थ रामदासांप्रमाणे उपासना चालू होती.

मी, काशीराम, अप्पा जागले, अप्पा भिल्ल---अशी किती तरी तरुण मंडळी तेथे जात असू. त्याना शिधा वगैरे नेऊन देत असू. त्यांचा उपदेश ऐकत असू.

होता होता गावातील पुष्कळच मंडळी तेथे येऊ लागली. त्यांना देवीदासबाबा व्यंकटेशस्तोत्र शिकवू लागले. सर्वांकडून व्यंकटेशस्तोत्राचा नित्यपाठ करून घेऊ लागले. अप्पा भिल्लाला तर त्यांनी धूळपाटीवर अक्षरे कशी काढावी हेही शिकविले. या समोर झोपलेल्या बायजाबाईच्या पोराला—तो त्यावेळी अगदी लहान होता तरी उपदेश दिला.

अशा महाज्ञानी, परम वैराग्यशील देवीदासबाबांकडे त्यावेळी मी गेलो. मनाची व्यथा त्यांना सांगितली. तेव्हा ते म्हणाले,- "म्हाळसापती ! शेतजमिनीच्या अंगाची लाही लाही होते, तेव्हाच कोठे आकाशातील पर्जन्यराजास तिची दया येते खरे ना ? सग्दुरु मातेहूनही दयाळू. आपल्या पाठीमागेच तर ते उभे असतात. कौतुकाने आपल्या लेकराची कृती पाहात असतात."

"लेकरू आपल्या पायांनी चालता चालता कोठे पडले, त्याला खरचटले, ते रडू लागले की सग्दुरु धाव घेतात. अचलून वात्सल्यभावाने आपल्या हृदयाशी धरतात. तसे तुमचे सग्दुरू एक दिवस तुम्हास भेटतील. मनाचे पूर्ण समाधान करतील."

संताची वाणी सत्यस्वरुप. गंगेप्रमाणे पवित्र. वर्तमान-भूत-भविष्य जाणणारी.

देवीदासबाबांच्या शद्बांनी मनास एकीकडे दिलासा मिळाला. दुसरीकडे मनाची तळमळ तीव्र झाली. रात्ररात्रभर रडू लागलो मनाशीं म्हणालो: सग्दुरो ! मायबापा ! माझे आता या बागेसरीत आणखी किती दिवस जळत राहू ? सर्व हीण अजून जळाले नाही का ? अजूनही शुद्ध झालो नाही का ?

एक दिवस गावात बातमी आली: रानात निंबाखाली कोणी एक साधू प्रकट झाला आहे. तो वयाने अजून पोर आहे. जातीने मुसलमान आहे. तो साधू निंबाखाली बसून रात्रंदिवस जप करीत असतो.

हातातील काम टाकून मी धावतच गेलो. त्या मुलाला पाहिले. अगदीच कोवळ्या वयाचा तो एक मुलगा. हसरा. गमत्या. मनात म्हटले: कुरुक्षेत्रावर अर्जुनाला गीता सांगणारा तो चक्रपाणी द्वारकेत प्रथम प्रकट झाला तेव्हा असाच तर दिसत नसेल ! डोक्यावरील मोरपिसे, हातातील बासरी त्याने या रानात कोठें दडवून तर ठेवली नाही !

माझ्या मनातील वात्सल्य एकाएकी जागृत झाले. त्या मूर्तीला कन्हैया, कृष्णा, मुकुंदा, देवकीबाळा या नावानी संबोधावे असे वाटले. पण मी उगी राहिलो. मनाशी विचार केला: दारी आलेल्या प्रत्येक साधूकडे 'गुरु' म्हणून मी पाहिले. पण ते कोणीही माझे गुरू नव्हते. हा मुलगाही माझा गुरू असणार नाहीत. पोक्त, प्रगल्भ, शांत, समतोल, ज्ञानी, वत्सल अशी ती गुरूमूर्ती असली पाहिजे. ती मला एक ना एक दिवस भेटल्याविना राहाणार नाही.

मनात असा संशय, परंतु रोज सांजसकाळ त्या मुलाच्या दर्शनाला जाऊ लागलो. हात जोडून मनोमन प्रार्थना करू लागलो: देवा ! तुम्ही कोणीही असा. पण एवढी भीक घाला. माझ्या सग्दुरुंना मला भेटवा.

तो मुलगा मजकडे पाहून केवळ हसे.

एकच शद्ब बोले, " अल्ला-मालिक !"

एक दिवस तो मुलगाही निंबाखालून कोठे निघून गेला. लोकांनी रानात शोध शोध शोधले. पण कोठेही आढळला नाही.

ते भुयार पुन्हा कोणी उकरू लागले. त्या समया, ती जपमाळ तरी आहे की नाही पाहू लागले. तेव्हा गावातील पोक्त माणसे म्हणाली, "ते भुयार उकरू नका. तशी आज्ञा नाही. उकराल तर खोड्यात याल,. गावावर मोठे अरिष्ट येईल."

खरोखर ते गूढ स्थान म्हणजे त्या बालसाधूच्या गुरूंची समाधी असेल का ? समाधीसमोर बसून त्या मुलाने बारा वर्षे या रानात तप केले हे खरे असेल का ? परंतु

खोटे तरी कसे म्हणता येईल ? तो बालसाधू कधीही खोटे बोलणार नाही. जत्रेच्या वेळी प्रत्यक्ष खंडेरायांनीही असेच सांगितले, ते तर कालत्रयीही खोटे ठरणार नाही. थट्टा असणार नाही.

अशा रीतीने तो निंब, ते भुयार तेथेच राहिले. लोक पुन्हा आपल्या व्यवहारात गढले. मीही धंद्यात लक्ष घालू लागलो.

पण मन लागेना. गुरुभेटीची तळमळ शमेना.

पुन्हा रानात जाऊ लागलो. खंडेरायापुढे धरणे धरले.

एक दिवस देवीदासबाबा मला म्हणाले, "म्हाळसापती ! तुम्ही असे उदास का ? गुरुभेट होऊनही तुमच्या मनास शांती कशी नाही ?"

आश्चर्याने मी थक्क झालो.

त्यांच्या मुखाकडे पाहातच राहिलो.

तेव्हा हसत हसत ते म्हणाले, "रानात निंबाखाली प्रकट झालेले बालसाधू म्हणजे दुसरे कोण ? तुमचे गुरूच !"

मी अत्यंत दुःखी झालो. निधान अनायासे हाती यावे आणि त्याची ओळखच पटू नये ! तसे झाले.

गुरूदर्शन झाले; पण गुरूसहवास लाभला नाही. गुरूसेवा घडली नाही. केवळ बघ्या झालो. खरे-खोटे करीत बसलो. अशा तर्कटवाद्यावर गुरुकृपा काय होणार ! गुरू कंटाळले. आले तसे एक दिवस निघून गेले.

पुन्हा तळमळू लागलो. साईदेवा ! साईराया ! साईनाथा ! म्हणून हाका घालू लागलो. रात्रंदिवस साई-साई-साई हा एकच मंत्र जपू लागलो. आणि काय आश्चर्य, एक दिवस खंडेरायाच्या देवळाशीच ते भेटले. छत्रपती पितापुत्रांची भेट खंडेरायाच्या साक्षीने बारा वर्षानंतर झाली तसा भेटीचा योग आकस्मिकपणे आला.

त्यावेळी गुरूदेवांना मी काय म्हणालो बरे ? त्यांचे स्वागत कसे केले ? अजूनही आठवते. त्यावेळी मी त्यांना म्हणालो: आवोजी, आवोजी मेरे प्यारे साई !

साई-साई या मंत्रामुळे असेल किंवा वात्सल्य भावामुळेही असेल; मी त्यांना त्यावेळी 'साई' म्हटले. पण आज वाटते: पिता-पुत्रांची ती भेट नसून माय-लेकरांची ती भेट होती. ते साई नसून 'आई' होते.

मग त्यांना घेऊन गावात गेलो. काशीराम, अप्पा यांच्याशी भेट करविली देवीदासबाबांशी भेट करविली. पुढे जानकीदासबावांशी, गंगागीरमहाराजांशी आनंदनाथ महाराजांशी त्यांची भेट झाली. पण हे माझे गुरू ही वाच्यता मी केली नाही. मनाशी विचार केला: दैवयोगे रत्न हाती आले. ते नीट सांभाळले पाहिजे लोकात फारशी वाच्यता होणेही बरे नव्हे.

माझा हा दृढनिश्चय तडीस नेण्याचे ब्रीद तर गुरुरायांनी मनाशी बाळगले नसेल ?

कारण साधुत्वाची अंगावरील कवचकुंडले त्यांनी कोठे पुन्हा दडवून ठेवली. गावातील कोणत्याही गल्लीत आढळणाऱ्या एखाद्या कलंदर, गुलहौशी, रंगेल, तालिमबाज तरुणाचा आवेश अंगात आणला. केसांची झुलपे हालवीत, मिशीला पीळ भरीत, छाती पुढे काढून सकाळदुपार गावातून फिरू लागले. लोकांच्या कळी काढून कुस्तीची आव्हाने स्वीकारू लागले. अखेर एका तेढाचे रूपांतर कुस्तीत होऊन त्या मोहिद्दिन तांबोळ्याने याना पाडले. चारी मुंड्या चीत करून, यांना माती चारून, चांगले घुसळून तो यांच्या उरावर बसला.

तेव्हापासून याना जणू उपरती झाली.

डोक्यावरील ऐटबाज केशसंभार गेला. ऐटबाज कपडे गेले. जणू या अपमानाने पूर्ण विरक्त झाले. जगाच्या मैदानात अहंकारामुळे चारीमुंड्या चीत झालेल्या एखाद्या प्रापंचिक योद्ध्याप्रमाणे !

जे मूर्तिमंत वैराग्य, त्यानी वैराग्याचे हे नाटक तरी का केले असेल बरे ? अहंकाराचा शोकान्त लोकांपुढे ठेवण्यासाठी ? लोकाना शिकवून शहाणे करण्यासाठी ? पण हे करून त्याना काय मिळाले ? धोंडे न मारणारा एक वेडा-बावळा फकीर या लोकमताविना दुसरे काय ?

मशिदीत येण्यापूर्वी तकियात, एखाद्या देवळाच्या ओसरीस झोपत असत; पायांत चाळ बांधून खंजिरीच्या तालावर तासन तास नाचत-गात असत; मुरळ्यांचा नाच किंवा कव्वाल्या पाहाताना किंवा ऐकताना रंगून डोलत असत; वाहवा ! वाहवा ! बहोत अच्छा ! म्हणून ओरडत असत, हे तरी काय लोकाना माहीत नाही ?

या सगळ्याचा अर्थ इतकाच की लोकानी आपल्या नादी लागू नये. आपणास गुरू समजू नये. आपले देव्हारे माजवू नयेत.

पण कस्तुरीने कसलाही बुरखा घेतला तरी तिचा सुवास लोकांपर्यंत पोचायचा थांबणार थोडाच !

हा वेडा फकीर कितीही वेळा दारी येवो, कपाळभर कुंकू लावलेल्या बायजाबाईसारख्या स्त्रिया हातात भिक्षा घेऊन दारात हजर !

लोकांच्या मनातील एवढीही भक्तिभावना पुसून टाकण्यासाठी की काय, कुस्तीप्रमाणेच पुन्हा एक प्रकार गुरुदेवांनी केला. रहात्याहून आलेल्या त्या जव्हारअलीचे शिष्य आपण झाले. त्याच्या अगदी आज्ञेत राहिले. रात्रंदिवस मशिदित त्याची सेवा करू लागले. एक दिवस तर ही मशीद सोडून रहात्यास त्याच्याबरोबर निघूनही गेले.

त्या दिवशी माझ्यावर पुन्हा आकाश कोसळले. वाटले: शिरडी सोडून बाबा पुन्हा गेले. आता ते कसचे परत येणार !

पण दोन दिवस काही गेले नसतील ते पुन्हा परत आले. म्हणाले, "म्हाळसापती ! ही पाहा फुलझाडांची काही रोपे. आणि या फांद्या. रहात्याच्या चंद्रभानशेट मारवाड्याने हे दिले आहे. आता उत्तम माती आणून चांगले झकास वाफे करून आपण बाग करू."

मला वाटले: बाबांचे मन रहात्यास रमत नाही म्हणून ते पुन्हा आले. पण कसचे ! दोन दिवस काही गेले नसतील. पुन्हा ते जे गेले ते तिकडचेच झाले.

पुन्हा माझ्या मनाची घालमेल सुरू. धंद्यात लक्ष लागेना. अन्न गोड वाटेना.

एक दिवस काही मंडळींना बरोबर घेतले. रहात्यास गेलो. तेथे समजले की जव्हारअल्ली ही फार बडी असामी आहे.

एकदा त्याचे शिष्यत्व पत्करलेल्या पोरासोरांवरील त्याच्या हुकमतीची मगरमिठी सहसा सुटत नाही.

तेथील एका प्रतिष्ठित गृहस्थानी जव्हारअल्लीबद्दल जे सांगितले ते ऐकून तर आम्ही थक्कच झालो. ते गृहस्थ म्हणाले, "जव्हारअल्ली हा एक अत्यंत मृदुभाषी, बहुश्रुत, कुराण वगैरे धर्मग्रंथ पढलेला अति चाणाक्ष मनुष्य आहे. काही महिन्यापूर्वी तो येथे आला. आपल्या नम्र वाणीने त्याने सर्वांना भारले. गावातील अनेक भोळे लोकही त्याच्या नादी लागले "या गोष्टीचा फायदा घेऊन येथे एक इदगा बांधण्याचे ठरविले. त्यासाठी पैसेही गोळा करू लागले. एक दिवस काही लोकांच्या कानावर बातमी आली की त्याने आपल्या मुक्कामाच्या वखळीजवळचा वीरभद्र देव बाटविला.

"झाले. एवढ्या बातमीमुळे येथील लोक खवळले. त्याला त्याच्या शिष्यांसकट पिटाळून लावला.

"त्याला मग आश्रय मिळाला तो तुमच्या शिरडीत तोही एका फकिराने त्याला आश्रय दिला. तो फकीर म्हणजे जर तुमचा तो साई असेल तर मी आता येथूनच सांगतो की तो त्या जव्हारअल्लीच्या तावडीतून आता सुटणे कठीण. जन्मभर खांद्यावरून पाणी वाहता वाहता तो मेला, असेच तुम्ही आता समजा. निमुटपणे आल्या पावली तुमच्या शिरडीस जा. उगाच ब्याद नको."

त्या गृहस्थांचे हे बोलणे ऐकून आमचा धीर पार खचला. तरी पण मनाचा धडा करून, देवाचे नाव घेऊन त्या इदग्याजवळ गेलो. मनाशी विचार केला: बाबा जर एकटेच सापडले तर त्याना पळवूनही शिरडीस नेऊ. मग पुढचा प्रसंग पुढे !

परंतु झाले उलटेच. बाबा आम्हासच म्हणू लागले "तुम्ही कशाला येथे आला? जा ! जा ! आधी पळा येथून ! ते जर एवढ्यात आले तर तुमची किंवा माझी जिवंत राहाण्याची धडगत नाही. कोंबडीप्रमाणे ते आपल्या माना कापून टाकतील ! फार वाईट आहे त्यांचा राग ! फार वाईट !"

बाबा एवढे बोलतात न बोलतात तोच तो जव्हारअल्ली एखाद्या वाघाप्रमाणे कोठूनसा तेथे आला. डोळे लालेलाल करून, क्रोधाविष्ट होऊन म्हणाला, "कोण रे हे

लोक ? का आले होते हे येथे ? काय चालल्या होत्या कानगोष्टी ? या पोराला पुन्हा शिरडीला न्यायला आला ? पण मी तुम्हांला साफ सांगतो की हा पोरगा तुम्हाला आता परत मिळणार नाही. तो माझा बंदा आहे."

त्या राक्षसाच्या या शद्बांनी आम्हा तरूण मंडळींच्या मनात क्रोधाचा अग्नि पेटला. न कळतच आमच्या अस्तन्या वर झाल्या. आता युद्धप्रसंग होणार हे त्याने ओळखले. वरमून तो बोलला, "तसे नव्हे. मी म्हणतो याचा अर्थ ध्यानी घ्या. त्याला नेणार तर मला का नाही ? मलाही शिरडीस न्या. हा पोरगा मला दिलसे भी प्यार है. मेरी जान है. और क्या कहूँ ?"

जव्हारअल्ली शिरडीस आला आणि त्याच्या धर्मज्ञानाच्या भ्रमाचा भोपला फुटला. देवीदासबाबांसमोर त-त प-प करू लागला. हे पाहून देवीदास बाबा म्हणाले. "गुरू होण्याची तर तुझी पात्रता नाहीच; पण शिष्य होण्याच्या योग्यतेचाही तू नाहीस, चल ! येथून आधी काळे कर !"

देवीदासबाबांचे हे तीव्र शद्ब ऐकून जव्हारअल्ली तेथून जो पळाला, तो वैजापुरी गेला. त्यानंतर तो परवा येथे आला. बाबांसमोर गुडघे टेकून म्हणाला, "मी त्यावेळी आपला छळ केला. आज त्या गोष्टीचा पश्चाताप होत आहे. आपण क्षमा करून मला आपला मानावा."

बाबांनी त्याला क्षमा केली.

सर्वस्वाचा नाश करणाऱ्या अहंकाराचे बी किती भाजावे याची ही शिकवण. जो खरा शिष्य झाला तोच परम पदाचा अधिकारी झाला याचे हे उदाहरण. गुरुसेवेच्या आणि गुर्वाज्ञापालनाचा हा साधा सोपा आदर्श. हा आदर्श बाबांनी आम्हापुढे ठेवला.

म्हाळसापती बसल्या जागेवरून झटकन उठले.

बाबांची चिलीम तयार केली. बाबांच्या हाती दिली.

म्हणाले, "बाबा ! अजून नाही झोपला तुम्ही ? बाहेर पुष्कळ रात्र झाली."

बाबांनी एका हातात चिलीम धरली. दुसऱ्या हाताने तेथे झोपलेल्या मुलास उठवू लागले. म्हणाले, "तात्याबाळ ! उठा ! बाहेर आकाशात देवाने कसा दीपोत्सव केला आहे तो बघा !"

म्हाळसापती उठून धुनीजवळ गेले.

धुनी पुन्हा प्रज्वलित केली.

तिच्या तांबुस-लाल प्रकाशात बाबांचा चेहरा अतीव मोहक दिसत होता. जणू भगवान श्रीकृष्ण या क्षणी बाबांच्या रूपाने अवतरले होते. विश्वकल्याणाच्या विचारात निमग्न होऊन स्वतःशीच हसत-बोलत होते.

# नमस्कार माझा तुम्हां साइनाथा !

(वृत्त : भुजंगप्रयात)

—श्री. बाबुराव गांडोळे, मुंबई.

महन्मंगला आमुची भाग्यभू ही
इथें वाहते कर्मगंगा प्रवाही ।
जिच्या ज्ञानसिंधू पदीं ठेवि माथा
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥१॥

इथें जन्मले सन्त ज्ञानेशज्ञानी
तुकोबापरी देहुचे वैश्यवाणी ।
असे वर्णिता सन्त होईल गाथा
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥२॥

तुम्हां सन्तकार्यांत तें पूज्य स्थान
तुम्हां दिव्य दृष्टी, तुम्हां दिव्य ज्ञान ।
तुम्ही लाविलें भाविकां भक्तिपंथा
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥३॥

तुम्हां मानिती सर्वची भक्त देव
उदी आपुली दिव्यतेचा प्रभाव ।
जिचा स्पर्शही नाशवी घोर चिंता
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥४॥

करीं आपुल्या 'दंड' जो दुःखहारी
पिशाचादिकें—काळही ज्या थरारी ।
कृपाहस्त तो आपुला भाग्यदाता
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥५॥

नसो तेलही, नित्यनेमेचि रातीं
तुम्ही जाळिली निर्मला नीर-ज्योती ।
पदीं कौतुकें ठेविती लोक माथा
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥६॥

पदीं मुक्त तो दीन शार्दूल केला
अजा घेतल्या दाम देऊन सोळा।
तुम्ही धांवला सर्प मंडूक खातां
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥७॥
अही, पाल, बेडूक, व्याघ्रा-अजादी
असे भोग प्रारब्धिचे वर्मभेदी।
कथारूप ती गायिली कर्मगाथा
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥८॥
कुदैवें कुणी आपुले भोग भोगी
कुणी दुःखि-कष्टी, कुणी जीर्ण रोगी।
दिलें सौख्य त्यां लाख, कोटी अनाथा
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥९॥
महामारि गांवावरी क्रूर येतां
दळोनी स्वयें 'पीठ' केलें अनंता
महासंकटीं जाहला लोकत्राता
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥१०॥
असो हिन्दु, मुस्लीम वा तो इसाई
कुणी उच्च नाही, कुणी नीच नाहीं।
दिला मंत्र हा एकतेचा समर्था
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥११॥
जनोद्धारणीं ग्राम उद्धार केला
दिलें भाग्य त्या शिर्डिच्या वैभवाला।
नमो द्वारकाई–समाधिस्थ सन्ता
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥१२॥
भवाब्धी तराया प्रभूनामनौका
असे एकची साह्यदायी अनेकां।
मिटे दुःख-व्याधी कृपालाभ होतां
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥१३॥
कृपें आपुल्या पन्त 'हेमाड' ज्ञानी
'चरित्रीं' जयें ओतिली 'व्यासवाणी'।
शिणे लेखणीही गुणां गौरवीता
नमस्कार माझा तुम्हां साइनाथा ॥१४॥

* * *

# श्री साईगीतमाला

——मधुकर जोशी

गीत ५ वे

शिरडीला रामनवमीची यात्रा प्रथम साईबाबांनी सुरू केली. शके अठराशे तेहेतीस साली...रामनवमीचा पहिला उत्सव थाटाने साजरा झाला. उत्साहाला सीमा नव्हती. त्यावेळेचे हे आनंद गीत...निवेदक गात आहे——

चैतन्य रोम रोमीं चैत्रात न्हात आहे
शिरडीत राम जन्म श्रीसाईनाथ पाहे ।।ध्रु।।

शिरडी नव्हे अयोध्या नटली फुलाफुलांनी
गाती सुवासिनी त्या मोदें भरून गाणी ।
सरिताच भक्तिची ही— सूरात गोड वाहे ।।१।।

वाजे सुरेल सनई— घुमते मधूर वीणा
वाही सुगंध वारा— घुमवीत गोड ताना !
त्या चौघड्यांत आज आनंद वाहताहे ।।२।।

आभाळ आईरूपें बघते दहा दिशांनी
धरणीवरी झुले हा.. किति पाळणा फुलांनी ।
प्रभुराम जोजवितां मांगल्य नांदताहे ।।३।।

गेली मशीद फुलुनी त्या सर्व माणसांनी
अल्ला रहीम राम... नव्हतेच अन्य कोणी
प्रारब्ध हा प्रसाद कर्मीत राहता हे ।।४।।

त्या पेटत्या धुनिचा— देई प्रसाद साई
प्रभुराम कीर्तनाला हनुमान दिव्य येई
रामायणात सारे सगळेच सार आहे ।।५।।

# स्वामी स्वरूपानंद

–ले. डॉ. रा. य. परांजपे, रत्नागिरी.

(स्वामी स्वरूपानंद यांचा सत्तरावा वाढदिवस त्यांच्या भक्तांनी नुकताच मोठ्या प्रमाणावर साजरा केला यानिमित्य स्वामीजींचांहाप रिचय––संपादक.)

साईलीला मासिकाच्या वाचकांकरिता हा अल्प परिचय देण्यात येत आहे. सुमारे आठवर्षांपूर्वी त्यांचे विस्तृत चरित्र प्रकाशित झाले. त्यानंतर मराठी व इंग्रजी लहान मोठी चरित्रे प्रकाशित झाली आहेत. 'दीपलक्ष्मी या मासिकाने तीन वर्षापूर्वी त्यांचा एक विशेषांक प्रसिद्ध केला. यामुळे महाराष्ट्रात तरी त्यांचे विषयी पुष्कळांना परिचय झालेला आहे. स्वामींचा खरा अंतरंग परिचय त्यांच्या विपुल ग्रंथ संपत्तीने गेल्या १५-२० वर्षांत चढत्या वाढत्या प्रमाणात होत गेला आहे. असे असले तरी अद्या-पहि त्यांचा परिचय नसलेली अशी पुष्कळच मंडळी आहेत.

कोकणात रत्नागिरी या जिल्ह्याच्या शहरापासून फक्त आठ मैल अंतरावर पांवस या नावाचे एक ४५ हजार वस्तीचे खेडेगाव आहे. स्वामी स्वरुपानंदांचे मूळ पुरुष गोविंद भटजी गोडबोले हे रत्नागिरी जवळील कासारवेली या गावाहून पांवस येथे येऊन स्थायिक झाले. स्वामी स्वरुपानंद यांची १०वी पिढी चालू आहे. हे एक प्रतिष्ठित घराणे म्हणून सुप्रतिष्ठित झाले होते.

स्वामींचे वडील विष्णुपंत हे एक देव माणूस होते. संसारात पूर्ण अनासक्त असून भगवंताचे नामस्मरण आणि विष्णुसहस्त्र नामाचे पाठ करणे हाच त्यांचा छंद असे. त्यामुळे स्वामींची आई सौ. रखमाबाई यानाच प्रपंचातील हरएक गोष्टींत लक्ष द्यावे लागे. घरातील वातावरण सात्विक आणि परमार्थ प्रवृत्तीला पोषक असे होते.

स्वामीचा जन्म १५-१२-१९०३ मध्ये झाला. नाव 'रामचंद्र' ठेवण्यात आलें. त्यांना दोन बंधु आणि चार बहिणी होत्या. स्वामींना रामभाऊ किंवा आप्पा या नावानें ओळखले जात असे सहाव्या वर्षी शालेय शिक्षणाला सुरुवात झाली. वयाच्या आठव्या-वर्षी त्यांचे मौंजीबंधन झाले. त्यांचे व्यक्तिमत्व अगदी लहानपणापासूनच आकर्षक होते. गौरवर्ण मंदस्मित मुखमंडल. नेत्रात दिसून येणारी बौद्धिक चमक आणि आचरणांतून प्रतीत होणारा अंतरातील गोडवा. तो हरएक व्यक्तीचे मन आकृष्ट करुन घेत असे. हा मुलगा सामान्य नसून पुढे नाव काढणार असे आईवडिलांना व इतरानाही वाटत असे. सवंगडी जमवून बालवयातील हरएक खेळ खेळण्यात हा बाल-चमूत अग्रगण्य असे.

मौंजी बंधनानंतर पूर्व संस्कारित मनाला अधिकच उजाळा मिळून त्यांचे मन आता धार्मिक आचार विचारांकडे अधिकाधिक आकृष्ट होऊ लागले. मौंजी बंधना पूर्वीचा खेळांचा हव्यास कमी होऊ लागला. संध्याविधि हा मौंजीबंधना पूर्वीच वडील बंधूंच्या अनुकरणाने याने आत्मसात केला होता. स्तोत्रें, अभंग, भूपाळ्या भक्तिपर पदें वगैरे पाठांतर करण्याचा छंद वाढू लागला. क्रीडासक्त जीवनाला कालाटणी मिळून ते आता क्रीडायुक्त परंतु गीतेच्या अध्ययनात आसक्त झाले. गीतेचा हा बालछंद त्यांना ऐन तारुण्यात गीतार्थाच्या अमृतरसात खोलवर बुडी देण्याला उपकारक झाला.

वडीलधाऱ्या मंडळीकडून रामायण, भारत व भागवत यातील भावरम्य कथा ऐकण्यात याला अतीव गोडी वाटावयाची व त्यामुळे आपणहि ध्रुव, प्रल्हादाप्रमाणे थोर भक्त व्हावे ही वासना वरचेवर उफाळून येत असे. जवळच्या विश्वेश्वराच्या मंदिरात जाऊन शिवदर्शन घेताना याचा भक्तिभाव फुलत असे.

घरच्या धार्मिक संस्कारित वातावरणात आईवडिलांच्या कृपाछत्राखाली इयत्ता ४ पर्यंतचे शिक्षण पांवस येथे झाले. पुढील इंग्रजी शिक्षणाकरिता रत्नागिरी येथे यावे लागले. रत्नागिरी येथे मुद्दाम बिऱ्हाड करून त्यांची प्रेमळ चुलती त्याच्या व्यवस्थेकरिता येऊन राहिली. रत्नागिरी येथे इंग्रजी ५ इयत्तांचे शिक्षण झाले. या पांच वर्षाच्या कालात अभ्यासाबरोबरच त्यांचा सर्वांगिण विकास होत गेला. शाळेंत एक हुशार, विनम्र आणि शिस्तबद्ध विद्यार्थी म्हणून सर्वांना प्रिय झालाच परंतु या गुण-समुच्चयामुळे त्याच्या नातलग व परिचित मंडळीतहि कौतुक होत असे.

रत्नागिरी येथे आल्यानंतर त्यांना प्रियतम वाटणारे बौद्धिक खाद्य विपुल मिळू लागले व ते त्याने एकाद्या अंधारा प्रमाणे सेवनहि केले. परंतु ते नीट पचले असे मननाचे चर्वन तो करीत असे. त्यामुळे त्याचा ठसा त्याच्या आचरणात उमटत असे. तत्कालीन राजकारणाचा अभ्यास तो चिंतन पूर्वक करीत असे त्यामुळे देश प्रेमाचे वारे अंगांत संचरत होते. अशा प्रकारे या शिक्षणाच्या कालखंडात एक नवीन व्यक्तिमत्त्व तयार होत होते.

रत्नागिरी येथें इंग्रजी ५ वी पर्यंतचे शिक्षण झाल्यावर पुढील शिक्षणासाठी हा विद्यार्थी मुंबईस आपल्या मामांकडे गेला. त्याला आता विद्यार्जनाला अधिक व्यापक क्षेत्र उपलब्ध झाले. या विद्यार्थीदशेत फक्त हा शालेय शिक्षणाचा विद्यार्थी नव्हता. विश्व हेच विद्यालय आहे आणि आपल्याला ज्ञानदान करणारे अनेक शिक्षक आहेत, या भावनेने हा विद्यार्थी आपल्या अभिरुचिप्रमाणे संग्रह करण्यात सदैव दक्ष असे.

मुंबई येथे आंग्रेवाडीतील आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयात पुढील शिक्षण सुरु झाले. घारपुरे या नावाचे एक उत्तम शिक्षक याला लाभले होते. त्यांचा या विद्यार्थ्यावर विशेष लोभ होता. त्यांच्याकडून संस्कृत या विषयाची विशेष तयारी होण्यास सहाय्य झाले. त्याच प्रमाणे गीतारहस्य आणि ज्ञानेश्वरी यांच्या अभ्यासाला या शिक्षकांचे सहाय्य झाले.

आप्पा ज्यांच्याकडे रहात होते ते केशवराव गोखले हे या भाच्यावर फार प्रेम करीत ते स्वतः पुणे येथील 'बाबामहाराज वैद्य, यांचे अनुग्रहित होत. त्यामुळे ज्ञानेश्वरी वाचन आणि आत्मचर्चा चालत असे त्यावेळी हा भाचा हा अत्यंत त्यांचे आस्थेने श्रवण करीत असे. त्यामुळे याला 'सग्दुरुकृपांकित' करावा असा मामानी विचार केला होता.

मुंबईतील या शैक्षणिक काळात प्रचलित राजकारणाराकडे तो आस्थेने पहात असे. महात्माजींचा अनत्याचारी मार्ग त्याच्या प्रकृतीला मानवला आणि स्वदेशी आणि बहिष्कार या चळवळी यशस्वी करण्यासाठी शाळेवर बहिष्कार घालून तो १९२१ मध्ये बाहेर पडला आणि पुनश्च पांवस येथे येऊन 'स्वावलंबनाश्रम' या नावाचा आश्रम काढाला.तत्पूर्वी टिळक महाविद्यालयाची प्रवेश परीक्षा देऊन तो त्यांत उर्त्तीण झाला होता. सन १९२२ मध्ये या कार्याला सुरवात झाली.

स्वावलंबनाश्रमात अभिनव शिक्षण मिळावे अशी उखळी याने केली होती. त्यांना आता गावांत विशेष दर्जा प्राप्त झाला होता तो आता नेता आणि उत्तम शिक्षक झाल्याने आता कोणी एकेरी नावाने संबोधित नसत. म्हणून आता आदरार्थी नामाने त्यांना संबोधले. जाऊ लागले. या आश्रमात मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण द्यावे असा संकल्प ठरला. त्याच प्रमाणे स्वदेशीचे व्रत विद्यार्थ्यांनी घ्यावे यासाठी सूतकताई, खादी तयार करणे यांची जोड त्यांनी दिली. बहुतेक सर्व प्रकारचे शिक्षण हे स्वतःच देत असत.
हे स्वतः खादी तयार करुन तेच कपडे वापरीत असत. कित्येक विद्यार्थी याच प्रमाणे वागत असत. विद्यार्थ्यांची संख्या ६ पासून २/३ वर्षांत ४०, पर्यंत झाली. परंतु पुढे या शाळेत शिक्षण घेतल्यास सरकारी नोकरी मिळणार नाही या भीतीने विद्यालय बंद पाडण्याची वेळ आली. त्यामुळे विद्यालय बंद करण्यात आले.

मॅट्रिक पर्यंत शिकवून तयार केलेल्या आपल्या ३-४ विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन आप्पा आता पुण्यास आले. सन १९२३ मध्ये वयाच्या विसाव्या वर्षीच पुणे येथील 'सद्‌गुरू बाबा वैद्य' यांचा त्याना अनुग्रह लाभला असल्याने १९४७ च्या मार्च मध्यें ते पुण्याला येईपर्यंत त्यांची आध्यात्मिक क्षेत्रातहि भरीव प्रगति झाली होती. आता तर सद्‌गुरू सान्निध्याचा लाभ वारंवार मिळू लागल्याने ते आत्मचिंतनात सदैव रममाण होऊ लागले. सद्‌गुरूंचा हा सर्वांत लाडका शिष्य झाला व त्यांला ते 'स्वरुपानंद' म्हणू लागले. हेच नांव पुढे रुढ झाले.

पुणे येथे एक लहानशी खोली घेऊन आपल्या ३-४ छात्रगणांसह स्वरुपानंद तेथे राहू लागले. स्वतः त्यांना वाङ्मयविशारद व्हावयाचे होते. परंतु स्वतःपेक्षा त्यांना छात्रांची काळजी जास्त वाटत होती. स्वावलंबनानेच शिक्षण घ्यावयाचे हा निर्धार होता व घरची मदत मिळण्याची शक्यताहि नव्हती त्यामुळे द्रव्यार्जनाकरिता त्याना अनेक उद्योग करावे लागत. अत्यंत कष्ट करूनच हे शिक्षण त्यांना संपादावयाचे होते.

या शिक्षणाच्या कालात मुख्यत: ज्ञानेश्वरीच्या वाचनात आणि चिंतनात ते रमून जात असत आणि इतर व्यवहार काळी सोऽहं साधनेच्या अनुसंधानात रहाण्याचा त्यांचा प्रयत्न असे. सर्व कर्मात आत्म्याचे साक्षित्व अनुभविणे हा अभ्यास सतत करीत राहिल्याने त्यांची अंतर्निष्ठा वाढत होती. त्यांची होत असलेली आध्यात्मिक प्रगती ही वैयक्तिक स्वार्थासाठी नव्हती. परार्थातच ते स्वार्थ अनुभवित होते त्यामुळे आवश्यकता वाटताच ते कायदेभंगाच्या चळवळीत खेचले गेले.

**कायदेभग तुरुंगवास**

सन १९३० मध्ये मिठाच्या सत्याग्रहाकरिता रत्नागिरी जिल्ह्यात स्वामींनी प्रचारकार्य केले व त्यांना रत्नागिरी जेल मध्ये स्थानबद्धहि करण्यात आले. त्यानंतर १९३२ मध्ये येरवडा जेलमध्येहि त्यांनी कारावास भोगला. येरवडा जेलमध्ये आसनस्थ होऊन तासन् तास ते आत्मानुसंधानात रमून जात. त्यांचेकडे पाहून त्यांचेबरोबर असलेली मंडळी त्यांना स्वामी किंवा मुनी या नांवाने संबोधू लागली. या मंडळीत आचार्य भागवत, आचार्य जावडेकर, एस्. एम्. जोशी, शंकरराव देव, रावसाहेब पटवर्धन वगैरे बडी मंडळी होती. अशा प्रकारे कारावासात रूढ झालेले स्वामी हे नाव आणि स्वरुपानंद हे गुरूंनी ठेवलेले लाडके नांव मिळून 'स्वामी स्वरूपानंद' हे जोड नांव तयार झाले व तेच त्यांनी स्वीकारले आहे.

या कारावासाच्या काळात स्वामींची आध्यात्मिक प्रगति भरपूर झाली व त्यांना स्वत:ला धन्यता वाटली. सद्गुरुकृपेमुळेच हे परम भाग्य लाभले म्हणून आपले अनुभव नऊ ओव्यात ग्रंथित करून तो नवरत्नहार सद्गुरू बाबा वैद्य यांना त्यांनी समर्पण केला. शिष्याच्या या धन्यतेच्या वाक्पुष्पांनी बाबांना अतीव आनंद झाला व संतोषाने त्यांनी स्वामींचे मस्तकी आपला अभयहस्त ठेवला.

१९३४ साली वाङ्मय विशारद परीक्षेला बसावयाचे ठरवून विषयांचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी ते घरी पांवस येथे आले. परंतु थोडेच दिवसात मलेरियाचा ताप येऊ लागला. प्रकृति अशक्त झाली आणि त्यांचे प्रवृत्तीचे पाय पांगळे करणारी एक घटना घडून आली.

**'पुनरजन्म'**

मोठ्या आजारातून मनुष्य उठला म्हणजे त्याला पुनर्जन्म झाला असे म्हटले जाते. परंतु स्वामी ज्याला पुनर्जन्म म्हणतात तो निराळ्या प्रकारचा आहे. देहबुद्धि नष्ट होऊन परब्रह्माचा पूर्ण साक्षात्कार होणे हाच खरा पुनर्जन्म आहे. तुकाराम महाराजांनी 'आपुले मरण पाहिले म्यां डोळा' या शब्दात या स्थितीचे वर्णन केले आहे. स्वामींनीहि—

'अठराशे छप्पन्न शकाब्दी मृत्यु पावलों आम्ही'

या शब्दात या स्थितीचे वर्णन केले आहे. या परमेश्वरी कृपेची नाट्यमय घटना घडली ती अशी—प्रकृति अशक्त, अंगात थोडा ताप अशा स्थितीत ४/५ फर्लांग अंतरावर

डॉ. बाबा देसाई या आपल्या छात्राकडे ते इंजेक्शन घेण्याकरिता गेले. आणि परत येतेवेळी थोडे अंतर चालल्यावर त्यांना तीव्र थकवा जाणवू लागला. हातापायांतील ताकद गेली व आपण आता मरणाचे दारात आहो असे वाटू लागले. कसेबसे लटपटत घर गांठून ते अंथरुणावर आडवे झाले. आणि आईला खुणेनेच डॉ. देसाई यांना बोलावण्यास सांगितले. थोड्या वेळात बाबा आले. बाबा ती स्थिति पाहून स्वतः घाबरून गेले परंतु इतरांना ते धीर देत होते. सर्वांनाच ती काळरात्र वाटू लागली. गावात स्वामी अत्यवस्थ असल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. स्वामींना मत्युचे विराट दर्शनच झाले-देहाभिमानासहित सर्व आशापाश तुटून ते भक्तीच्या प्रांतात प्रविष्ट झाले. या स्थिती-बद्दल स्वामींनी स्वतःच म्हटले आहे की 'भीतीतून भक्तीचा उदय झाला' ज्ञानाचा उदय झाला असे म्हटले नाही. ज्ञान होतेच परंतु भक्तीवाचून ते पोचट होते. भक्ती-वाचून ज्ञानाची पूर्णताच नाही हे सत्य यावेळी अनुभवगम्य आहे. याच स्थितीत वैरा-ग्याची परिपक्वता होत असते. भक्तिज्ञान वैराग्य या तिहींच्या प्राप्तीत संसार दुःखाचा अंत होऊन परमानंदाची प्राप्ती होते. या स्थितीत देहाला वैफल्य होते. कित्येक दिवस डोळे उघडून बघणेही शक्य झाले नाही. एक मनुष्य सतत जवळ असणे आवश्यक झाले. अशा स्थितीत औषधोपचाराचे व मुख्यतः त्यांच्या मनःस्वास्थ्याने प्रकृति क्रमशः सुधारत होती तथापि त्यांना ६ महिने अंथरुणावर निजून काढावे लागले.

आजारीपणाच्या या सहा महिन्यांच्या प्रदीर्घ काळात स्वामी भाव-राज्यात विहरत होते. आत्मचिंतनात रममाण झालेले होते. आजाराच्या आणि अन्य बाह्य उपाधीत निरुपाधिक अवस्था भोगीत होते. डॉ. बाबा देसाई हे औषधोपचारांची शिकस्त करीत होते. परंतु औषधांचा उपयोग शून्यवत् होत होता. परंतु खरे अंतर्बाह्य आरोग्य प्राप्त करून देणारे भक्ति रसायन स्वामींना जगन्माउलीने कृपेने दिले होते व त्या रसायनाचे ते अखंड आणि आकंठ सेवन करीत होते. सहाजिकच अशावेळी तृप्तीचे ढेकर यावयाचेच ! हे तृप्तीचे ढेकर म्हणजेच स्वामींचे अमृतधारा हे काव्य होय. १६२ साक्यांचे हे भक्तिरसमय मधुर काव्य आहे. आजारीपणात लटपटत्या हातांनी हे काव्य लिहिले असले तरी ते अनुभवाच्या भक्कम पायावर आधारित आहे. वाचकांना त्यातील रसास्वाद चाखता यावा म्हणून अल्पसा नमुना उधृत करीत आहे.

देह पराधीन पण मन मात्र जगन्माऊलीच्या चिंतनात मनपणा विसरून तल्लीन झाले आहे. महासुखाच्या अतिरसात जीव भावाची आटणी होत आहे.

**निज शय्येवरि देह दिसे परि असे कितीदा दूर ।**
**मातृ चरण तल्लीन मन तदा नयनीं लोटे नीर ॥**

जगन्माऊली आपले बाळ आपल्यांवर निर्भर राहून पूर्ण निर्भय झाले आहे की नाही याची जणु मरणाची भीति दाखवून परीक्षाच घेत आहेत व बाळ त्या परीक्षेला उत्तीर्ण झाले आहे. हा भाव पुढील साकीत आहे.

**'भीति वाटली का बाळ तुला ? छे ! गे ! मुळीच नाही ॥**
**माऊली, तुझी मला मुलाला गमेल भीति काई ? ॥**

सर्वांभूती भगवद्‌भाव कसा बाणला ते दाखविणाऱ्या दोन साक्या :–

**"भु: भु: भु: भुंकतें श्वान तें छे ! छे ! प्यारे राम।**

**'डरांव डरांव बेडूक ओरडे ? छे रे ! आत्माराम"**

**'चिव चिव' गाते चिमणी ? छे ! छे ! माझा प्यारे राम।**

**'टिटिव टिटिव टिव टिटवी ? छे रे ! माझा आत्माराम ॥"**

मर्यादित लेखात अमर्याद अवतरणे देण्याचा मोह आवरावा लागत आहे. समारोप म्हणून आता एकच साकी देत आहे.

**'माताजी हे जगन्मातर्–भाग्यवान् तव नंदन।**

**करी 'अमृत धारा' या तुझ्या तुज समर्पण ॥**

जगन्माऊली कृपामेघाची ही जणू वृष्टीच आहे या भावनेने या काव्याचे स्वामित्व स्वामींनी आपल्याकडे न घेता ते तिचे तिलाच अर्पण करून जगन्मातेच्या पदकमलावर अमृतधाराभिषेकच केला आहे !

या पुढील काळात प्रकृति सुधारू लागली. ४।६ फर्लांग चालता येऊ लागले. परंतु प्रकृति यापेक्षा अधिक सुधारलीच नाही. त्यांचे जीवन हे आता पूर्णतय: परमार्थ प्रवण झाले. सदोदित आत्मानुसंधानात रमावे; सहज झेपेल तेवढे शारीरिक व बौद्धिक कार्य करावे आणि निश्चित असावे !

आजारातून उठल्यावर स्वामी गावातील एका अगत्यशील व्यक्तीकडे राहू लागले. स्वामींचे विद्यार्थी डॉ. बाबा देसाई यांचे वडील 'अण्णा देसाई' यांचेच आग्रहावरून ते त्यांचे घरी वास्तव्य करून राहिले व ते अद्यापहि त्यांचेकडेच रहात आहेत. देसाई यांचे सर्वच कुटुंबियांना स्वामीविषयी अमाप आदर सतत वाटत आला आहे.

अप्पा देसाई यांचे घर निरंतर गजबजलेले असावयाचे. स्वामी हे आता एकांतप्रिय झाले होते. त्यांनी एकांत साधने करिता घराजवळील एक खोपट पसंत केले. त्यात अनेक प्रकारची लाकूड सामानाची अडगळ साठवलेली होती. त्यातील जागा पसंत करून दिवसा काठी बराच वेळ ते सोऽहंसाधनेत निमग्न असत. आजूबाजूला काही सद्‌ग्रंथ असावयाचे. मुख्यत: रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांच्या वाङ्‌मयात ते विशेष रमत असत. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ तर त्यांचा जिवलग सोबती होय. देवांची पूजा करून तुळशीची पूजा व सूर्याला मनानेच द्वादश नामोच्चार पूर्वक नमस्कार करून तीर्थ घेणे आणि लहान मुलांना उपयुक्त असे शिक्षण देणे हे नित्यकर्म होते.

अण्णा देसाई यांची मोठी कन्या ही अकाली वैधव्य येऊन अप्पांकडेच राहू लागली होती. स्वामींच्या सहवासाने तिच्या ठिकाणी परमार्थाची ओढ निर्माण झाली. स्वामी तिचेकरिता ज्ञानेश्वरीतील काही महत्त्वाचे भाग सांगत व संपूर्ण गीता अर्थासहित पाठ करून घेतली. ताई या आजहि रोज संपूर्ण गीता पाठ करीत असतात.

सन १९४२ मध्ये स्वामींना सगुण साक्षात्कार झाला. सगुण श्रीहरीची साक्षात् भेट व्हावी अशी अमर्याद ओढ वाढत गेली. रात्री १० वाजण्याचे सुमारास घरातील

मंडळी झोपली आहेत अशा निवांत वेळी स्वामी आत्मचिंतनात मग्न होते. एकाएकी आपण देवघरात देवापुढे बसलो आहोत असे वाटले व एकदम 'कड्ाड्काड्' असा आवाज कानी आला व विद्युल्लतेप्रमाणे प्रकाश फाकला. लगेच पुढील शब्द घनगंभीर स्वरात कानावर आले.

'वो गोडबोले किधर है ? जिसने ज्ञानेश्वरी लिखा' तात्काळ भगवान श्रीविष्णूचे दिव्य दर्शन झाले ! ना दर्शनानंदात ते निमग्न झाले. भगवंताच्या कृपेची साक्ष पटली सद्गुरूसेवेला भगवान केवढे महत्त्व देतात हे भगवंतांच्या उद्गारावरून दिसून आले. स्वामींनी संपूर्ण ज्ञानेश्वरी उत्तम स्वहस्ताक्षरात लिहून ती सद्गुरुंना समर्पण केली होती या भक्तीने सद्गुरू 'गणेशनाथ' हेहि प्रसन्न झाले होते. ते ऋण भगवंताला दर्शन देऊन व्यक्त करावे लागले. यावरून स्वामींचे ठायी सद्गुरुभक्ति आणि भगवन्निष्ठा उच्च प्रतीची होती हे दिसून येते.

या नंतरच्या काळात सुंदर ग्रंथ रचना करून आध्यात्मिक वाङमयात मोलाची भर घातली. आणि त्यामुळे त्यांची कीर्ति सर्वत्र पसरू लागली. या वाङ्मय कृतीची थोडक्यात ओळख करून देणेच या अल्प लेखात शक्य आहे.

१९३३–३४ च्या आजारातील 'अमृतधारा' हे साकी वृत्तातील छोटेसे काव्य परंतु भावभक्तीने आणि स्वानुभवाने बहरलेले रसाळ काव्य आहे. त्यानंतर भगवद्-गीतेवर मुख्यतः ज्ञानेश्वरीच्या आधारे 'भावार्थ गीता' हे साकी वृत्तातील काव्य लिहिले गेले. केवळ सम श्लोकी प्रमाणे रचना न करतां विषयाच्या महत्त्वाप्रमाणे एकेका श्लोका-वर अनेक साक्याहि केलेल्या आहेत. रचना प्रासादिक आणि रसाळ आहे. त्यानंतर स्वामींच्या अभंगांचा संग्रह 'संजीवनी गाथा' या स्वरूपात प्रकट झाला. 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ सर्व सामान्य वाचकाला सहज समजावा म्हणून आधुनिक सोप्या भाषेत स्वामींनी 'अभंगवृत्तात' त्याचे रूपांतर केले. 'अभंग ज्ञानेश्वरी' या नावाने हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. ज्ञानेश्वरांचे दोन ग्रंथ म्हणजे 'अमृतानुभव आणि चांगदेव पासष्टी' या ग्रंथांवरहि अभंगवृत्तात स्वामींनी सुलभ रूपांतर केले आहे. अशा प्रकारे निर्माण केलेल्या वाङ्मयामुळे ज्ञानेश्वरांच्या प्रतिभासंपन्न वाङ्मयाचा सामान्य वाचकांना चालू भाषेतून परिचय होत आहे.

१९३४ नंतर स्वामी आजारातून बरे झाले. परंतु प्रकृति कायमची अशक्तच राहिली. १९५६ पर्यंतच्या बावीस वर्षांचा काळ हा सद्ग्रंथ वाचन, लेखन व आत्मचिंतन यांतच प्रामुख्यांने व्यतीत झाला. पांवस सारख्या खेडेगावात त्यांना अध्यात्मिक क्षेत्रातील असाधारण व्यक्ति म्हणून ओळखणारी मंडळी अत्यल्पच होती. परंतु त्यांच्या ग्रंथ प्रकाशनामुळे, त्यांची प्रसिद्धि वाढू लागली व मुमुक्षु, साधक, जिज्ञासू अशा विविध योग्यतेची मंडळी त्यांचेकडे येऊ लागली. त्यांचा अनुग्रह लाभू लागल्यानें त्यांचा शिष्य परिवार वाढू लागला आणि सध्यातर त्यांचेकडे दर्शनाला येणारांची संख्या झपाट्याने वाढत आहे.

स्वामी कोणत्याहि सांसारिक अडीअडचणींवर उतारे सांगत नाहीत. संसारातील अडीअडचणींवर मात करावयाची तर 'भगवंतावरील निःसीम भक्तीनेंच ती करता येईल. त्यानेच दुःखहि सुखाने सोसण्याची शक्ति येईल. हाच त्यांच्या उपदेशाचा सारांश आहे. खऱ्या सुखाचा मार्ग फक्त अध्यात्मशास्त्रच दाखवू शकते. हे प्रत्येकाने नीट समजून घेणे आवश्यक आहे.

गेली ३-४ वर्षें स्वामी प्रकृतीनें फारच अशक्त झालेले असून तो थकवा दिवसें दिवस वाढतच आहे. सध्या बहुतेक काळ ते निजूनच असतात. खोलीच्या बाहेरहि येऊ शकत नाहींत. पराधीनपणा आहे. दोन तीन वेळी दुरूनच दर्शन घ्यावे लागते. दर्शनाला मंडळी थोडी असली आणि प्रकृति ठीक असलीतर स्वामींचे जवळ जाऊन बसण्याचा बोलण्याचा लाभ काही भाग्यवंतांना लाभतो. परंतु बहुतेकांना दुरून दर्शन व त्यांचा आशीर्वाद लाभतो. सन्निध्य दर्शन व त्यांचेशी संभाषणाचा लाभ मिळावा म्हणून म्हणून लांबून येणारी मंडळी बरेच वेळा निराश होऊन जातात. स्वामींना प्रकाश सहन होत नसल्याने खोलीत अल्पमात्र प्रकाश असावा लागतो. त्यामुळे दारातून स्पष्टदर्शन बरेचवेळा होत नाही व स्वामींच्या सांप्रतच्या अशक्त प्रकृति मानामुळे यावर काहींच उपाय नाहीं. १९३४ मधील आजाराने प्रकृति कायमचीच अशक्त होऊन राहिली होती व आतातर ७० व्या वर्षात त्यांनी पदार्पण केले आहे. त्यांचे जीवन कृतार्थ असल्याने ते आत्मतृप्त आहेत. त्यांना काहीही मागावयाचे व मिळवावयाचे नाही. परंतु आपले एक मागणें आहे व ते म्हणजे त्यांना निरामय उदंड आयुष्य लाभो आणि सर्वांना दर्शन आणि आशीर्वचन यांचा लाभ घडो !

# मन राख मानवा शांत शांत

मन राख मानवा शांत शांत,
निज आत्मा दावि स्वभाव शांत ।।धृ।।

जिकडे तिकडे, दृष्टि फेकतां,
ना गवसे तुज, कुठें शांतता,
धनोपार्जनी सदा व्यग्रता,
यास्तव मानव त्रस्त ग्रस्त ! ।।१।।

मन हे नाही पापी अथवा,
सैतानहि ना, नाहि मूर्ख वा,
पापाचरणीं पात्र त्याजला,
ठरवुनि बससी, स्तब्ध मुग्ध ! ।।२।।

राजस वृत्ती, सत्व, तमो, गुण,
संस्कारांनीं, वेष्टित हे मन,
स्वभाव प्रकटवि ते गुणावगुण,
भिन्न भिन्न जे दर्शनात ! ।।३।।

वश करुनी त्या, मना जिंकणे,
सन्मार्गावर त्या चालविणें,
संकल्पाते हृदीं सोडणें,
सोडु नको रे ! अनियंत्रित ! ।।४।।

मन अश्वानें पळत राहणें,
मार्ग तुझा तूं तया दाविणें,
विकार खड्डे, सदा टाळणें,
ना तर जखमा ! क्लेश निश्चित ! ।।५।।

—लक्ष्मीतनया— (महाड)

# भ्रांति पडे मूढासी

धडपड ही मानवाची,
चालली निशिदिनीं सुख प्राप्तीची ।।धृ।।

लो त्याग स्वीकारि, स्वीकार करी,
नाना मार्गांचा, अवलंब करी,
जोड करि साधनांची ! चालली... ।।१।।

आश्चर्य वाटते, पळेच पुढती,
धावता धाप ही, कुंठीत मती,
सावट ये दुःखाची ! चालली... ।।२।।

ते दुरापास्त कां ? कारण नुमजे,
कुठें नि कशांत, वसते ? नलगे,
अज्ञान धारणेशी ! चालली... ।।३।।

वृत्ति व्यापारी नये कामाची,
सौख्याशीं, तद्रुप, नित्य कराची,
'चित्तलय' मार्ग यासी।... चालली ।।५।।

ज्ञानिया ऊमज, सर्वत्र विहरे,
अविकारी अभंग, अक्षय पसरे,
भ्रांति पडे मूढासी ! चालली... ।।४।।

—लक्ष्मीतनया- (महाड)

## हिंदी साहित्याकाशातील सूर्य :

# संत सूरदास

लेखक : **विनायक पाठक**

**भक्तिकालातील त्रिमूर्ति :**

भक्तीकाळातील संत साहित्यिकांच्या साहित्य विषयक गुणवत्तेच्या संदर्भात "सूर सूर तुलसी शशी ठडुगण केशवदास" हा दोहा प्रसिद्ध आहे. यात सूरदासाना हिंदी साहित्याकाशातील सूर्य संबोधून त्यांच्या काव्यगुणांचा गौरवच केलेला आढळतो. हिंदी साहित्याच्या भक्तिकालांत कबीर, सूरदास व तुलसीदास हे तीन संत कवि खूपच लोकप्रिय होते.

**चरित्र**/सूरदासांचा जन्म संवत १५३५ च्या वैशाख शुक्ल पंचमीला म्हणजे मंगळवारी झाला. सूर, सूरदास, सूरज, सुरजदास आणि सूरश्याम अशी पाच सहा नावे त्यांच्या पद्यात गोवलेली आढळतात. सूरदासांचे वडील रामचंद्र (रामदास) हे गोपाचल किंवा गोपाद्रि (आजच्या ग्वाल्हेरची जुनी नावे) येथे राहत व तेथेच सूरदासांचा जन्म झाला असावा. तथापि यांच्या जन्मस्थानासंबंधी बरेच प्रवाद आहेत. कुणी म्हणतात यांचा जन्म आग्रा मथुरा मार्गावर असणाऱ्या रूनकता नामक गावी झाला तर कुणी म्हणतात महाकवि सूरदासांचा जन्म परिक्षित राजाच्या मुलाने जनमेजयाने-ज्या ठिकाणी सर्पयज्ञ केला होता त्या दिल्लीपासून चार कोसावर असणाऱ्या सीही गावी झाला.

सूरदास जातीने सारस्वत ब्राह्मण होते. ते जन्मांध होते. "भक्तमाल" या ग्रंथात त्यांच्या कवित्वाबद्दल व जन्मांधतेबद्दलचे काही उल्लेख आढळतात.

"सूरदास सों बहुत निष्ठुरता, नैननि हूँ की हानी" आणि

"सूर की बिरीयाँ निष्ठुर होइ बैठे जन्म अंध करयौ" या ओळीतून त्यांनी आपल्या अंधत्वाच्या दुःखाला वाचा फोडलेली दिसून येते.

वयाच्या सहाव्या वर्षी त्यांनी घरगुती कलहावरुन गृहत्याग केला व ते चार कोसावर असणाऱ्या राका गावाच्या तलावाकाठी राहू लागले. जन्मजात प्रतिभा आणि भक्ति रसाला पोषक असलेली त्यांची मनःप्रवृत्ति यामुळे ते लोकाना निरनिराळी गाणी म्हणून दाखवू लागले. वयाच्या अठरा वर्षेपर्यंत "स्वतः रचावे, गाणे गावे,

स्वत: रमावे व इतरा रिझवावे" असा त्यांच्या नित्यक्रम चालू होता. या काळात इतकी भक्तिरसपूर्ण गाणीलिहिली की त्यांची अचूक मोजदाद आजवर करता आली नाही.

याच वास्तव्यात त्यांनी एका ब्राह्मण जमीनदाराला त्याच्या हरवलेल्या गायीचा अचूक पत्ता सांगून सर्वांना आश्चर्यचकित केले व त्या आनंदप्रित्यर्थ त्या जमीनदाराने सूरदासांना एका पिंपळाच्या झाडाखाली एक छोटीशी झोपडी बांधून दिली. त्यात राहून ते लोकाना **सगूण** (हरविलेल्या किंवा मांडलेल्या वस्तु विषयक प्रश्न) सांगू लागले. त्यामुळे वयाने लहान असूनही अनेक सेवकमंडळींचा गोतावळा तेथे नित्य जमू लागला, व पुढे त्या झोपडीचे रुपांतर एका टुमदार घरात झाले. त्या परिसरात नित्य नियमाने हरिनामाचा गजर घुमू लागला. घराला सजावट प्राप्त झाली. आणि वस्त्रप्रावणादि वैभवात ते राहू लागले.

वयाच्या १८ वर्षेपर्यंत हे वैभव त्यांनी उपभोगले पण एके दिवशी त्यांना वैराग्याचा असा झटका आला की त्यांनी आपले घर वैभव सर्व काही आपल्या आई-वडीलांच्या हाती सोपवून स्वत: एका वस्त्रानिशी व एका छडीनिशी मथुरेच्या विश्रामघाटावर आले पण तेही स्थान त्याच्या प्रवृत्तीला उपयुक्त न वाटून ते मथुरा व आग्रा यांच्या मध्यभागी असणाऱ्या, यमुना नदीच्या मध्यभागी असणाऱ्या यमुना नदीच्या गायघाटावर नदी किनारी राहू लागले.

**महाप्रभू वल्लभाचार्यांची भेट :**

या गायघाटावरच सूरदासांची व महाप्रभु वल्लभाचार्यांची गाठ पडली-येथेच त्यांनी सूरदासांना भगवद् यश-वर्णन करण्याचा उपदेश दिला. सूरदासांनी त्यांना गाऊन दाखविलेल्या "हौं हरि सब पतितन को नायक" व "प्रभु हौं सब पतितक को टीका" या दैन्यवृत्तीला अनुलक्षूनच महाप्रभुंनी त्यांना सांगीतले असावे–"सूर ह्वै कै ऐसे काहे की घिघियाते ?–कछु भागवत लीला बरनन करि।" (स्वत:कडे कमीपणा घेऊन उगीच ईश्वराकडे तोंड वेंगाडण्यापेक्षा भगवंताच्या लीलांची गौरव गीते व ईश्वरी वैभवाचे गोडवे गाऊन आपला जन्म कृतार्थ का करीत नाहीस ?)

**लोह बीघडले परीसचि झाले :**

या उपदेशामृताने सूरदासाच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. त्यांनी महाप्रभु वल्लभाचार्यांकडून मंत्र घेतला. त्यांनी पुष्टिसंप्रदायाची दीक्षा घेऊन नवविधा भक्ति आत्मसात केली या घटनेपासून सूरदास नित्य भक्तिच्या मानस सरोवरात धुंद होऊन नियमाने डुंबू लागले. त्यांना दिव्य दृष्टि प्राप्त झाली. व श्री कृष्ण लीलांचे प्रत्यक्ष दर्शन त्यांच्या मन: चक्षुसमोर नित्य होऊ लागले. याच संदर्भात भागवतातील १० व्या स्कंधातील 'सुबोधिनी' च्या मंगलाचरणाच्या पद्यात त्यांची उत्कट भक्तिधारा

उचंबळून वाहूं लागली व "चकई री चली चरणसरोवर, जहाँ न प्रेम वियोग" हे त्यांचे जीवन-ध्येय झाले.

अशा तऱ्हेने त्यांनी भागवतात वर्णिलेली दहाही स्कंधातील हरिकथा पद्य सूरदासांची कीर्तन पद्धती, काव्यप्रतिभा, संगीतातील स्वरज्ञान व आवाजातील गोडवा पाहूनच महाप्रभूंनी श्री नाथांच्या कीर्तनाचे काम सूरदासांकडे सोपविले. श्रीनाथ यांच्या भेटीने सूरदासांना जणू ईश्वरी साक्षात्कारच झाला.

**उद्धवाचा अवतार**

हिंदी संत आणि भक्त संप्रदाय सूरदासांना उद्धवाचा अवतारच मानतात उद्धव म्हणजे भगवान श्रीकृष्णाचे पट्टशिष्य, महामात्य, महाभृत्य व अतिशय आवडते शिष्य होते. तिन्ही त्रिकाळ भगवंतांच्या सहवासात राहण्याचे भाग्य उद्धवाला लाभले होते. उद्धवाची भगवत्‌चिंतनानी भारावलेली भक्ति व सूक्ष्म सहजोद्‌भव ज्ञान सूरदासाच्या काव्यातून अभिव्यक्त झालेले आढळतात.

**तत्वज्ञान :**

या भवसागराच्या मायाजाळातून सही सलामत सुटण्याचा एकमात्र उपाय म्हणजे हरिभक्ति ! अन्यथा हे जीवन भाररूपच आहे अशी सूरदासाची एकंदर धारणा होती. माणसाच्या हृदयात एका उपास्य दैवता खेरीज दुसऱ्या कुणालाही स्थान असता कामा नये व याच संदर्भात त्यांनी "प्रेम गली अति साँकरी वा में दो न समाये।" अशी मनाला समज दिली आहे.

सूरदासांनी या भवसागराला होळीच्या खेळाची उपमा दिली आहे. आपल्या सूर सारावलीमध्ये "खेलत यह विधि हरि होरी हो। होरी हो वेद विदित यह बात।" असे सांगून १६ व्या पदात या रुपकाचा विस्तार केलेला आढळतो.

**अकबर केला वेडा :**

असे म्हणतात, की एके दिवशी अकबराच्या दरबारात तानसेन सूरदासांचे एक भजन गात होता-त्याला ते भजन इतके आवडले की त्याने सूरदासांची स्वतः प्रत्यक्ष भेट घेतली. या भेटीत सूरदासांना अकबराविषयीची काही गीते रचावयास सुचविण्यात आले पण सूरदासांनी ते मान्य केले नाही उलट त्यालाच जणू उपदेश केला, "मना रे तूं करि माधव से प्रीति !" आणि अशा तऱ्हेने अकबराला आपल्या ईश्वरासक्त मनःस्थितीची सूचक शद्बात कल्पना दिली. व पुढे सांगीतले की आपल्या मनाच्या म्यानात फक्त एकच तळपती (ईश्वरी) तलवार राहू शकते. कारण "प्रेम गली अति साँकरी वा में दो न समाये।"

**तीन ग्रंथ–त्रैलोक्य संपदा :**

सूरदासांचे सूर-सारावली, साहित्य लहरी, व सूर-सागर हे तीन सर्वमान्य ग्रंथ असून त्यांची फुटकळ गेय रचनाही अमूप आहे.

हिंदीमध्ये संत साहित्य विषयक जे 'वार्ता-साहित्य' प्रसिद्ध आहे त्यातही सूरदासांनी श्रीकृष्ण लीलाविषयक व लक्षावधी पदे लिहिल्याचा उल्लेख आढळतो.

**सूरसारावली :**

प्रथमदर्शनी हा ग्रंथ म्हणजे 'सूर-सागर' या ग्रंथाची प्रस्तावनाच असावी असे वाटते पण वाचल्या नंतर लक्षात येते की हा 'सूरसागर' ची प्रस्तावना अथवा सारांश नसून, ११०७ पदांचा हा स्वतंत्र ग्रंथ आहे. 'पुरुषोत्तम सहस्र नाम' हा 'सारावलीचा' आधार आहे. यांत वल्लभ सांप्रदायाच्या नित्यपाठाची व वर्षोत्सवा निमित्य गायिलेल्या गीताचा समावेश आहे. यातच भगवंताच्या २४ अवतारांचे वर्णनही आलेले आहे. सूर सारावली सूरदासांची स्वतंत्र व सैद्धांतिक रचना आहे.

**साहित्य–लहरी :**

सूरदासांचा हा ग्रंथ ११८ गीतांचा आहे. यात नायिका भेद, अलंकार व सूरदासांच्या भक्तिभावनांचा परमोत्कर्ष दाखविणारी बरीच गीते आढळून येतात.

**सूर–सागर :**

सूरदासांचा हा काव्यग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. यातील बऱ्याच गीतांचे संकलन व संपादन त्यांच्या ह्यातीतच झाले असावे असे मानण्यात येते. हजारो गीतांचा विविध विषयावरील गोड पदांचा संग्रह म्हणून या ग्रंथाला "सूर-सागर" म्हटले असावे- यांत ज्ञान, वैराग्यातील सूक्ष्मातिसूक्ष्म भेद, भगवंतांचे विविध अवतार व त्यांची वैशिष्ठ्ये, उद्देश व कार्य, अनेक भावमधुर बाल-लीला, रासक्रीडा व श्रीकृष्णाची मुरली आदि विषयक गीतांचा हा जणु अथांग सागरच आहे.

**सूरदासांनी रंगविलेले राधा–कृष्ण :**

सूरदासांनी चित्रित केलेली राधा म्हणजे विद्यापति, जयदेव, चंडिदास व ब्रह्मवैवर्त यांनी चित्रित केलेल्या राधेचा सुंदर समन्वय आहे.

सूरदासांच्या भक्तीत शास्त्रसंमत भक्तीचे नवविधा प्रकार अभिव्यक्त झाले आहेत. प्रतिभासंपन्न गेय गीतातून जणु त्यांच्या भक्तिभावनेने भारलेल्या हृदयाचीच अभिव्यक्ति झाली आहे.

बाललीलांचे वर्णन करताना सूरदास लिहितात–एके दिवशी बाहेर खेळायला जाताना एका गल्लीत श्रीकृष्णाने नीलवस्त्रधारी राधेला पाहिले मात्र आणि "सूर

श्याम देखत ही रीझै नैन नैन मिली परी ठगोरी" ह्या ओळी सूरदासांच्या प्रतिभेनी शद्बांकित केल्या. त्याच प्रमाणे राधेचीहि श्रीकृष्णाला पाहून तीच अवस्था झाली, व ती रिकाम्याच रांजणात रवी घुसळू लागली. तशीच त्या श्रीकृष्णावरही राधेची अशी मोहिनी पडली की गाय समजून तो बैलाचेच दुध दौहायला बसला. प्रीतीच्या तल्लीनतेची परिसीमा दाखविताना सूरदासांच्या प्रतिभेने सूक्ष्मातिसूक्ष्म वर्णनातून अनेक गोड प्रसंग चित्रित केले. जणू ते सर्व प्रसंग त्यांनी प्रत्यक्ष डोळ्यानीच पाहिले !

**सूरदासांची सर्वस्पर्शी प्रतिभा :**

सूरदासांच्या प्रतिभेपुढे अलंकार शास्त्र जणू काही हात जोडून उभे राहिल्यागत दिसते. उपमा, रुपक, अन्योक्ति, लक्षण, व्यंजना यांचे एकापेक्षा एक सरस चमत्कार सूरदासांच्या गीतात आढळतात.

**भावमधुर जीवनाची भैरवी :**

अशा या भक्त गायक कवीला एके दिवशी नित्याप्रमाणे कीर्तन करीत असताना आपल्या मृत्यूची चाहूल लागली. त्यांनी तडक पारसौलीची वाट धरली व तेथील आपल्या निवास स्थानी श्रीनाथांच्या ध्वजेकडें (पताका) तोंड करुन पहुडले. तेव्हा स्वामी गोसाई, कुंभनदास, चतुर्भुजदास आदि संत मंडळी त्यांचेजवळ गेली. स्वामींचा आवाज कानी पडताच सूरदास शुद्धीवर आले व सद्गदित झाले व त्याही परिस्थितीत "देखो–देखो जूं हरि कौ एक सुभाई। अति गंभीर उदार उदधि हरि जान शिरोमणि साई।।" अंतीम भेटीस आलेल्या भक्त मंडळीस त्या उद्गारातील मर्म लक्षात आले की सूरदास गुरु आणि श्रीकृष्ण यात भेदाभेद मानीत नाहीत. गुरु आणि भगवत म्हणजे एकाच नाण्याच्या जणू दोन बाजू आहेत हेच त्यांना सांगायचे होते. सूरदासांनी सर्वांकडे कृतज्ञतेने पाहिले. त्यांच्या चित्तवृत्तींबद्दल केलेल्या पृच्छेस गीतातच सूरदासांनी उत्तर दिले, "खंजन नैन सुरँग रस माते" व वयाच्या ७२ व्या वर्षी आपली जीवन यात्रा समाप्त केली. ब्रजभाषेच्या या काव्यसम्राटाने आळविलेली भैरवी जरी संपली असली तरी स्वर अद्यापही समस्त ब्रजभूमींत व हिंदी साहित्यात अक्षय गुंजन करीत आहेत.

# रामगीतांजली

अशोकवनात सीता हनुमंताजवळ बोलताना तो तिला स्वतःच रामाकडे नेण्यास तयार होतो तेव्हा ती त्याला म्हणते--

लागली जरी मज उत्कंठा भेटाया
रघुनाथ येऊं दे स्वयें मला रे न्याया ! ।।ध्रु.।।

मी परपुरुषाचा स्पर्श कसा रे साहूं ?
कां विरह पतीचा निमित्त करुनी येऊं ?
लागेल धरावा धीर जरी थांबाया ।।१।।

मी परवश झालें रावण पापी शिवला
हा डाग मज अटळ असे रे ! जडला;
परि पराक्रमानें उचित तया क्षाळाया ।।२।।

एकटा सागरावरुनीं तूं वेगानें
मज घेउन जातां पडेन मी भीतीनें;
येतील अचानक राक्षस तुज अडवाया ।।३।।

मज पृष्ठीं वाहुन गुंतुनिया पडलेला
जाशील कसा तूं पुढती युद्धीं गढला ?
अबला मी फिरुनी होइन बंदी वाया ।।४।।

ही अशी एकटी लपुनी कां मी येऊं ?
कां लंकापतिला भिऊनी पळुनी जाऊं ?
शोभणार नाहीं असलें राघव-राया ।।५।।

रावणास वधुनी जरी जिंकुनी लंका,
वाजवीत जातिल जगतीं अपुला डंका !
निःशंक होउनी उचित कीर्ति मिळवाया ।।६।।

मीं तुझा जाणतें भाव शुद्ध सेवेचा
परि सूड घ्यावया हवाच अन्यायाचा
अद्वितीय यश तें अमर थांबले गाया ।।७।।

—दिवाकर घैसास-डोंबिवली (पूर्व)

# नित्य मी जिवंत

ले. –चिपळूणकर गुरुजी.
९, सिद्धारूढ बिल्डिंग ७५, भवानीशंकर रोड, दादर मुं. नं. २८

श्री साईबाबांनी आपल्या सर्व भक्तांस निःसंदिग्ध ग्वाही दिली आहे की 'नित्य मी जिवंत– जाण हेचि सत्य । नित्य त्या प्रचीत अनुभवें'. बाबा आजपर्यंत या ब्रीदानेच आपल्या सर्व भक्तांच्या प्रत्येक कामी स्वतः उभे राहून धीर देऊन कार्यसिद्धी केल्याची असंख्य उदाहरणे आहेत. साईभक्तांच्या अनुभवात भर म्हणून माझे काही अनुभव खाली देत आहे–

गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात माझ्या मुलीचे लग्न व्हावयाचे होते. विवाहापूर्वी दोनच दिवस अगोदर युद्धामुळे प्रकाशबंदी सर्वत्र जारी झाली. अर्थातच पाठोपाठ सर्व बंधने आली. एकंदर सोहळा कसा काय पार पडतो याविषयी मी सचिंत झालो. माझ्या नित्य परिपाठाप्रमाणे बाबांना सुपारी ठेवून गाऱ्हाणे घातले आणि कार्यासाठी पुढे पाऊल टाकले. आश्चर्याची गोष्ट अशी की त्याच रात्री मला कोणा एका अज्ञात आवाजाकडून श्री भगवत् गीतेचा नववा अध्याय म्हणण्याचा आदेश आला. त्या वेळापासून मी तो अध्याय सारखा माझ्या जिभेवर ठेवला, बाबांचे व माझ्या गुरूचे स्मरण केले व सर्व भार त्यांचेवर टाकला. परमेश्वर पाठीशी असल्यावर काय होणार नाही ? माझे घरातील मंगल कार्य यथासांग निर्विघ्नपणे पार पडले.

यावर्षी माझ्या मुलाची एस्. एस्. सी. ची परीक्षा होती. मी माझ्या मुलाची परीक्षा सुरु झाल्यापासून बाबांच्या देव्हाऱ्यात दिवा सतत तेवत ठेवला होता तो परीक्षा पूर्ण होईपर्यंत ठेवला होता. माझ्या मुलाला नेमका अभ्यास केल्याप्रमाणे उत्तरपत्रिका लिहीता आल्या व मुलगा परीक्षेत उत्तम तऱ्हेने यशस्वी झाला.

कोण्या एका वेळी मी काही आर्थिक अडचणींत अकस्मातपणे येणार होतो. मी सर्व परिस्थिती बाबांना प्रार्थनेचे वेळी निवेदन केली, आणि त्यांच्या कृपाप्रसादाने पुढील आठ ते दहा दिवस पर्यंत माझ्याकडे पत्रिका दाखविण्यास वगैरे कामासाठी मंडळी सतत येऊन माझी अडचण निवारण झाली.

गेल्या वैशाख महिन्यात मला अलीबाग येथे प्रवचनास जावयाचे होते. ते माझ्या गुरुंचे जन्मगांव. सध्या तेथे संपूर्ण वस्ती संमिश्र आहे. अशा संमिश्र वस्तीत जाऊन जाहीरपणे बोलण्याचा तो जवळ जवळ पहिलाच प्रसंग होता म्हटले तरी चालेल. मला गाव फारच आवडले. परिसर अत्यंत सुंदर आहे. एकंदर समाज पाहता मनात किंचित्

विकल्प निर्माण झाला. परंतु एके ठिकाणी बाबांची प्रतिमा पाहून मला पुष्कळ धीर आला. प्रत्यक्ष प्रवचनाचे वेळी मी बाबांच्या मूर्तीचे ध्यान केले आणि प्रारंभ केला. त्यावेळी सर्व कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत बाबा माझ्यासमोरच उपस्थित होऊन जणू काही ऐकत आहेत असा मला सारखा भास होत होता. मी नेहमी भक्तांच्या जवळ असतो" असे बाबांचे उद्‌गार आहेत याची ही साक्षच आहे.

गतवर्षी मला माझ्या गुरुदेवांच्या एका स्तोत्रावर स्पष्टीकरण लिहावयाचे होते. त्यावेळीही असाच अनुभव आला. लेखनास आरंभ करण्यापूर्वी मी माझ्या गुरुदेवांचे व बाबांचे एकाग्रतेने ध्यान करीत असे. अनुभव असा आला की, श्लोक लिहावयास घेतल्यावर कोणत्यातरी वातावरणातून विवेचनाचे शब्द ऐकू यावेत, व आपण लिहावे असा प्रकार होत होता. याप्रसंगी बाबा व माझे गुरुदेव हेही एकच आहेत हे माझ्या प्रत्ययास आले.

याप्रमाणे बाबांच्या अस्तित्वाचे असंख्य अनुभव आहेत, व आजही त्यांचे असंख्य भक्त असे अनुभव घेत आहेत अशी ज्याची श्रद्धा तसे त्याला अनुभव येत राहतात व येत राहतील. आज माझी मुलेही बाबांची उदी कपाळी लावून त्यांना वंदन करून आपल्या कार्यसिद्धीचे अनुभव घेत आहेत.


॥ श्रीसाईप्रसन्न ॥

## ॥ साईकृपा ॥

### सर्व प्रकारच्या जुनाट रोगांवर खात्रीपूर्वक इलाज !

जुनाट संधिवात, उसण, शूळ, गॅस्ट्रिक आजार, दमा, ब्लडप्रेशर, अल्सर, स्त्रियांचे आजार, मधुमेह, व सर्व प्रकारचे लहान मुलांचे आजार, यांवर खात्रीपूर्वक इलाज केला जाईल. रुग्णांनी आपले वय, रोगाचे वर्णन, व किती वर्षे रोग आहे हें लिहिल्यास पोस्ट पार्सलने औषधे पाठविली जातील. रोगाप्रमाणे औषधाचे कोर्स करून रोग बरा केला जातो. घेण्यास सुलभ व गुणकारी औषधयोजना. अनुभव हीच खात्री. सर्वप्रकारच्या रुग्णांनी अवश्य फायदा घ्यावा.

पोस्टेजसह कोर्स किंमत एक महिना रु. ४०–३०, दोन महिने रु. ७५–६०, तीन महिने रु. १००–९०, मनीऑर्डर किंवा चेक स्वीकारले जातात. औषधाबरोबर तीं घेण्याची रीत व माहिती कळविली जाते. लिहा / भेटा :–संचालक, साई ( सेवाश्रम ) दवाखाना, साईसदन, कॅनरा बँकेमागें, शिवाजीउद्यान, शहापूर, बेळगांव.

# श्री गोंदवलेकर महाराज-व्यक्तिदर्शन

## ( चालू लेखमाला )

-श्री. पु. मु. अत्रे

**श्रीमहाराज आणि लोकमान्य टिळक :**

पुण्यामध्ये श्रीमहाराजांचे पुष्कळ शिष्य होते, म्हणून ते पुण्यास बरेच वेळा येत असत. लोकमान्य टिळकांचे आणि त्यांचे तर विशेष सख्य होते. श्रीमहाराज आले म्हणजे लोकमान्य श्रीफल व रुपया अर्पण करून दर्शन घेत, आणि मग त्यांचा संवाद एकांतात होत असे. लोकमान्यांनी त्यांना एकदा म्हटले, "महाराज, आपण राजकारणात पडावे. माझी बालंबाल खात्री आहे की आपल्या हातून फार मोठे राष्ट्रकार्य होईल." श्रीमहाराजांनी उत्तर दिले, "प्रारब्धाचा सिद्धांत क्षणभर बाजूला ठेवला तरी अध्यात्म राजकारणाइतक्याच योग्यतेचे आहे असे आपणच मान्य करतां. माझे जीवन मी अध्यात्म्याला वाहिले आहे. म्हणून आपण आपले काम करावे, मी माझे करावे."

**सगळ्यांचा आत्मा सारखाच :**

दुपारी श्रीमहाराज विश्रांती घेत होते तेवढ्यात एक जण सांगत आला की, एक गाढव मंदिरासमोर येऊन पडले आहे. श्रीमहाराज बाहेर येऊन त्याच्या अंगावरून प्रेमाने हात फिरवू लागले. त्याची वेळ भरली आहे असे जाणून त्यांनी गंगा आणण्यास सांगितली व त्याला पाजली. लोकांना नामाचा गजर करण्यास सांगितले. गंगा तोंडात पडल्यावर श्रीमहाराजांकडे एकदा पाहून गाढवाने प्राण सोडला. ते म्हणाले, "रामाने त्याचे कल्याण केले. त्याला चांगला जन्म येईल. अंतकाळी अशी मदत आली तर जीवाला चांगली गति मिळते, गाढव अपवाद नाही. सगळ्यांचा आत्मा सारखाच आहे!"

**राम करील तर काय न होईल ?:**

खातवळ्याच्या पाटीलबुवांची श्रीमहाराजांवर बळकट निष्ठा होती. तीन बायका करूनही त्यांना मूल झाले नव्हते. आता त्यांचे वय ६५ वर्षांचे झाले, म्हणून त्यांनी पुतण्याला दत्तक घेण्याचे ठरवले व उभयतांनी त्याला श्रीमहाराजांचे पायावर घालण्यास आणले. नमस्कार करताना त्यांनी विचारले, "पाटील हा मुलगा कोण ?" पाटील म्हणाले, "हा माझा पुतण्या. मी याला दत्तक घेण्याचे ठरविले आहे. त्याला आपला आशीर्वाद असावा." श्रीमहाराज आश्चर्याने बोलले, "दत्तक का म्हणून ?

पाटीलबुवा तुम्ही निराश होण्याचे कारण नाही. रामराय करील तर काय न होईल ?' त्यांनी नारळ आणण्यास सांगितले व त्याला हळद-कुंकू लावून रामाच्या पायावर ठेवा असे म्हटलें. तो नारळ श्रीमहाराजांनी पाटलिणीच्या ओटीत घातला व म्हटले, "तुम्हाला मुलगा होईल त्याच्या बारशाला हा नारळ प्रसाद म्हणून वाटा." एक वर्षाने पाटलांना मुलगा झाला. बारशाच्या दिवसापर्यंत उत्तम राहिलेल्या नारळाचा प्रसाद सर्वांना दिल्यावर दुपारी त्याचे बारशाचें जेवण होताच त्यांनी घोड्याला खोगीर आवळायला सांगितले व ओल्या हातानेंच गोंदवले गांठले. दुसऱ्या दिवशीच्या श्रीसत्य-नारायणाचे श्रीमहाराजांना आमंत्रण देऊन त्याच पावली पूजेच्या तयारी साठी ते परत आले. दुपारी बाराला श्रीमहाराज शंभर मंडळीसह आले. पाटलांना समजले की स्वयं-पाक फक्त पंचवीस पानांचा केला आहे. पण आयत्या वेळी पुरणपोळ्या इत्यादि होणे शक्य नव्हते म्हणून नुसता भात टाकण्यास पाटीलबुवानी सांगितले. श्रीमहाराजांनीं हें ऐकल्यावर ते म्हणाले, "पाटील स्वयंपाकावर रामाचे तीर्थ शिंपडा आणि आहे तेच वाढा. राम सर्वांना पुरवील." खरोखरच अन्न सर्वांना पुरले व शेवटीं पंचवीस पानांचा स्वयंपाक शिल्लक राहिला. भोजनानंतर पाटलांनीं मुलाला महाराजांच्या पायांवर घातला. श्रीमहाराजांनी मुलाला प्रेमाने कुरवाळले व म्हटले, पाटील रामाने तुम्हांला फार चांगला बाळ दिला आहे. हा भगवंताचा भक्त होईल व आपल्या कुळाचे नांव वाढवील." मुलगा तसाच निपजला हे अद्याप तेथील लोक सांगतात.

**माझी पोरं आज गावाला जात आहेत, मला थोडे पाणी द्या :**

एकदा श्रीमहाराजाना भेटण्यास पुण्याचे चार तरुण गोंदवल्यास आले. तिथे प्लेगामुळें बहुतेक लोक बाहेरगावी गेले होते. पण महाराजांनी त्या तरुणांना राहवून घेतलें. महाराजांकडे फारसे पाणी सांठविलेले नव्हतें व नदी तर लांब होती. म्हणून ते रामाच्या पायां पडले व एक लहानसा हंडा घेऊन घरोघरी पाणी मागूं लागले. प्रत्येक घरीं ते म्हणायचे, "आज माझी पोरं गांवाला जात आहेत, तर मला थोडे पाणी द्या. असे हंडाभर पाणी आणून त्यांनीं तापवलें व स्वतः स्नान करून पिठले भात केला. तोपर्यंत हे चौघेजण प्रातर्विधि करून आले. तेव्हां महाराजांनी त्याच हाड्यांतून पाणी काढण्यास सुरुवात केलीं व प्रत्येकाला यथेच्छ पाण्यानें स्नान घातले. एवढ्याशा त्या-हंड्यांतून महाराजांनी इतकें पाणी काढलें तरी कसे यांचेंच त्या तरुणांना आश्चर्य वाटलें. आंघोळी नंतर महाराजांनी त्यांना गंध लावले व पिठलें भात वाढला. मंडळी भरपूर जेवली व नमस्कार करून निघाली. श्रीमहाराज त्यांना निरोप देण्यास वेशीपर्यंत बरोबर आले. चाळीस वर्षानंतर त्यांच्यापैकी एकजण हृदय भरून साश्रु नयनांनी सांगत होता कीं, "ज्या श्रीमहाराजांपुढे अक्षरशः शेकडो लोक हात जोडून सेवेला तिष्ठत रहायचे त्यांनी दारोदार जाऊन हंडाभर पाणी आणून तापवले, आम्हांला लहान मुलांप्रमाणे आंघोळ घातली, गंध लावले, गप्पा मारीत अमृताहून गोड असा पिठले-भात यथेच्छ जेवू घातला व वेशीपर्यंत येऊन निरोप दिला—असा वात्सल्याचा अनुभव

घेऊन कोणाचे मस्तक त्या महापुरुषाच्या चरणांवर नम्र होणार नाही बरे! त्यांना स्वतःचे मोठेपण जसे माहीतच नव्हते!"

**भगवंताचे अखंड अनुसंधान हेच संताचे चरित्र :**

जंगल खात्यातील एक सेवा-निवृत्त गृहस्थ श्रीमहाराजांकडे रहावयास आले. त्यांना भाऊसाहेब 'फॉरेस्ट' म्हणत. लेखन-वाचनाचा छंद असल्यामुळे त्यांनी श्रीमहाराजांचे चरित्र लिहावयास घेतले. चरित्र आकार घेऊ लागल्यावर एकदां ते श्रीमहाराजांनी पहावयास मागितले व वरवर चाळून फाडून टाकले. भाऊसाहेब साश्चर्य उद्‌गारले, "महाराज, हे काय?" तेव्हां श्रीमहाराज बोलले, "भाऊसाहेब, संताचा चरित्रकार जन्मावा लागतो. माझे चरित्र त्यालाच समजेल कीं जो नामांत स्वतःला विसरून जगत आहे. सत्पुरुषाच्या अंतरंगाचा ठसा ज्याच्या मनावर पूर्णपणे उमटला आहे त्यालाच त्याचे चरित्र शद्बांत वर्णन करतां येईल."

**विकारांना आपण वापरावें, त्यांनी आपल्याला वापरू नये :**

वारकरी पंथाचे श्री वामनराव श्रीमहाराजांच्या सेवेस राहिले होते. ते महाराजांचे कपडे संभाळीत व त्यांच्याकडून ज्ञानेश्वरी समजून घेत म्हणून 'वामनराव ज्ञानेश्वरी' हें त्यांचें नाव पडले. एकदा एका भाऊबंदाशी जमिनीवरून श्रीमहाराजांचा तंटा चालू असता ते संतापून लालबुंद झाले. नेहमींच्या या भाडणांत श्रीमहाराजांनीं क्रोधाच्या आहारीं जावें हें वामनरावांना खटकलें व त्याबद्दल ते श्रीमहाराजांना भांडणामध्येंच विचारू-लागले. त्यांच्याकडे वळून 'हें नाटक संपलें कीं सांगतोच' असे त्यांच्या कानात सांगताना श्रीमहाराज कमालीचे शांत झालेले वामनरावांनी पाहिले. क्षणापूर्वी रागाने लाल झालेला मनुष्य दुसऱ्याच क्षणात इतका शांत कसा होऊ शकतो याचे वामनरावांना महान् आश्चर्य वाटलें. पण भांडण पुन्हा चालू होताच श्रीमहाराज पहिल्यासारखे आपले लालेलाल! याने तर वामनरावांची मति गुंगच झाली. जरा वेळाने भांडण संपूर्ण श्रीमहाराजांनी त्या भाऊबंदाला तीर्थ-प्रसाद दिला व वारंवार येण्याचा निरोप देताना तर वामनरावांनी श्रीमहाराजांना अगदी विनीत व आर्जवी झालेले पाहिले. तेव्हां वामनराव अगदी उमजून बोलले, "महाराज माझी शंका फिटली." महाराज म्हणाले, "वामनराव, मनुष्यानें व्यवहारात विकारांची मदत घेतल्याशिवाय त्याला वावरताच येणार नाही, पण विकारांनी आपल्याला वापरू नये, तर विकारांना आपण वापरावे."

# वस्तुमात्रामध्ये नारायण निश्चितपणे अनुभवावा ?

लेखक—डॉ. के. भ. गव्हाणकर, कुर्ला

हा वरील प्रश्न जनकराजाने नवऋषभांना केला. त्याचे उत्तर पिप्पलायनांनी जे दिले ते श्रीनाथरायांनी एकनाथी भागवतात अध्याय ३ रा ओवी ६३० ते ६४६ अधिक स्पष्टतेने मांडले आहे.

विश्वाकडून श्रीहरीला ओळखण्याचा पुष्कळजण प्रयत्न करतात. त्याचे वर्णनही "ज्याच्यामुळे सर्व काही उत्पन्न होते, ज्याच्या योगानें जे जे दिसते ते टिकले आहे आणि ज्याच्यामुळे सर्व काही विलयाला जाते, असा तिन्ही जग ताचा हेतु-कारण तो श्री नारायण होय !"

सर्व जगताची चालकस्थिती असे वर्णन केले खरे पण त्यायोगे ते रूप कोणते त्याचा अनुभव आम्हाला काय ? आमच्या जीवितात त्याची खूण काय ? हे पटले नाही तर कितीही वर्णन केले तरी ते आकाशांतले शद्बच होतात.

फूल म्हटले तर त्याचा अनुभव नाकाला, केळें म्हटलें तर त्याच्या अनुभव जिभेला. पण सर्व जगाचा आद्यहेतु म्हटल्यानें जीवामध्ये त्याचा काय अनुभव ?

त्याचे वर्णन किंवा जीवामध्ये त्या स्वरूपाची असलेली खूण श्रीनाथराय वर्णन करीत आहेत:–

'असा जो तिन्ही जगांचा मुख्य हेतु, पण सत्ता असून हेतुपूर्वक कोणतीही गोष्ट न करणारा म्हणजे सूर्याचा प्रकाश हा जसा स्वभाव त्याप्रमाणे स्वभावत: ज्याच्या अस्तित्वाचेंच (दिसते व असते) रूप आहे. तो सच्चिदानंदरूपाने जीवमानामध्यें अनुभवात आहे.

सच्चिदानंद–सत्–चित्–आनंद. प्रत्येक जीवाचा जीवंतपणा म्हणजे सत् अस्तित्व. चित् म्हणजे चैतन्य स्फूर्तिरूप व आनंद प्रियरूप याने भरलेले आहे. सत् म्हणजे जीवाचा जीवंतपणा, ज्यावर टिकला आहे ते अस्तित्व-जीव जगतो हे जगण्याचे अस्तित्व दाखविणारी जी सत्ता ते प्रभूचे सत् स्वरूप. चित् म्हणजे चैतन्यरूप—सतत कल्पना येतात आनंद देतात थोडा वेळ स्थिर होतात व पुन: जातात. कल्पनेच्या, आवडीच्या स्फूर्तीने देहाचे चलन वलन होते व थांबते. ही चैतन्याची जी सतत स्फूर्तिमान हालचाल ते प्रभूचें चित् किंवा चैतन्यरूप होय. आणि प्रत्येक कल्पनेबरोबर अगर कल्पना नसतांहि स्वत:च्या जगण्याचे अस्तित्व जे बरे प्रिय वाटते, स्वत:च्या असण्याची जी अत्यंत प्रीति, यामुळे त्याला सुख हवे असे वाटते व त्यासाठी जग, देव जवळ करितो किंवा टाकून देतो ती प्रियसत्ता हे प्रभूचे आनंदरूप होय. जीवाची आपआपल्याविषयी जी प्रियता 'जी प्रियाची परम सीमा' ते प्रभूचे आनंद रूप.

**'प्रियाची परम सीमा । तो माउली भेटे आत्मा ॥** ज्ञा.

**तूं माउलीहूनि मायाळ । चंद्राहूनि शीतळ ॥**

**पाणियाहूनि पातळ । कल्होळ प्रेमाचा ॥ तुका**

प्रेम म्हणजे गाय ज्या अंगीच्या मूळ कळीने बाळासाठी अंतरी हंबरव असते. ज्या प्रीतीने प्रत्येकाला आपण असावे जगावे सुखी रहावे असे वाटते ती स्वप्रियतेची स्वसंरक्षणाची मूल ज्योति ते प्रेम होय. प्रेम म्हणजे जिव्हाळा.

आपल्या जीविताचे मूळ, जेथे कल्पनाही अद्याप उगवल्या नाहींत, ज्ञान समजुतीवर आलेले नाहीं, तेथे एक गोडीचा स्पंद उमटत आहे, तो केवळ विरहरूप आहे. आपण असण्याची प्रीती तेथेच नसण्याची अव्यक्तावस्था असे असणे नसणे रूप आत्यंतिक चंचलतेने स्फुरत आहे. आपण जागे असू की झोपलेले असू आपल्या जीविताची प्रियता अखंड जीवितासह लोटलेली आहे. जे जीवित आहे तेच प्रेम अगर प्रियता आहे.

प्रेमसत्तेची प्रतीति-अनुभव हेच जीवित प्रेम प्रतीतीस्तव स्फुरत आहे. ते स्फुरणे म्हणजे प्रतीती येणे. स्फुरणे-व्यक्त होणे ही प्रतीती की लागलीच आपल्यात विरणे-अव्यक्त होणे हे आनंद-ऐक्यरूप. दिसणे कीं न दिसणे असणे की नअसणे असे सतत त्या रूपाचे चालू आहे. ते असणे, नसणे दिसणे मिळणे, हे दोन्ही रूप मिळून एकच विरहरूप.

**'जो प्रियुचि प्राणेश्वरी ।**

**उलथे आवडेचेनि सरोभरी**

**चारुस्थळी एका हारी । एकांगांचा ।**

**आवडेचेनि वेगें । एक एकातें गिळताहे अंगें ।**

**की द्वैताचेनि पांगे । उगालिते अहाती ॥**

प्रेम सत्ता हा प्रियु-प्रेमप्रभु -त्याची प्रतीती प्राणेश्वरी-प्रियता त्या दोघांचे अंग एकच त्यांचे उगाळणे आणि गिळणे सतत चालू आहे.

हे असणे नसणे किती चंचलतेने स्फुरत असते ? त्याला काळाचे अगर वेगाचे भान नाही.

भोवरा आत्यंतिक चंचलतेने स्फुरतो-(फिरतो) आणि त्यामुळेच तो स्थिर दिसतो. त्याहून अनंतत्वाने हे चंचल स्फूर्तियित्व विहरत असते, आणि त्यात जीवित प्रियता व्यक्त असल्याची प्रचीती येते. पाण्यातच पाण्याचे उमाळे अनिवार यावेत, त्याने पाणीच पाणी सर्वत्र तरंगावे, त्याचप्रमाणे, विश्वाचे तरंग त्या प्रियप्रेम सत्तेवर व्यक्त होतात.

कळवळा, विरह, ही त्या प्रेमाची प्रथमच प्रतीती होय. आपण स्वतः किती सुखी असावे हे गणित नाहीं, जेवढे असाल तेवढे अपुरेच ही त्या विरहाची बाह्य खूण आहे. विरह ही आत्यंतिक दुःखाची व सुखाची अवस्था आहे. हे दुःख वस्तू गेल्याचे अगर नसल्याचे नव्हे तर स्वतःला स्वतः म्हणजे स्वप्रियता जेवढी भेटावी तेवढी भेटत नाही ही तळमळ हे दुःख, सुख सोसत नाहीं, सुख पुरत नाहीं हे दुःख त्या प्रेमाची जाली आहे.

मातृप्रेम, पितृप्रेम, पुत्रप्रेम सर्व प्रेमकर्म त्या जीवित प्रियतेपुढे फिक्के आहेत.

प्रेम हे अमर्याद आहे. ते जन्ममरण जाणीत नाही, ते स्वतः कधीच अपुरे, अजाण मानीत नाही. सर्व अवस्थात ते असू शकते.

**(१) जन्म जाऊ दे पण अन्न जाऊ नये.**

**(२) अन्न जाऊ दे पण जगू दे.**

या दोन्ही ठिकाणी स्वप्रियता हीच श्रेष्ठ आहे. पुत्रासाठी जीव देणारी मातेची प्रियता आणि पुत्र गेल्यावरही झोप आणणारी व अन्नरुचि जीवित राखणारी ही पण प्रियताच.

बाळ अजाण आहे तोवर माता जशी प्रेम करते तसे ते बाळ मोठे झाल्यावर त्या कळकळीने करू शकत नाही. बाळाच्यासाठी काही काळ आलेले दूध आटते पण दूध आणणारी व तिला जगवणारी प्रियता केव्हाच आटू शकत नाही.

शेवटी प्रत्येकाचे आपापल्यावरील जे अनिवार प्रेम हेच त्या प्रेमाचे अखेरचे लक्षण सांगता येईल.

मातेच्या उदराबाहेर आल्यानंतरच प्रेम व्यक्त होते असे नाही तर मातेच्या उदरात गर्भाच्या पातळ नितळ प्रिय नाजूक आवरणात गर्भ वाढणे तेथेही प्रियताच जागी असते.

पित्याच्या स्व-प्रियतेत जे आवडीचे स्फुरण व त्यात रेताचा जन्म ती मूळ आवडी! येथून प्रियतेचा जन्म आहे. पित्याचा रेत त्या प्रियतेच्या जलांश, तेथून जीवावस्था, तेथेच प्रथम त्या प्रियतेचे सगुण स्फुरण होय. प्रेम ही विश्वाची जननी.

**प्रेम नये बोलतां प्रेम नये दावितां।**
**अनुभव चित्ता चित्त जाणे ।।**

आपणांस कोणावर प्रेम करता येणार नाही. आपले आपणावर सहज नकळत केल्याशिवाय प्रेम सारखे वहात आहे. तसे आपणांस दुसऱ्यावर करता येईल काय? आपण आपल्यावर प्रेम करता की ते होत आहे!

आपले प्रेम ज्यात गमावेल असली क्रिया चुकूनही जिवाकडून घडत नाही. फार काय, रडतो तो सुद्धा प्रेमाकरताच, त्या रडण्यात सुख वाटत नसेल, प्रेम भोगता येत नसेल तर मनुष्य रडणार नाही.

एकदा का प्रेमसरितेचा झरा हाती लागला, जिव्हाळ्यात परतत्त्वाशी ऐक्य झाले की तो प्रेमसागर श्रीसाईनाथ जीवाच्या अवती भोवती सतत क्रीडा करून असतो.

द्रौपदी मातेचा सर्व देह श्रीकृष्णप्रेमात बुडून गेला होता. एका निरागस प्रेमाने माऊलीस इवल्याश्या द्रौपदी मातेच्या जीवाने अंकित केले होते. हर एक अडीनडीच्या प्रसंगी जरूर ते सारे पुरविले, पुरविले नाही तर माउली ती अंगानी बनली. वस्त्रहरण प्रसंगी.

**द्रौपदीच्या हाती वस्त्र घडी।**
**नेसतां दिसेल उघडी।**
**या लागीं लवड सवडी।**
**नेसली लुगडी स्वयं झाला ।।**

अशी प्रेमप्रतिती ज्यांच्या ठिकाणी बाणली त्याचे जीवन तेच प्रेमाचे अस्तित्व. आपले आपल्यावरचे प्रेम सहज व सतत असते. तेच श्रीहरीचे स्वरूप होय.

*—*—*—*

# गुरु नानक गीतांजलि

यज्ञोपवीत समारंभ में पणाम यह हुआ कि सब लोग अपने जनेऊ उतारकर घर चल दिये।

बेचारे बाप की चिन्ता बढने लगी। एकलौता लडका-व्यवहारिक रीतिरिवाज को छोडकर दूसरे मार्गपर जाने देख, बाबाको घोर निराशा हुई। बाबा को जंगल का सहवास अच्छा लगता था। बाबा के पास गौएं चराने का काम सोपा गया। पिता की आज्ञा का पालन करने में बाबा कोई कमी नहीं रखते थे। परंतु ईश्वर की आज्ञा और दुखी मानवी जीवों के रोने का स्वर सुनकर वे बहुत अस्वस्थ रहते थे। सारे जग को ईश्वर नाम चारा देकर, दीन दुर्बलों के पालन हेतु अवतारी जगद्गुरु दिन भर गौएं चराने जंगल जाने लगे।

एक बार गाँव का मालिक रायबुलार खेतों की जिगरानी करते हुये जंगल से जा रहे थे। अचानक उसने एक विलक्षण दृश्य देखा। एक वृक्ष के नीचे बाबा सोये थे। उनके मुख पर सूर्य किरणें पड रही थी। उनकिरणों से मुख का रक्षण एक नागराज अपने फन फैलाये कर रहा था। फन की छाया में बाबा प्रभु चितन में लीन थे। मालिक के आश्चर्य का ठिकाना न रहा।

निवेदक—

निद्रित देख, गुरु पर करते नागराज छाया
यह प्रभुकी है सारी माया ॥ टेक ॥

चरवाहे का कार्य निभाते
धेनु चराने जंगल जाते
प्रभुचिंतन में समय बिताते
दीनों का दुख हरने को अब हुई अवतरित काया ॥ १ ॥

निसर्ग सुन्दर शोभा अनुपम
धरा स्वर्ग से वगती उत्तम
विश्वव्यापी है पुरुषोत्तम
ब्रह्मानंद में रमते नानक भूलकर सारी माया ॥ २ ॥

उधर खेत में गएं घुसतीं
ध्वस्त तथा फसलों को करती।
कोलाहल ध्वनि कानों पडती
ध्यान भंग हो, बोले नानक-'धन्य धन्य प्रभुराया' ॥ ३ ॥

ऐसे फसलों की नुकसानी
सहन न होगी मान की हानि
रही दुखोंकी अभी कहानी।
विलाप करते कालू मेहता, जग में है क्या पाया ॥ ४ ॥

पूछताछ फिर लगी यों होने
सैनिक दौडे खेत देखने
वापस आकर लगे वे कहते
'हरे भरे हैं खेत'' जानकर मालिक यों शरमाया ॥ ५ ॥

देख अलौकिक प्रभुकी शक्ति
मन में सबके उपजी भक्ति
नत मस्तक हर व्यक्ति व्यक्ति
लगी फैलने कीर्ति गुरु की, जनजीवन हरषाया ॥ ६ ॥

–राधाकृष्ण गुप्ता ''चेतन''
डोम्बिवली (पूर्व)

---


## श्रीसाईभक्तांची श्रद्धास्थाने

श्रीसाईभक्तांची श्रद्धास्थाने ही नवीन लेखमाला श्रीसाईलीला एप्रिल १९७४ च्या वर्षारंभ अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. श्रीबाबांच्या असंख्य भक्तांना ही नाविन्यपूर्ण सचित्र लेखमाला निश्चित वाचनीय व संग्राह्य वाटेल. लेखक—सदानंद चेंदवणकर

# शिरडी-वृत्त

## डिसेंबर १९७३

या महिन्यात भक्तांची गर्दी जास्त प्रमाणात होती. कारण वर्षअखेर सुट्या व रजा होत्या. शाळांच्या सहली कृषिविद्यालय सहली, नाताळ व यात्रेकरू भक्तमंडळी यामुळे भक्तांची गर्दी श्रीसाईदर्शनासाठी बरीच झाली होती.

काही कलाकारांनी श्रींपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

कीर्तन :– श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली.

प्रवचन :–१) ह. भ. प. राष्ट्रीय संत सखाराम ता. जाधव, ओझर, नाशिक.
२) ह. भ. प. निवृत्तिराव पाटील गोंदकर, शिर्डी.
३) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी.

भजन :– १) श्री. भगवती साई संस्थान भजनी मंडळी, कुर्ला, मुंबई,
२) ज्ञानदीप गायन पार्टी भजनी मंडळी, ठाणे,
३) ह. भ. प. हनुमान-प्रासादिक अचानक भजनी, मंडळी, भिवंडी,
४) ह. भ. प. बालमित्र चौपाटी दरबार भजनी मंडळी, गिरगाव मुंबई.

गायन वादन कार्यक्रम :–१) बाबुराव धर्मा शिंदे, करमाळा. २) श्री. रामचंद्र के. काळे, ठाणे, ३) पुणे नभोवाणीवरील कलाकार श्रीमान रुस्तमजी गुस्तादजी हाभीदारू ऊर्फ रुस्तुमकाका यांचे गायन, अहमद नगर ४) श्री. माणेकशा रस्तुमजी यांची तबला साथ झाली, अहमद नगर ५) पुणे नभोवाणी केन्द्राच्या गायिका सौ. शशिकला म. वैशंपायन, नाशिक ६) श्री. स. बा. मुळीक (बाबी चांदेरकर मुंबई. ७) ह भ. प. विठ्ठलराव ह. उल्हे, अमरावती. ८) श्री. राम कोठेकर, परभणी. ९) श्री. वसंत वि. पुरीकर, परभणी. १०) श्री. विश्वनाथ भोगले, गुलबर्गा. ११) श्री. व्ही. जी. पिळगांवकर, गोवा. १२) सौ. सुचिता पिळणकर मुंबई. १३) श्री. रमेश पिळणकर, मुंबई. १४) श्री. कृष्ण मालवणकर, मुंबई. १५) श्री. प्रभाकर साटम, मुंबई. ११) स्वामी रामानंद, वेळगांव १६) श्री. विश्राम कांबळी, मुंबई १७) श्रीराम विष्णू सातर्डेकर, मुंबई.

नकला :–श्री. दिनेश पिळणकर मुंबई यांचा नकलांचा कार्यक्रम झाला.

श्रीदत्तजयंती कार्यक्रम :–श्रीदत्तजयंती निमित्त श्रीसाई मंदिरात दत्तजन्म कीर्तन झाल्यावर रात्रौ ७–३० ते ९ व ९–३० ते ११ पर्यंत पुणे नभोवाणीचे गायक श्रीमान रुस्तम काका यांचे गंधर्व-गायकीमधील गायनाचा कार्यक्रम झाला. त्यांना त्यांचे चिरंजीव श्रीमाणेकशा यांनी तबल्यावर उत्तम प्रकारे साथ केली. रात्रौ ९–१५ ते ११ पर्यंत श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आली. त्यानंतर शेजारती झाली.

माननीयांच्या भेटी :—

१) मा. श्री. भास्कर एन्. आडारकर, चेअरमन, सेंट्रल बँक ऑफ इंडिया मुंबई.

२) मा. श्री. बी. जी. देशमुख साहेब, आय. ए. एस्, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे खास सहाय्य, मुंबई.

३) मा. श्री. डी. पी. देसाई, हायकोर्ट जज्ज, गुजराथराज्य.

हवापाणी :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. हवेत रात्रीच्या व सकाळच्या वेळी झोंबणारा गारठा असतो.

इतर वृत्तविशेष :–संस्थाननें २२५ – ५५ "भक्त निवास क्र. २" ह्या तीन मजली इमारतीचे काम सुरू केले असून तळमजल्याचे काम पूर्ण होण्याचे मार्गावर आहे.

संस्थानने चालविलेल्या भोजनगृहात भक्त प्रसादाचा मनमुराद आस्वाद घेत आहेत. संस्थान कँटीनमध्ये सकस व निर्भेळ दूध व उत्तम चहा मिळतो. या सर्व व्यवस्थेवर भाविक अगदी खूष आहेत.

* * *

# श्री साईबाबा संस्थान, शिरडीची प्रकाशनें

श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती कामाच्या सोईकरतां दि. १५–११–७३ पासून पुढीलप्रमाणें ठरविण्यात आल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सच्चरित (मराठी) | रु. | ८-०० |
| २. | श्री साई सच्चरित (इंग्रजी) | रु. | ५-०० |
| ३. | श्री साई सच्चरित (गुजराती) | रु. | ४-५० |
| ४. | श्री साई सच्चरित (हिंदी) | रु. | ४-२५ |
| ५. | श्री साई सच्चरित (कानडी) | रु. | ४-२५ |
| ६. | श्री साईबाबा जीवितचरित्रम् (तेलगू) | रु. | ८-०० |
| ७. | श्री साईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि (मराठी) | रु. | ०-२० |
| ८. | दासगणूकृत ४ अध्याय (मराठी) | रु. | ०-२५ |
| ९. | सगुणोपासना (मराठी किंवा गुजराती) | रु. | ०-२० |
| १०. | श्री. प्रधानकृत चरित्र (इंग्रजी) | रु. | १-०० |
| ११. | श्री साईलीलामृत (मराठी) | रु. | २-०० |
| १२. | सचित्र साईबाबा | रु. | १-०० |
| १३. | शीलधी (मराठी) | रु. | ०-२० |
| १४. | साईबाबा : अवतार व कार्य (अ. य. धोंड) | रु. | १-७५ |
| १५. | शिरडी दर्शन (६६ फोटोंचा आल्बम) | रु. | २-०० |
| १६. | श्री साईलीला मासिक (मराठी किंवा इंग्रजी) | | |
| | प्रत्येकी वार्षिक वर्गणी | रु. | ६-०० |
| | " किरकोळ अंकास — | रु. | ०-६० |
| १७. | मुलांचे साईबाबा (द. दि. परचुरे) (मराठी) | रु. | ०-५० |

*

**वरील प्रकाशनें मिळण्याची ठिकाणें :—**

१. व्यवस्थापक, श्रीसाईबाबा संस्थान, पोस्ट शिरडी, जिल्हा अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, पिन :— ४०० ०१४.

Regd. No. MH/BYC/26


# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १-५० | ८" × १०" | रु. ०-५० |
| १०" × १४" | रु. १-०० | २½" × ३½" | रु. ०-२० |
| ४½" × ५½" | रु. ०-३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. **डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉक्सवरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (मि. मी) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिलेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १-५० |
| २. शिलेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | " " | १-२५ |
| ३. शिलेवर बसलेले बाबा | " | २२.८६ × ३३-०२ | ०-५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | " " | ०-५० |
| ५. शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा अल्बम ) | | | २-०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी., दादर, मुं. नं. १४


मुद्रक : **श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी,** निर्णयसागर प्रेस,

४५-डीई, ऑफ टोकरसी जीवराज रोड, शिवडी, मुंबई—१५.

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,

खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.